प्रकरण–१

संयुक्त महाराष्ट्र

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ चळवळी म्हणजे काय?

१.२.२ सामाजिक व राजकीय चळवळींची कारणे

१.२.३ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

१.२.४ महाराष्ट्राच्या लोकसंख्येची सामाजिक व राजकीय संरचना

१.३ सारांश

१.४ परिभाषिक शब्द

१.५ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या रचनेत मोठे बदल झाले आहेत. भारताच्या विविध भागातील लोक महाराष्ट्राच्या लहान मोठ्या शहरामध्ये स्थायीक झाले आहेत. मराठी भाषिका प्रमाणे बोलणारे रेखीव लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. इतर भाषा या सर्व प्रश्नांचा उहापोह आपण या पहिल्या घटकात करणार आहोत. त्यानंतर पुढील घटकांमध्ये सामाजिक प्रभाव टाकणाऱ्या विविध चळवळींचा आढावा घेणार आहोत.

१.२ विषय विवेचन

१.२.१ चळवळी म्हणजे काय?

सामाजिक परिवर्तनामध्ये सातत्याने चालणारी घटना म्हणजे चळवळ होय. एखाद्या विशिष्ट प्रश्नाच्या निराकरणासाठी किंवा सामाजिक, राजकीय, अर्थिक किंवा सांस्कृतिक बदल घडवून आणण्यासाठी लोकांनी एकत्र येवून केलेला आणि सातत्यपूर्ण प्रयत्न म्हणजे चळवळ (Movement) होय. सामाजिक, राजकीय किंवा नागरी प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी जेव्हा लोक एका विशिष्ट नेतृत्वाखाली किंवा संघटनेच्या माध्यमातून एकत्र येतात तेव्हा चळवळी सुरू होतात. अन्यायाला विरोध करणे आणि लोकहिताचे निर्णय घेण्यास शासनाला भाग पाडणे हा चळवळींचा मुख्य उद्देश असतो. कोणतीही चळवळ ही साधारणतः सामाजिक व राजकीय स्वरुपाची

असते. प्रत्येक चळवळीचे स्वरूप, व्याप्ती उद्दिष्ट वेगवेगळे असते. कांही वेळा चळवळीना हिंसक वळण लागण्याचा घोका असतो, पुढील उदाहरणांवरून चळवळ म्हणले काय हे अधिक स्पष्ट होईल.

....

१.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस

१) चळवळी म्हणजे काय हे समजेल.

२) राजकीय चळवळींची कारणे कोणती आहेत हे स्पष्ट होईल.

३) महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेली चळवळ समजावून घेता येईल.

४) महाराष्ट्राच्या लोकसंख्येची सामाजिक, राजकीय (विभागणी) संरचना समजून घेता येईल.

१. प्रास्ताविक

'महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी' या पेपरच्या माध्यमातून आपणांस पुरोगामी महाराष्ट्राची निर्मिती कशी झाली हे अभ्यासावयाचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात याचे बीजारोपण झाले होते. १९५० आणि १९६० च्या दशकात संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यासाठी सामाजिक व राजकीय पातळीवर अनेक घडामोडी घडत गेल्या. त्यातूनच प्रथम १९५६ साली गुजरात व महाराष्ट्र यांचे मिळून एक व्दिभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. या निर्णयाविरुद्ध महाराष्ट्रात प्रचंड असंतोष निर्माण झाला व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ सुरू झाली. त्यामुळे १ मे १९६० रोजी विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, यांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रात समावेश करण्यात आला आणि संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

या घटकात आपण संयुक्त महाराष्ट्रासाठी ची चळवळ अभ्यासणार आहोत. त्याचप्रमाणे सामाजिक व राजकीय चळवळीना कोणते घटक कारणीभूत ठरतात याचीही चर्चा करणार आहोत. मागील दोन दशकात, विशेषतः २०१० नंतर महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या रचनेत मोठे बदल झाले आहेत. भारताच्या विविध भागातील लोक महाराष्ट्राच्या लहान मोठ्या शहरामध्ये स्थायीक झाले आहेत. मराठी भाषिकांप्रमाणे बोलणारे देखील लोक महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

या सर्व प्रश्नांचा उहापोह आपण या पहिल्या घटकात करणार आहोत. त्यानंतर पुढील घटकांमध्ये सामाजिक प्रभाव टाकणाऱ्या विविध चळवळींचा आढावा घेणार आहोत.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य चळवळ झाली. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र चळवळ, कामगार चळवळ, स्त्रीवादी चळवळ, पर्यावरणवादी चळवळ, सहकार चळवळ, दलित चळवळ, शेतकरी चळवळ यांची इत्यादी वेगवेगळ्या भागात आणि वेगवेगळ्या काळात झालेल्या चळवळींचा उद्देश वेगवेगळा होता. या सर्व चळवळींची विभागणी ढोबळपणे दोन प्रकारात होते. सामाजिक चळवळी व राजकीय चळवळी होय.

सामाजिक व राजकीय चळवळ :

समाजातील अन्याय दूर करून सामाजिक परिवर्तन करणे, हा सामाजिक चळवळींचा उद्देश असतो. भारतामधील दलित चळवळ, पर्यावरणाय चळवळ, आदिवासी चळवळ किंवा स्त्रीवादी चळवळ या प्रामुख्याने सामाजिक चळवळी आहेत. या चळवळी सुधारणावादी किंवा क्रांतीकारी स्वरूपाच्या असतात सापेक्ष वंचितता विरोधी चळवळ म्हणून सामाजिक चळवळीकडे पहिले जाते. उदा. स्त्रीभ्रूणहत्त्या विरोधी चळवळ ही सामाजिक स्वरूपाची चळवळ आहे.

सत्ता मिळविणे राजकीय व्यवस्थेत बदल करणे किंवा शासनाच्या धोरणावर प्रभाव टाकणे यासाठी केलेल्या चळवळींना 'राजकीय चळवळ' असे म्हणतात. सरकारच्या निर्णयाला विरोध करतात किवा नवीन कारा करण्याची मागणी करतात तेव्हा त्यास राजकीय चळवळ असे म्हणता येते. यात राजकीय पक्ष व त्यांच्या संघटना अग्रेसर असतात.

उदा. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा यासाठी आक्टों, २०२६ मध्ये झालेली चळवळ ही राजकीय स्वरुपाची होती.

सामाजिक व राजकीय चळवळीमध्ये स्पष्ट अंतर करता येत नाही. या परस्पर संबंधीत असतात. सामाजिक किंवा राजकीय चळवळीचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी चळवळीची वैशिष्ट्ये समजावून घेणे आवश्यक आहे. चळवळींची ठळक वैशिष्टे पुढील प्रमाणे -

सामाजिक व राजकीय चळवळी

१) चळवळ ही अनेक लोकांच्या सहभागावर आधारीत असते.

२) चळवळीसमोर समाजहिताचा किंवा एखाद्या समस्येचा निश्चित असा अंजेडा (कार्यक्रम) असतो.

३) चळवळीला दिशा देण्यासाठी एका खंबीर नेतृत्वाची गरज असते.

४) चळवळींचा शासनाच्या धोरणावर कमी जास्त प्रमाणात प्रभाव पडत असतो.

५) कोणतीही चळवळ आधारीत असते एखाद्या विशिष्ट विचारसरणीवर आधारित असते.

६) मोर्चे, धरणे, संप, बहिष्कार इत्यारी मार्गाचा अवलंब करून चळवळ सक्रीय केली जाते.

७) लोकशाहीमध्ये अहिंसात्मक चळवळींना मान्यता असते, परंतु हिंसात्मक आंदोलन किंवा चळवळींना मान्यता असत नाही.

८) चळवळींचे आयुष्यमान निश्चित नसते. कांही चळवळी (नक्षलवादी) दिर्घकाळ चालतात तर काही चळवळी अल्पकाळ चालतात.

१.२.२ सामाजिक व राजकीय चळवळींची कारणे

लोकशाही व्यवस्थेमध्ये आंदोलन व चळवळी या सातत्याने होत असतात. प्रत्येक चळवळीमागे काही ठराविक कारण असतात. सामान्यतः समाजातील अन्याय, असमानता किंवा चूकीचे सार्वजनिक धोरण याविरुद्ध चळवळ उभी केली जाते. सामाजिक किंवा राजकीय चळवळी आपोआप घडत नाहीत, सामाजिक व राजकीय असंतोषातून चळवळींचा उदय होत असतो.

१) सामाजिक व राजकीय अव्यवस्था– उदारीकरण व औद्योगिकरण यामुळे खेडी ओस पडत आहेत आणि शहरांचा आकार वाढत आहे. यामुळे अनेक नागरी समस्या निर्माण झाल्या आहेत. सामान्य माणसाला दैनंदीन जीवनात पाणी, आरोग्य, शिक्षण, किमान वेतन इत्यादीसाठी झटावे लागते. काही मुठभर लोकांना समान व राजकीय व्यवस्थेचा फायदा होतो. याऊलट बहुंताश, लोकांना संघर्ष करावा लागतो. यातूनच चळवळींचा जन्म होतो. उदा. भ्रष्टाचार विरोधी जनअंदोलन, शेतमालासाठी हमीभाव मिळावा म्हणून केलेली चळवळ. या सामाजिक व राजकीय अव्यवस्था याविरुद्धचा लढा असतो.

२) सामाजिक व राजकीय अन्यायाची भावना – सामाजिक किंवा आर्थिक दुर्बल घटकांना जेव्हा जाणीव होते की, आपले शोषण केले जात आहे, तेव्हा त्या विरुद्ध चळवळ जन्माला येते. दलीत चळवळ व स्त्रीवादी चळवळ ही सामाजिक व राजकीय अन्यायातून निर्माण झाली आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये समाजातील उपेक्षित घटकाना किंवा स्त्रीयांना योग्य प्रतिनिधीत्व दिले जात नाही तेव्हा चळवळ सुरू होते. थोडक्यात, कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी चळवळ जन्माला येते.

३) सामानिक जाणीव जागृती – सामाजिक प्रश्नांबद्दल संवेदनशील असणारा एक वर्ग समाजात असतो. पाणी प्रदुषण, जंगलतोड, प्लॅस्टिकचा अतिरेकी वापर इत्यादीमुळे अनेक नागरी प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रश्नांना वाचा फोडून या विरुद्ध लढा उभारण्याचे काम समाजातील काही जागरूक लोक करत असतात. यातूनच लहान–मोठ्या चळवळी स्थानिक किंवा देशपातळीवर सुरू होतात. उदा १९७० च्या दशकात उत्तराखंड राज्यात सुरू झालेले चिपको आंदोलन, १९८० च्या दशकातील नर्मदा बचाव आंदोलन, सध्या सुरू असलेले प्लॅस्टीक विरोधी आंदोलन इ. चळवळी सामाजिक जाणीवेतून निर्माण झाली आहेत.

४) आर्थिक विषमता– बहुतांश कामगार चळवळी या अर्थिक शोषणाच्या विरुद्ध उभा केलेला लढा असतात. पुरेसे वेतन न मिळाल्यामुळे किंवा कामाचा योग्य मोबदला न मिळाल्यामुळे संघटीतपणे चळवळ उभी केळी जाते. शेतमजूर, गिरणी कामगार, कंपनी मधील कामगार यांची आंदोलन ही आर्थिक विषमता नष्ट काण्याच्या उद्देशाने असतात. डाव्या विचारसरणीची चळवळ ही आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली दिसते.

५) शासन व प्रशासनाची अनास्था– अनेक प्रसंगात सामान्य माणसाला शासनाचे अधिकारी, कर्मचारी यांचेकडून न्याय मिळत नाही. तेव्हा लोक प्रशासनाविरुद्ध संघटीत होऊन संघर्ष सुरू करतात. शहरातील खडे बुजविले जात नाहीत, पाणी पुरवठा सुरळीत नाही या कारणावरून लोकांनी आंदोलन केल्याच्या अनेक घटना आहेत. शासकीय रुणालयातील सामान्य माणसाला मिळणाऱ्या वाईट वागणूकीबद्दल अनेकदा लोकांचा

उद्रेक होतो.

६) प्रादेशिक असमतोल – स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करणारी चळवळ ही देखील प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्यामुळे सुरु झात्री. त्यामुळे राज्यकर्त्यांनी सर्व भागांचा समतोल विकास करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. मराठवाडा भाग सुद्धा मागास राहील्याबद्दल नाराजी प्रकट होते व त्यातून वेगळया राज्याची मागणी पुढे येते.

७) तात्कालीक कारणे किंवा घटना – सामाजिक व राजकीय क्षेत्रात एखादी घटना किंवा दुर्घटना चळवळींना जन्म देते. एका तरुणीवर झालेल्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी २०१२ साली दिल्ली व देशभर निर्भया आंदोलन झाले. त्याचप्रमाणे २०१६ साली कोपर्डी घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात निषेध मोर्चे काढण्यात आले. २०१८ साली भीमा–कोरेगाव येथील घटनेमुळे दलित संघटनांनी महाराष्ट्रात आंदोलन केले. २०१९ मध्ये मुंबई जवळ असणारे मेट्रो कार शेडसाठी आरे जंगल तोड रोखण्यासाठी आंदोलन झाले. पेपर फुटीच्या विरोधात २०२६ मध्ये झालेली विद्यार्थ्यांची आंदोलने ही देखील एखाद्या घटनेतून निर्माण झाली.

अशा प्रकारे एखादी चळवळ किंवा आंदोलन होण्यासाठी एक किंवा अनेक कारणे असतात. काही वेळा ज्या उद्देशाने आंदोलन किंवा चळवळ सुरू होते, तो उद्देश सफल होतो. काही वेळा तो सफल होत नाही. चळवळीचे समर्थन करणारे कांही लोक तसेच त्याचे खंडण करणारे देखील लोक समाजामध्ये असतात. चळवळीचे यश त्यांच्या मागण्या कितपत न्यायपूर्ण आहेत यावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे चळवळीचे यश त्याच्या नैतिक अधिष्ठानावर देखील अवलंबून असते.

१.२.३ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

स्वातंत्र्य पूर्व काळापासून सर्व मराठी भाषा, बोलणाऱ्या लोकांसाठी एक स्वतंत्र राज्य असावे असा विचार अनेक ठिकाणी व्यक्त झाला होता. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये 'प्रांत' रचना कोणत्या आधारावर करावी याबाबत एकमत होत नव्हते. तत्कालीन कॉंग्रेस मधील पं. नेहरू, सरदार वल्लूभाई पटेल यांना भाषावार प्रांतरचना केल्यास देशाच्या एकात्मतेला मारक ठरेल असे वाटत होते. म्हणून याबाबत यथावकाश निर्णय घ्यावा असे त्यांचे मत होते. परंतू देशातील विविध भागात भाषावार प्रांत (राज्य) रचनेसाठी मागणी होत गेली. १९५६ साली भारताची विभागणी भाषावार करण्यात आली. परंतू महाराष्ट्र मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र राज्याची मागणी पूर्ण केली गेली नाही. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वतंत्र मराठी भाषिकाचे राज्य असावे या मागणीला व चळवळीला अधिक बळ मिळाले. या चळवळीचा आढावा पुढील ठळक घटनांच्या आधारे समजावून घेऊया.

पार्श्वभूमी –

१९२० मध्ये मोतीलाल नेहरू व तेजबहादूर सप्रू समितीने भाषावार प्रांतरचना व कॉंग्रेसची रचना देखील भाषावार असावी अशी शिफारस केली होती. १९३९ साली अहिल्यानगर (अहमदनगर) येथे भरलेल्या साहित्य संमेलनामध्ये सर्व मराठी भाषा प्रदेशांचा मिळून एक प्रांत बनवावा आणि त्याला 'संयुक्त महाराष्ट्र' असे नाव द्यावे असा ठराव संमत करण्यात आला होता.

१२ मे, १९४६ रोजी ग. त्र्य. माडखोलकर याच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव मंजूर करण्यात आला. या संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्यात आली. पुढे शंकरराव देव यांची संयुक्त महाराष्ट्र परिषदच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. श्री. शंकरराव देव यांच्या नेतृत्त्वाखाली शेतकरी, कामगार, युवक महिला यांना संघटीत करून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी लढा सुरू झाला. मुंबई, मराठवाडा, गोवा, वऱ्हाड या प्रांताना मिळून संयुक्त महाराष्ट्र स्थापन करावा असे अशी मागणी करण्यात आली.

दार कमिशन–१९४७ : न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली भाषावार प्रांतरचना करण्याबाबत शिफारस केंद्र शासनाकडून आयोग नियुक्त करण्यात आला. तथापि या आयोगाने भाषावार प्रांत रचना करू नये अशी शिफारस केली. त्यामुळे अनेकांचा अपेक्षाभंग झाला.

जे. व्ही. पी. समिती–१९४९ : जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सितरामथ्या (JVP) यांच्या समितीने भाषावार प्रांतरचनेला तत्त्वतः मान्यता दिली. परंतू, प्रत्यक्षात तात्काळ भाषावार प्रांतरचना करण्यास विरोध केला. महाराष्ट्राच्या मागणीचा सुद्धा प्रस्ताव फेटाळला. मुंबई वगळून यथावकाश महाराष्ट्र राज्य निर्माण केले जाईल अशी शिफारस या समितीने केली. पुन्हा एकदा मराठी भाषिकांवर अन्याय करण्यात आला.

नागपूर करार–१९५३ : संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट होऊ पहाणाऱ्या सर्व विभागांना समान दर्जा देणारा एखादा करार निर्माण करावा, या उद्देशाने विदर्भ, उर्वरीत महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागातील १९५३ रोजी मंडळींनी नागपूर येथे येऊन 'नागपुर करार' करण्यात केला. मुंबई, विदर्भ आणि मराठवाडा या भागातीत लोकांना सत्तेचे न्याय वाटप होईल अशा प्रकारे सत्तेचे विकेंद्रीकरण करून 'संयुक्त महाराष्ट्र' निर्माण करण्याचे ठरले. मुंबईला राजधानीचा आणि नागपूरला उपराजधानीचा दर्जा देण्याचा ठराव झाला. नागपूर व संभाजीनगर (औरंगाबाद) येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ निर्माण करण्याचा ठराव करण्यात आला. अशा प्रकारे सर्व मराठी भाषिक प्रांताना एकत्र करण्याच्या दृष्टीने हा करार महत्वाचा होता.

राज्य पुनर्रचना आयोग–१९५३ : न्या. फजल अली यांच्या अध्यक्षतेखाली एक तीन सदस्यांचा आयोग २२ डिसेंबर, १९५३ रोजी नियुक्त करण्यात आयोगासमोर बापूजी आणे, ना. डा. गोरे, भाऊसाहेब हिरे, शंकरराव देव इत्यादी नेत्यांनी मराठी भाषिकासाठी महाराष्ट्र राज्याची निर्मिती करणे कशी योग्य आहे याची मांडणी केली. तथापी जाणीवपूर्वक राज्य पुनर्रचना आयोगाने देखील संयुक्त महाराष्ट्राची मागणी फेटाळली. इतर भाषिकांसाठी भाषिक राज्ये निर्माण करण्यात आली. परंतू गुजरात व मुंबईसह (विदर्भ वगळून) द्विभाषिक राज्य निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली. विदर्भाचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची शिफारस देखील करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या सर्व स्तरातील नेत्यांना व जनतेला प्रचंड राग आला. हा राग आंदोलन, मोर्चे, बंद, बहिष्कार यातून प्रकट होत राहीला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे यासाठी श्री. शंकरराव देव व र. प्र. परांजपे यांनी आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान धनंजयराव गाडगीळ यांनी राज्य पुनर्रचना आयोगावर पक्षपात केल्याचा आरोप केला.

त्रिराज्याची योजना : ८ नोव्हेंबर १९५५ रोजी भारत सरकारने त्रिराज्याची योजना जाहीर केली. मुंबई, गुजरात आणि महाराष्ट्र अशी तीन राज्ये स्थापन करावीत. मुंबई वगळून महाराष्ट्र ही कल्पनाच मराठी माणसाला मान्य नव्हती. त्यामुळे या निर्णयाविरुद्ध पुन्हा जनआंदोलन सुरू झाले. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी विधानसभेवर विराट मोर्चा काढण्यात आला. सेनापती बापट आणि आचार्य अत्रे यांनी याचे नेतृत्त्व केले. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी संप पुकारण्यात आला. यावेळी पोलीसांनी गोळीबार केल्याने १०५ लोक हुतात्मे झाले व सुमारे ३०० लोक जखमी झाले. यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला धार चढली. २२ डिसेंबर १९५५ रोजी मुंबई महानगरपालिकेने संयुक्त महाराष्ट्र मागणीचा ठराव मंजूर केला.

नेहरू सरकारने संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य न केल्यामुळे तात्कालीन भारताचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला, तसेच विधानसभेच्या आमदारांनी देखील आपल्या पदाचे राजीनामे दिले. ज्याप्रमाणे मराठी भाषिकांचा द्विभाषिक राज्याला विरोध होता त्याचप्रमाणे गुजराती तरुणांनी देखील स्वतंत्र गुजरातची मागणी केली व द्विभाषिक राज्यांना विरोध केला.

काँग्रेस पक्षातील काही नेते व नेहरूंचे बहुमत यामुळे १ नोव्हेंबर १९५६ साली गुजरात- मुंबईला मराठी व गुजराती भाषिकांसाठी द्विभाषिक राज्य निर्माण करण्यात आले. यशवंतराव चव्हाण यांना या द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री म्हणून निवडले गेले.

१९५७ ची सार्वत्रिक निवडणूक : १९५७ साली झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत काँग्रेसला मोठा फटका बसला. संयुक्त महाराष्ट्र समितीचा या निवडणूकीत यश मिळाले. त्यामुळे पुढे काँग्रेसला संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुनर्विचार करावा लागला.

१ मे १९६० : जनमताचा आदर करून शेवटी केंद्र शासनाने संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य केली. मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा, यांच्यासह सलग मराठी भाषा बोतणाऱ्या लोकांचा संयुक्त महाराष्ट्र १ मे, १९६० रोजी अस्तित्वात आला. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा सामाजिक व राजकीय चळवळीचा विजय होता. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये असे षडयंत्र काही लोकांचे होते. त्यामुळेच अनेकदा महाराष्ट्राच्या मागणीला पुढे ढकलण्यात आले. परंतू शेवटी मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आला. दोन दशकांच्या प्रदिर्घ लढा दिल्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या लढ्यामध्ये राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळीचा सहभाग होता. त्याचप्रमाणे लेखक, साहित्यिक, कलाकार, शेतकरी, मजूर, कामगार, विद्यार्थी यांचे देखील योगदान मोठे होते.

१.२.४ महाराष्ट्राच्या लोकसंख्येची संरचना :

२०११ च्या जनगणना अहवालाची अधिकृत आकडेवारी आज रोजी आपल्याकडे उपलब्ध आहे. २०२६-२७ मध्ये महाराष्ट्राच्या सुधारीत लोकसंख्येच्या संरचनेची माहिती जमा करण्याचे काम अद्याप सुरू आहे. तथापि २०११ च्या आकडेवारीनुसार आपणांसमोर महाराष्ट्राचे सामाजिक व राजकीय चित्र स्पष्ट होण्यास मदत होते.

महाराष्ट्र ३.०८ लाख चौ. कि. मी. क्षेत्रफळ असणारे भारतामधील दुसरे मोठे राज्य आहे. सुमारे ७२० कि. मी. चा सागरी किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. भौगोलिक व प्रशासकीय दृष्टीने महाराष्ट्राची सहा विभागात विभागणी करण्यात आली आहे. कोकण (मुंबई), पश्चिम महाराष्ट्र (पुणे), उत्तर महाराष्ट्र (नाशिक), मराठवाडा (संभाजीनगर), विदर्भ (अमरावती) व नागपूर महाराष्ट्रात ३६ जिल्हे आहेत.

२०११ मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२४ कोटी होती. २०२६ मध्ये ती १३.५० कोटी असण्याचा प्राथमिक अंदाज आहे. यापैकी साधारणत: ८०% हिंदू, ११.५% मुस्लीम, ६% बुध्दीस्ट व उर्वरीत २% ते ३% लोक हे जैन, ख्रिश्चन इत्यादी समुदायाचे आहेत.

साक्षरतेचे प्रमाण ८२% आहे. परंतू लिंग गुणोत्तर चिंताजनक आहे. १००० पुरूषांच्या मागे ९३० स्त्रीया आहेत. साधारणत: ४०% लोक शहरी भागात राहतात. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर यांना शहरी जिल्हे म्हणून ओळखले जाते.

मराठा, इतर मागास (ओबीसी), मुस्लीम, अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती यांचा महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर प्रभाव आहे. एकूण लोकसंख्येच्याा साधारणत: १२% अनुसूचीत जातीचे व १% अनूसूचीत जमातीचे लोक राहतात. लातूर, नांदेड, वाशिम, अमरावती, नागपुर, भंडारा या जिल्ह्यामध्ये अनुसूचीत जातीचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, गोंदीया इत्यादी जिल्ह्यामध्ये अनुसूचीत जमातीचे प्रमाण जास्त आहे. मराठा किंवा मराठा कुणबी हा सर्वात मोठा जात समुह आहे. ३२% लोक या जात समुहाचे आहेत. महाराष्ट्राच्या शहरातील व गावातील सुतार, लोहार, कोळी, शिंपी, माळी इत्यादी जात समुहांना इतर मागास वर्ग (OBC) म्हणून ओळखले जाते. यांचे प्रमाण साधारणतः ४१% आहे.

गेल्या दोन दशकात जातीच्या राजकारणात प्रत्येक जात समुहाचे महत्व वाढताना दिसत आहे आरक्षणासाठी महाराष्ट्रात सुरू असणारे मोर्चे व आंदोलन याचा परिणाम राजकारणावर झालेला दिसून येतो.

पारंपारीक लोक समुदायाशिवाय परप्रांतीय लोकांचे प्रमाण वाढत आहे. विशेषत: गेल्या दोन दशकात पुणे, मुंबईसह इतर लहान मोठ्या शहरात परप्रांतीय लोकांची संख्या देखील दखल घेण्याइतपत वाढली आहे. यात प्रामुख्याने गुजराती, राजस्थानी, बिहारी, उत्तर भारतीय व दक्षिण भारतीय लोकांचा समावेश होतो.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासून आजपर्यंत गेल्या आठ दशकात अनेक बदल महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात झाले आहेत. आज रोजी भारतातील एक औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. राष्ट्रीय राजकारणातील महाराष्ट्राचे महत्वाचे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पहिले जाते.

स्वयं अध्ययन प्रश्न :

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केव्हा झाली?

२) चळवळीसाठी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला जातो?

३) सामाजिक व राजकीय चळवळीची दोन प्रमुख कारण नमूद करा.

४) विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण झाल्यामुळे कोणत्या स्वतंत्र राज्याची मागणी महाराष्ट्रात झाली होती?

५) 'संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे' पहिले अध्यक्ष कोण होते?

६) राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष कोण होते?

७) 'नागपूर करार' केव्हा करण्यात आला?

८) गुजराती व मराठी भाषिकांसाठी द्विभाषिक राज्य केव्हा अस्तित्वात आले?

९) महाराष्ट्रातील अल्पसंख्यांक समुदाय कोणते?

१०) २०११ नुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या किती होती?

१.३ सारांश:

समकालीन महाराष्ट्राचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास करणे गरजेचे आहे. एखाद्या विशिष्ट प्रश्नासाठी लोक एकत्र येणे व त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे म्हणजे चळवळ होय. स्वातंत्र्य चळवळीपासून आज रोजी नागरी प्रश्नांसाठी सुरू असणाऱ्या चळवळी म्हणजे सामाजिक जीवंतपणाचे द्योतक आहे. सामाजिक व राजकीय बदल करणे हा चळवळींचा उद्देश असतो. विविध कारणांनी चळवळींचा जन्म होतो.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तथापि यासाठी तत्पूर्वी २० वर्षे मराठी भाषिकांचा संघर्ष सुरू होता. सर्व मराठी भाषिक प्रांतांना एकत्र करून त्याचा पाठपुरावा करून राजकीय व सामाजिक पातळीवर लढा उभा करून 'संयुक्त महाराष्ट्राची' मागणी पूर्ण करून घेण्यात आली.

या घटकात आपण समकालीन महाराष्ट्राचे लोकसंख्येचे स्वरूप देखील समजावून घेतले आहे. महाराष्ट्र हे बहुल संस्कृतीचे राज्य आहे. येथील भुगोल व संस्कृती सुध्दा वेगवेगळ्या आहेत. तथापी मराठी भाषा या एका सुत्राने संपूर्ण महाराष्ट्र एकत्र बांधला गेला आहे. एक प्रगत व पुरोगामी विचारांचे राज्य मणून महाराष्ट्राची ओळख निर्माण झाली आहे.

१.४ परिभाषिक शब्द

व्दिभाषिक राज्य – मराठी व गुजराती दोन्ही भाषांसाठी एकच राज्य

अजेंडा – राजकीय पक्ष किंवा सामाजिक संघटना एखादा विचार व कार्यक्रम घेऊन समाजासमोर जातात तेव्हा त्यास 'अजेंडा ' असे म्हणतात.

नक्षलवादी – भारतामध्ये दिर्घकाळ चाललेली एक सशस्त्र चळवळ. आदिवासी व उपेक्षितांना न्याय मिळावा असे मानणारा डावा विचार.

प्रांत – स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी ब्रिटीश काळात भारताची विभागणी करण्यात आली होती. त्या भौगोलिक विभागांना 'प्रांत' म्हटले जात. जसे मुंबई प्रांत किंवा इलाखा मद्रास प्रांत इ.

कुणबी – महाराष्ट्रात शेती व्यवसायाशी निगडीत मराठा समाजासाठी हा शब्द वापरला जातो.

इतर मागास वर्ग – OBC-(Other Backward (lass) अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती सोडून इतर कांही जाती सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. त्यांना OBC म्हटले आते.

परप्रांतीय – हा शब्द सापेक्ष आहे. वेगळ्या राज्यातील किंवा भागातील लोकांना परप्रांतीय म्हटले जाते. महाराष्ट्रात रोजगारासाठी आलेले इतर राज्यातील लोक परप्रांतीय म्हणून ओळखले जातात.

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) १ मे १९६०

२) मोर्चा, बंद, धरणे, संप, बहिष्कार इत्यादी

३) सामाजिक व राजकीय अन्याय झाल्याची भावना सामाजिक व आर्थिक विषमता/शोषण

४) स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी

५) श्री. शंकरराव देव

६) न्या. फजल अली

७) २८ सप्टेंबर, १९५३

८) १ नोव्हेंबर १९५६

९) मुस्लीम, ख्रिश्चन, बुध्दीस्ट, शिख इत्यादी

१०) ११.२४ कोटी लोकसंख्या

१.६ स्वाध्याय

१) चळवळ म्हणजे काय? चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक व राजकीय चळवळींची कारणे स्पष्ट करा.

३) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महत्वाच्या घटनाचा आढावा घ्या.

५) महाराष्ट्राची सध्याची लोकसंख्येची सामाजिक व राजकीय संरचना यावर भाष्य करा.

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) शर्मा जी. एल., सामानिक मुद्दे, रावत पब्लिकेशन, जयपूर, २०१५

२) फडके य. दि., लढा संयुक्त महाराष्ट्राचा, श्रीविधा प्रकाशन, पुणे, १९७९

३) पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, अभिनव प्रकाशन, पुणे, १९६१

५) साने रविकिरण, साने नीतिमा, महाराष्ट्राचे शासन व राजकारण, डायमंड पब्लिकेशन्स

५) सुहास पळशीकर सुहास, महाराष्ट्राचे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे

७) Mahajan Samadhan, History of Modern Maharashtra-II, S. M. Publication, 2026

६) पाटील बी. बी., महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, फजके प्रकाशन, कोल्हापूर

❑❑❑

प्रकरण-२

सामाजिक चळवळी

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ स्त्रीवादी चळवळ

  २.२.२ विद्यार्थी चळवळ

  २.२.३ अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ

२.३ पारिभाषिक शब्द

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्न

२.६ सारांश व समारोप

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ अधिक वाचण्यासाठी संदर्भ ग्रंथ

....

२.० उद्दिष्टे

- सामाजिक चळवळी या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील उद्दिष्ट्ये स्पष्ट होतील.

१. स्त्रीवादी चळवळीचा उदय, विकास स्वरुप व महत्त्व समजून घेता येईल.

२. विद्यार्थी चळवळीचे स्वरुप, आवश्यकता विविध विद्यार्थी संघटना, त्याचे कार्य इ. चा अभ्यास करता येईल.

३. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा उदय, विकास, श्रद्धा आणि अंधश्रद्धा, अनिष्ट अघोरी प्रथा, जादुटोणा विरोधी कायदा याविषयी अभ्यास करता येईल.

२.१ प्रास्ताविक

भारतामध्ये गेल्या हजारो वर्षापासून चातु:वर्णपद्धती व जाती व्यवस्थेमुळे समाजातील काही शुद्र व अतिशुद्र लोकांचे शोषण झाले. त्यामध्ये विशेषत: अतिशुद्राचे शोषण प्रचंड झाले. महिलांवर अन्याय अत्याचार खुप झाले. त्याचप्रमाणे अंधश्रद्धेच्या नावाखाली अमानवी प्रथा परंपरा निर्माण झाल्या.

अनिष्ट, अघोरी व अमानवी प्रथा परंपरेमुळे समाजात अंधश्रद्धा निर्माण झाले. तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनीवर शाळा, महाविद्यालयात व विद्यापीठामध्ये त्याचे प्रचंड आर्थिक व मानसिक शोषण व अन्याय

करण्यात आला. रुढी प्रथा व परंपरामुळे महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात महिला संघटीत होऊन चळवळ सुरु झाली.

तसेच विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी व त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी सर्व राजकीय पक्षाने विद्यार्थी संघटना स्थापन केल्या.

भारतीय समाजात रुढ असलेल्या अघोरी, अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा व देव धर्माच्या नावावर होणारे लोकांचे शोषण थांबविण्यासाठी बुवाबाजी, भोंदु महाराजाची भोंदुगिरी, फसवेगीरी उघड करण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती स्थापन केली आणि ही लोकचळवळ उभी केली.

२.२ विषय विवेचन :

सदर प्रकरणामध्ये

१) स्त्रीवादी चळवळ

२) विद्यार्थी चळवळ

३) अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ इत्यादी चळवळीचा अभ्यास करणार आहोत.

२.२.१ – ४) स्त्रीवादी चळवळी (Feminist Movement)

स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप:

प्रस्तावना :

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील अनेक देशात सुधारणाचे वारे जोमाने वाहु लागले. वंशवाद, जातीयवाद, धर्मांधता, वसाहतवाद यासोबतच स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याया विरोधात सुधारणाविषयी चर्चा, संवाद, परिषदा सुरु झाल्या. स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटीतपणे प्रयत्नाची सुरुवात झाली. याविषयी सर्व राष्ट्राचे एकमत झाले. स्त्री प्रश्न सोडविण्यासाठी विचारवंत अभ्यासकानी विचार मांडले. त्यांना स्त्रीवाद म्हणतात. मात्र यास चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले त्यास स्त्रीवादी चळवळी म्हणतात.

कॉ. शरद पाटील यांच्या शब्दांत स्त्रीदास्यांत्वाच्या विरोधातील लढाई म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय. जगातील प्रत्येक देशातील स्त्रीयाचे प्रश्न कमी अधिक प्रमाणात वेगवेगळे असले तरी ते प्रश्न सोडविणे सोपे नव्हते. मात्र भारतातील वेगवेगळ्या जातीतील स्त्रीयांचे वेगवेगळे प्रश्न असून या स्त्रीयामध्येही जातीय भेद व उच्चनिच्चता आढळून येते.

जगातील सर्व पाशात्य स्त्रीवादी अभ्यासक स्त्री म्हणून जे जे. तिचे प्रश्न, समस्या असतील त्याचा अभ्यास करुन मार्ग सुचविण्याचे कार्ये केले आहेत. भारतात हिंदू स्त्रीवाद व आंबेडकरी स्त्रीवाद, आदिवासी स्त्रीवाद, मुस्लीम स्त्रीवाद आणि ख्रिश्चन स्त्रीवाद असल्याचे दिसून येतात.

४.२.४.१ स्त्रीवादी चळवळीचे मध्यवर्ती कार्ये–

१) स्त्रीवादी चळवळीच्या मते, स्त्री व पुरूष समानता असावी.

२) स्त्रीयांना पुरुषाप्रमाणे समान व सन्मानाची वागणूक मिळावी.

३) स्त्रीयाच्या शोषण, अन्याय व अत्याचाराविरुद्ध जगाच्या विचारमंचावर आवाज उठविणे, युनोमध्ये आवाज उठवणे.

४) कुटुंबात मुलगा व मुलगी असा भेद करु नये.

५) मुलीनाही वडीलांच्या संपत्तीमध्ये हक्क मिळाला पाहिजे.

६) पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात सहभागी होण्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

७) स्त्री प्रतिष्ठेस बाधक, अन्यायकारक प्रथा परंपरा नष्ट करणे.

८) स्त्रीयांच्या सरंक्षणासाठी व विकासासाठी कठोर स्वरुपाचे कायदे करणे.

२.२.१.२ स्त्रीवादाचे स्वरुप:

आज स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप स्थानिक प्रश्नांपुरते न राहता किंवा राष्ट्रीय प्रश्नापुरते न राहता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य चालु आहे. म्हणजेच स्त्रीवादाचे किंवा स्त्रीवादी चळवळीचे स्वरुप आंतरराष्टीय बनलेले आहे. उदा. भारतातील खैरलांजी प्रकरणाची आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोगाने दखल घेवुन चौकशी केली. तसेच दिल्लीतील निर्भया प्रकरणाची दखल राष्ट्रीय व आंतरराष्टीय पातळीवर घेतली व केंद्र सरकारला योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले.

आज Gender Sensitization किंवा लिंगभाव हे मुद्दे युनोच्या पातळीवर चर्चा केले जात असून प्रत्येक देशामध्ये यावर चर्चा केली जात असून स्त्री–पुरुष विषमता कमी करुन स्त्रीयांवर होणारे अन्याय, अत्याचार कमी करण्यासाठी व स्त्रीयांच्या कामाच्या ठिकाणी व घराबाहेर संरक्षण करण्यासाठी विविध कायदे केले आहेत. स्त्रीवादी चळवळी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीयांचे प्रश्न मांडत असून स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने हक्कांची मागणी करीत आहेत. तसेच शैक्षणिक, नोकरीमध्ये व विधीमंडळ संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षणाची मागणी करीत आहेत. ७३ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेने ३३% आरक्षण दिलेले आहे.

२.२.१.३ स्त्रीवादी चळवळीचे विविध टप्पे:

प्रामुख्याने स्त्रीवादी चळवळीचे स्वातंत्र्यपुर्व काळ आणि स्वांतत्र्योत्तर काळ आणि जागतिकीकरणानंतरचा स्त्रीवादी चळवळीचा कालखंड अशा प्रकारे तीन टप्प्यामध्ये अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) पहिला टप्पा: स्वातंत्र्यपुर्व काळातील स्त्रीवादी चळवळ :

ब्रिटीश राजवटीमध्ये खऱ्या अर्थाने प्रबोधनाचा व धार्मिक अनिष्ट परंपरेच्या सुधारणेचा काळ सुरु झाला. ब्रिटीश सरकारनेही कायदेशीर पाठींबा दिला. भारतामध्ये मनुस्मृतीद्वारे स्त्रीयांवर अनेक प्रकारची

बंधने लादली आणि स्त्रीयांवर अनेक प्रकारची धार्मिक बंधने व गुलामगीरी लादली. ती आजही थोड्याफार फरकाने दिसून येतात.

स्त्रीयांवरील धार्मिक अन्याय, अत्याचार व अनिष्ठ रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी कायदे करुन स्त्रीयांमध्ये सुधारणा करण्यासाठी आगरकर, न्या. रानडे, पंडीता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी हिंदू धर्माच्या चौकटीत राहुन सुधारणाचा प्रयत्न केला आहे.

मात्र खऱ्या अर्थाने हिंदूधर्माच्या चौकटीबाहेर विचार करुन वास्तववादी विचार करुन क्रातींबा महात्मा ज्योतीबा फुले यांनी स्त्रीयांना शिक्षण मिळाले पाहिजे, तरच स्त्रीयांना त्यांच्या अधिकाराची जाणीव होईल म्हणून त्यांनी स्त्रीयांसाठी पहिली शाळा पुणे येथे काढून सावित्रीबाई फुले यांना शिक्षक म्हणून शिकविण्यास सांगीतले.

ते म्हणतात,

''विद्ये विना मती गेली! मती विना निती गेली!!
नितीविना गती गेली ! गतीविना वित्त गेले !
वित्त विना शुद्र खचले ! इतके अनर्थ एका अविद्येने केले!''

या सर्वांचा मागे कारण अविद्या म्हणजे अज्ञान निरक्षरता आहे. त्यासाठी त्यांनी महिलांसाठी शिक्षण, विद्या देण्याचे कार्य प्रत्यक्षपणे सुरु केले. तसेच कुमारी माता बालसंगोपण गृह, विधवा विवाह मंडळ स्थापन केले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९८ मध्ये पुणे येथे विधवा महिलांसाठी 'महिलाश्रम' संस्था लेडी नॉर्थकीट, पंडिता रमाबाई व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने सुरु केली. यानंतर महर्षी कर्वे यांनी १९०७ मध्ये पुण्यातच महीला महाविद्यालय सुरु केले.

जपानी महिला विद्यापीठाचा १९१५ मध्ये अभ्यास करुन १९१६ मध्ये मुंबई येथे स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन केले. आज एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई या नावाने सुरु आहे. यामुळे स्त्री शिक्षणास गती मिळाली.

राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात मुलींना शिक्षण देण्यासाठी म. फुले हे गुरु मानून मुलींच्या शाळा काढल्या, शिक्षकांना जास्त पगार देऊन नेमणूक केली. मुलींच्या शाळेत ज्या शिक्षकांच्या विषयांच्या जास्त मुली पास होतील त्यांना बक्षिस व पगार वाढ दिली जात असे. त्यांनी मुलींसाठी अनेक शाळा सुरु केल्या. विधवा महिलांचे विवाह करुन दिले.

कौटुंबिक हक्क कायदा १९१६ मध्ये केला. तसेच महिलांच्या विकासासाठी व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरु केली. तसेच आंतरजातीय १०० विवाह लावून दिले. स्त्रीयांना स्वातंत्र्य समता, न्यायासाठी कठोर कायदे केले व त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या वतीने मुलींसाठी शाळा, महिलांसाठी महाविद्यालय, तसेच आय.टी.आय. सुरु केल्या त्या आजही आहेत. कमवा शिका योजना सुरु करुन मुलींना शिकण्यास प्रोत्साहन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या मनुस्मृतीने स्त्रीयांना गुलाम केले, अन्याय अत्याचार केले, स्त्रीयांचे शोषण करुन हक्क व न्यायापासून वंचीत ठेवले त्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर, १९२७ मध्ये रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे दहन केले व स्त्री मुक्ती चळवळीला दिशा खऱ्या अर्थाने दिली. स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रीयाच पुढे आल्या पाहिजेत. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भर होता. त्यांनी २८ मार्च १९३४ मध्ये अस्पृश्य महिला परिषद, १६ जुन १९३६ मध्ये देवदासी, मुरळी जोगतीणी, पोतराज परिषद (परळी), १९४४ मध्ये महीला परिषद (कानपूर), तर १९४५ मध्ये महिला परिषद, मुंबई या परिषदा घेऊन खऱ्या अर्थाने महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी ठराव मंजुर केले. या माध्यमातून महिलांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करुन दिली.

या ठरावामध्ये मुलींना विशेष व जादा सवलती शाळा, कॉलेज विद्यापीठात मिळाव्यात. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने समतेचा, मालमत्तेचा, पनुर्विवाहाचा, वडीलोपार्जित मालमत्तेचा, शिक्षणाचा, स्वातंत्र्याचा, न्याय मागण्याचा, राजकीय सहभागाचा, मतदानाचा, राजकीय प्रतिनिधीत्व, विधीमंडळ, संसद व पंचायतराजमध्ये प्रतिनिधीत्व मिळविण्याचा तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणाचा आणि शासकीय सेवेत नोकरीचा हक्क मिळविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. तसेच पोटगी मिळविण्याचा, दत्तक मुल घेण्याचा हक्क मिळाला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या हक्क, स्वातंत्र्य, न्यायासाठी व त्यांच्या विकासासाठी, भारतीय राज्य घटनेत मुलभूत हक्काची तरतुद केली तसेच त्यांच्या विकासासाठी व पुरुषाच्या बरोबरीने न्याय हक्क मिळविण्यासाठी, राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वाची तरतुद केली.

म. गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांना सहभागी केले होते. म. गांधीच्या प्रेरणेने १९२७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषद स्थापन केली. या परिषदेने स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. म. गांधी यांच्या स्वातंत्र्य आंदोलनामधील स्त्रीयांनी स्त्रीयासाठी विविध संस्था स्थापन करुन स्त्रीच्या प्रश्नांवर त्यांच्यामध्ये जागृती करण्याचे कार्य केले. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्रीवादी चळवळीचा पाया भक्कम उभा राहिला.

स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी चळवळ:

डॉ. बाबासाहब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रीकेत सर्व नागरीकांस स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता प्रस्थापित करण्याचे वचन दिले. घटनात्मक पुनर्विलोकनाचा अधिकार याद्वारे स्त्री सुधारणेस, स्त्री सबलीकरण, स्त्री सक्षमीकरणास आपोआपच संधी प्राप्त करुन दिली. त्यासाठी विविध तरतुदी केल्या.

त्यामुळे भारत सरकारने स्त्रीयावरील अन्याय, अत्याचार प्रतिबंधक कायदे केले. विकासासाठी व त्यांच्यामध्ये हक्क, स्वातंत्र्य, समता व न्यायासाठी विशेष तरतुदी केल्या. स्त्रीयांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाठी दारे खुली केली.

स्त्री मुक्ती संघटनेचे कार्ये:

स्वातंत्र्यानंतर १९७० च्या दशकामध्ये जगभरात स्त्रीमुक्ती, स्त्री सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहु लागले. मात्र सरकारने प्रखरतेने कायद्याची अंमलबजावणी प्रभावी केली नाही. भारतात व विशेषत: महाराष्ट्रात प्रमिला दंडवते, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे या समाजवादी महिलांनी विविध आदोलने केली.

याच काळात महिलांवरील पोलीस कोठडीत पोलीसाकडून बलात्कार घटनेच्या विरोधात मोर्चे काढुन आयपीसी आणि सीआरपीसी कायद्याने सुधारणेची मागणी केली. शासनाने महिलांच्या स्त्री प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी विविध विद्यापीठात स्त्री अभ्यास केंद्रे स्थापन केली. संयुक्त राष्ट्र संघटनेने जगाचे लक्ष स्त्रीयांच्या प्रश्नांकडे वेधण्यासाठी १९७५ हे वर्षे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले. स्त्रीयांच्या प्रश्नांचा आढावा घेवून स्त्रीयांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे असे घोषित केले.

याचा काळात महिला संघटना भारतात व महाराष्ट्रात स्थापन झाल्या. विविध महिला परिषदा झाल्या. स्त्रीवादी चळवळीला अधिक ताकद मिळाली. महिलांसाठी काम करणाऱ्या विविध संघटनाना कार्य करण्यास शासनाने अनुदान देण्यास सुरुवात केली.

विविध क्षेत्रातील विविध जातीतील, धर्मातील आणि संस्कृतीमधील महिला वेगळ्या असल्या तरी स्त्री म्हणून जे जे. प्रश्न आहेत ते सोडविण्यावर स्त्रीवादी संघटनांनी भर दिला.

२.२.१.४ : १९८० नंतर स्त्रीवादी चळवळीला गती :

भारतीय राजकारण हिंदुत्ववाद जातीभेद अस्थिरचेचे राजकारण, प्रादेशिक असमतोल इत्यादीमुळे प्रभावीत झाले होते. मात्र स्त्रीयांचे प्रश्न याच काळात वाढत गेले. १९८० मध्ये स्त्री प्रश्नांवर एस.एन.डी.टी. विद्यापीठात महिला परिषद घेतली. वाढते बलात्कार व अत्याचार यावर चर्चा झाली. खासदार प्रमिला दंडवते यांनी लोकसभेत याविषयी आवाज उठविला. राष्ट्रीय महिला आयोग स्थापन व्हावा यावर चर्चा झाली व राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यास मंजूरी मिळाली.

कॉ. गोविंद पानसरे यांनी मोलकरणीच्या प्रश्नांवर तसेच बाबा आढाव यांनी देवदासी प्रथे विरोधात तर सिमा साखरे यांनी परितक्त्या स्त्रीयांवर अन्यायाविरोधात आवाज उठवून आंदोलन केले.

जागतिकीकरण आणि स्त्रीवादी चळवळ :

जगात १९९१ मध्ये रशियाची महासत्ता कोसळली व अमेरिकेच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जगात सत्ता निर्माण झाली. अमेरिकेने जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण जगातील सर्व देशावर सक्तीने लादले. यास भारतही अपवाद नव्हता.

या धोरणामुळे देशातील स्त्री सुधारणेला कात्री लागली. आरक्षणाला कात्री लागली तसेच देशातील सार्वजनिक उद्योगधंदे व महामंडळ यांचे खाजगीकरणास सुरुवात झाली.

भांडवलशाही व्यवस्थेत भोगवाद व चंगळवादी संस्कृती निर्माण झाल्यामुळे स्त्रीयांना वस्तु म्हणून मानले गेले. त्यामुळे पुन्हा स्त्रीयांवर अन्याय अत्याचार वाढले. त्यामुळे पुन्हा स्त्रीयांना पंचायतराज मध्ये ३३% आरक्षण देण्याची मागणी मंजुर झाली. ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. स्त्रीयांचे सक्षमीकरण, स्त्री सबलीकरणासाठी स्त्रीवादी चळवळी एकत्र येऊन शासनापुढे आंदोलने केली. यामुळे शासनाने स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी विविध योजना मंजूर केल्या.

२.२.१.५ : स्त्रीवादी चळवळीचे मुल्यमापन व निष्कर्ष:

थोडक्यात, भारतीय राज्यघटनेमुळे स्त्री सुधारणेचा व स्त्रीयांच्या स्वातंत्र्य व न्याय व समता याला घटनात्मक स्थान मिळाले, त्यापुर्वी विविध समाज सुधारकांनी स्त्री सुधारणा व विकास करण्यासाठी प्रयत्न केले. या विविध स्त्रीवादी संघटनेने स्त्री प्रश्नांवर आवाज उठवून सरकार विरोधात आंदोलने केले. त्यांना यश काही प्रमाणात आले. शासनाने कठोर कायदे केले. स्त्रीवादी संघटना व चळवळीना न्यायालयाने न्याय देऊन फार मोठा हातभार लावला. न्यायलयाने वेळोवेळी स्त्री अत्याचाराच्या घटनेवर स्त्रीयांना न्याय देण्याचे कार्ये केले आहे. त्यामुळे आज मग ते तालुका न्यायलय, जिल्हा न्यायालय असो की उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय असो किंवा कौटुंबिक न्यायालय असो तिथे स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची दखल घेऊन स्त्रीयांना न्याय देण्याचे प्रामाणिकपणे कार्य केले जात आहे.

स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी अन्याय अत्याचाराच्या जेथे घटना घडतील तेथे जाऊन सर्व चौकशी करुन शासनाला शिफारस करण्याची कार्य राज्य महिला आयोग व राष्ट्रीय महिला आयोग सातत्याने करीत आहे. त्यामुळे शासनाने नेहमी महिला आयोगाच्या शिफारशीचा स्विकार करुन महिलांच्या न्याय हक्कासाठी कठोर कायदे केलेले आहेत.

२.२.२ विद्यार्थी चळवळ (Students Movement)

प्रस्तावना:

विद्यार्थी चळवळी ही केवळ शैक्षणिक मागण्यासाठी लढाई नसुन विद्यार्थी चळवळ ही राष्ट्राच्या उभारणीची, समाज आणि परिवर्तनाची सदृढ लोकशाही समाज घडविण्याची एक शक्तीशाली चळवळ आहे. कारण भारतामध्ये आणि जगामध्ये सुद्धा ज्या ज्या विविध ज्वलंत प्रश्नांसाठी लढे किंवा देशाच्या स्वांतत्र्याचे आंदोलने व चळवळी झाल्या त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात तर भगतसिंग, राजगुरु, सुखदेव अशाप्रकारची किती तरी विद्यार्थ्यांची उदाहरणे आपल्याला देता येतील.

जगात जी मार्क्सवादी विचारांची क्रांती झाली. या मार्क्सवादी कामगार संघटनांनी कामगाराचे लढे उभारले आहेत. समाजवादी विचारांची लढे झाले त्यामध्येही विद्यार्थ्यांनी व युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. आजही भारतात जे शेतकरी दलित, आदिवासी, स्त्रीया, कामगार यांचे प्रश्न सोडविण्यासाठी युवकांचा व विद्यार्थ्याचा सक्रीय सहभाग असलेला दिूसन येतो.

दक्षिण भारतात पेरियार यांनी ब्राह्मणेत्तर चळवळ उभी केली या आंदोलनात व चळवळीत मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्याचा सहभाग होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितावरील अन्याय, अत्याचार, अनिष्ट, प्रथा, परंपरा, जातीभेद या विरोधात जी महाड चवदार तळे सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, शेतकरी, खोत पद्धती लढा, कामगाराचा लढा, महिलांचे लढे या सर्व आंदोलनामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, युवक सहभागी झालेले होते. त्यामुळे भारतातील सत्ताधारी पक्षाचे जे विद्यार्थी, युवक विरोधी धोरणाविरोधात युवक व विद्यार्थी वर्ग रस्त्यावर उतरत आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणाविरुद्ध नीट पेपर फुटी प्रकरणात शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागण्यासाठी शेवटी काक्रोच जनता पार्टी ऑनलाईन लाखो विद्यार्थ्यांच्या सह्या घेत आहेत.

२.२.२.१ विद्यार्थी चळवळीचीं आवश्यकता:

भारतामध्ये कॉलेज व विद्यापीठ तसेच विविध व्यावसायियिक कॉलेज आणि खाजगी विद्यापीठे येथे वाढती प्रवेश फी, तसेच इतर फी, देणगी, प्रवेश नियम, प्रवेशासाठी राखीव जागाची तरतुद, विद्यार्थ्यांमध्ये जातीभेद, स्पर्धा परिक्षेची वाढती परिक्षा फी, उशीरा निकाल, प्रश्नपत्रिका परिक्षेपुर्वी फुटण्याचे वाढते प्रकार, दुबार परिक्षेचे वाढते प्रमाण, परीक्षा पुढे ढकलण्याचे किंवा रद्द होण्याचे प्रमाण, शिक्षकांच्या रिक्त जागा, शिक्षणाचे खाजगीकरण, शिक्षणाचे जागतिकीकरण आणि बाजारीकरण तसेच शिक्षणाची ढासळत चाललेली गुणवत्ता, भ्रष्टाचारी शिक्षण व्यवस्था, शाळा, कॉलेज बंद पडण्याचे धोके अपुरे विद्यार्थ्यांची वसतीगृहे, अपुऱ्या सोयी, सुविधा, विद्यार्थ्यांचे शाळा कॉलेजमध्ये होणारे मानसिक व आर्थिक शोषण आणि विद्यार्थ्यांच्या विरोधातील शासनाचे शैक्षणिक धोरणे इत्यादी प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच विद्यार्थ्यावरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी विद्यार्थी संघटना व विद्यार्थी चळवळीची आवश्यकता आहे.

विद्यार्थी चळवळ म्हणजे सामाजिक, राजकीय किंवा शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येून उभारलेला सामुहिक लढा किंवा धोरण होय. जगातील सर्वच देशाच्या इतिहासात आणि समाजात समता व सामाजिक न्याय प्रस्थापीत करण्यासाठी सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन प्रत्येक लढ्यात पुढाकार घेतलेला आहे.

मात्र खऱ्या अर्थाने विद्यार्थी चळवळ म्हणून अमेरिकेमध्ये १९६० च्या दशकात मुक्त भाषण चळवळ (Free Speech Movement) असो, व्हिएतनाम युद्धाला विरोध आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जगाचा पटलावर शैक्षणिक रणांगणात पुढे आलेली आहे.

२.२.२.२ भारतातील विद्यार्थी चळवळ:

भारतामध्ये १५० वर्षापुर्वी दादाभाई नौरोजी यांनी १८४८ मध्ये Students Scientific and Histroic Society (स्टुडंटस् सायंटिफीक अँड हिस्टोरीक सोसायटी) या नावाने कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा एक गट किंव समुह बनविला होता. आठवड्यातून दोन वेळा एकत्र येऊन विविध विषयावर चर्चा करणे असे स्वरुप होते.

ब्रिटीश काळात किंग एडवर्ड मेडीकल कॉलेज, लाहोर येथील विद्यार्थ्यांनी वर्णभेदा विरुद्ध यशस्वी केलेले आंदोलन हि खऱ्या अर्थाने भारतातील विद्यार्थी चळवळीची सुरुवात म्हणता येईल.

भारतातील स्वातंत्र्य आंदोलन, अहसकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन, भारत छोडो आंदोलन, सुंदरलाल बहुगुणा यांचे चिपको आंदोलन, आणीबाणी विरोधी आंदोलन, जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाविरोधी आंदोलन, भ्रष्टाचार निर्मुलन आंदोलन, अंधश्रद्धा निर्मुलन आंदोलन या विविध आंदोलनात विविध विद्यार्थी संघटना व विद्यार्थी चळवळीनी पाठींबा दिला व प्रत्यक्षात सहभागी झाल्या. मात्र पेरीयार रामास्वामी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनात युवकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. मात्र या काळात विद्यार्थी संघटना भारतात निर्माण झालेल्या नव्हत्या.

आज जवळजवळ स्वातंत्र्यानंतर ८० वर्षे होत आहेत. मात्र भारतात सामाजिक व आर्थिक लोकशाही शोषणमुक्त, समतावादी व समाजवादी अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय अजुनही खऱ्या अर्थाने निर्माण झालेला नाही. भारतात राजकारणातील घराणेशाहीचा वारसा पुर्वी कॉंग्रेसपुरता, गांधी घराण्यापुरताच होता. मात्र आज भाजपमध्येही वडील, मुलगा, नातु, सुन, मुलगी राजकारणात दिसून येत आहेत. त्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) किंवा राष्ट्रवादी अजितदादा गट तसेच शिवसेना दोन्ही गट अपवाद नाहीत.

आज सत्तेच्या मैदानात राज्यकर्त्याचे मुले, मुली, जावई, सुन प्रादेशिक राज्याच्या राजकारणात किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेत युवा नेते, युवा शक्ती, युवा नेतृत्व म्हणून कॉंग्रेस, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी व इतर राजकिय पक्षही समाजाची मान्यता मिळवित आहेत.

आज समाजात गरीबी, बेरोजगारी, खाजगी शिक्षण, उद्योगाचे खाजगीकीकरण, ए.आय. म्हणजे कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे तरुणाच्या रोजगारावर झालेला परिणाम, महागाईचा तरुण व विद्यार्थ्यांवर होणारे दुरगामी परिणाम, यामुळे तरुण वर्ग शासनावरच्या धोरणावर नाखूष आहे.

निवडणूकीत दबाव व ई.व्ही.एम.व इ.व्ही.एम बदलाच्या मागणीमुळे व सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश मा. न्या. सुर्यकांत यांनी सत्ताधारी भाजप पक्षाची सहानुभुती घेण्यासाठी एका प्रकरण सुनावणीवेळी विद्यार्थी, युवकांना झुरळ म्हटले त्यामुळे या भ्रष्ट व्यवस्थेवर नाराज युवकांनी काक्रोच जनता पार्टीची स्थापन केली.

२.२.२.३ भारतातील विद्यार्थी संघटना:

स्वातंत्र्योत्तर काळापुर्वी काही विद्यार्थी संघटना स्थापन झाल्या होत्या. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात मात्र भारतीय घटनेतील कलम १९ नुसार प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या पक्षात युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढविण्यासाठी विद्यार्थी संघटना स्थापन केल्या.

प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या पक्षाच्या विचारसरणी व तत्त्वज्ञानाशी सुसंगत धोरणानुसार विद्यार्थी संघटना स्थापन केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) NSUI- National Students Union of India:

एनएसयुआय ही भारतीय कॉंग्रेसने विद्यार्थ्यांची संघटना स्थापन केली. तत्कालीन पंतप्रधान मा. इंदिरा गांधी यांनी केरळ विद्यार्थी संघ आणि बंगाल राज्य छात्र परिषद यांचे विलीनीकरण करुन NSUI या संघटनेची निर्मिती केली. सध्या ही संघटना संपुर्ण भारतात विद्यार्थी संघटना म्हणून कार्यरत आहे. ही संघटना भारतातील सर्व विद्यापीठ व कॉलेजमध्ये कार्यरत असून या संघटनेने विद्यार्थ्यांचे फी वाढ, स्कॉलरशीप त्रुटी, देणगी तसेच परिक्षेतील गैरप्रकार, प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणे, संस्था चालकाची अरेरावी व विद्यार्थ्यांचे शोषण इत्यादी विरोधात आंदोलने करुन विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य केले आहे.

2) All India Students Federation (AISF):

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने All India Students Federation (AISF) ची स्थापना १२ ऑगस्ट, १९३६ रोजी झाली. खरंतर ही जुनी विद्यार्थी संघटना असून लखनौ येथील गंगाप्रसाद मेमोरियल हॉलमध्ये जगभरातून ९३६ प्रतिनिधी उपस्थिती होते. या परिषदेचे उद्घाटन जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते झाले. या परिषदेचे अध्यक्ष बॅ. मुहम्मुद अली जीना होते. याच लखनौ परिषदेमध्ये AISF या विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली. AISF या विद्यार्थी संघटनेने भारत छोडो आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला.

स्वातंत्र्यानंतर AISF या विद्यार्थी संघटनेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या, साम्राज्यवाद विरोध, सामंतशाही विरोध, विद्यार्थ्यांचे मानसिक व आर्थिक शोषण यावर लक्ष केंद्रित केले. हैद्राबादच्या निझामविरोधी लढ्यात AISF या संघटनेने मध्यवर्ती भूमिका बजावली आहे.

गोवा मुक्ती संग्राम (गोवा स्वातंत्र्य लढा) मध्ये सक्रीय सहभाग घेतला.

भारत सरकारने नेमलेल्या कोठारी आयोगास शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी सूचना शिफारशी देवून सहकार्य केले.

AISF म्हणजे All India Students Federation या संघटनेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास, सोयी सवलती व देणगी स्वरुपात आर्थिक शोषण थांबविणे, शिक्षणाच्या खाजगीकरण व बाजारीकरणास विरोध करणे आणि विद्यार्थी विद्यार्थीनीच्या अत्याचार व आर्थिक शोषणा विरोधात भारतातील सर्वच राज्यातील विद्यापीठात कार्य करीत आहे.

या संघटनेचे बोधवाक्य ''स्वातंत्र्य, शांतता आणि प्रगती'' आहे.

3) SFI- Students Federation of India (SFI):

स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया (एस.एफ.आय.) ही भारतातील एक समाजवादी विचार सरणीवर आधारीत विद्यार्थी संघटना होय.

भारतीय विद्यार्थी चळवळीच्या संघटीत स्वरुपाचा उगम साम्राज्यवादी विरोधी राजकारणाला पुढे ASFI या विद्याथी संघटनेतील गटबाजीतून ३० डिसेंबर, १९७० मध्ये केरळमधील तिरुवंतपुरम येथे SFI विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली.

SFI विद्यार्थी संघटनेचे उद्देश:

१) एस.एफ.आय. या विद्यार्थी संघटनेने प्रगतशील व समता मूल्य शिक्षण व्यवस्था स्थापन करणे.

२) शिक्षण हे सार्वजनिक व मोफत मिळाले पाहिजे.

३) शिक्षणाच्या खाजगीकरण व बाजारीकरणास विरोध करणे

४) शिक्षण संस्था व विद्यापीठातील वाढत्या फी वाढीस विरोध करणे किंवा देणग्या, विकास निधी वसुलीस विरोध करणे.

५) समाजवाद, लोकशाही, सामाजिक न्याय या लोकशाही मुल्यांचा प्रचार व प्रसार करणे.

६) विद्यापीठ व महाविद्यालयात विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आंदोलन करणे किंवा लढे उभे करणे.

राजकीय सहभाग:

* देशातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयात विद्यार्थी संघटन डाव्या विचारावर उभे करणे.
* SFI मधील विद्यार्थी नेतृत्व डाव्या विचारावर तयार करुन कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून नेतृत्वाला राजकारणात संधी देणे.

4) ABVP - अखिल भारतीय विद्यार्थी परिषद :

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) ही भारतातील प्रमुख विद्यार्थी संघटना आहे. आजही भारतातील सर्व विद्यापीठात ही विद्यार्थी संघटना विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य करीत आहे. राष्ट्रीय पुनर्निर्माण आणि हिंदुत्ववाद, देशभक्ती या विचारांवर आधारीत ही संघटना १९४९ रोजी स्थापन झाली.

ABVP ही विद्यार्थी संघटना भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे.

''ज्ञान, शील आणि एकता'' या त्रीसुत्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रीय चारित्र्य रुजविण्यामध्ये कार्य करीत आहे.

प्रमुख उद्देश:

१) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवाद, देशभक्ती निर्माण करणे.

२) छात्रशक्ती ही राष्ट्रशक्ती या विचारातून कार्यकर्ते घडविणे.

३) भारताचा जबाबदार नागरीक घडविणे.

४) राष्ट्रभाषा हिंदी असावी, वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला मान्यता मिळविणे.

५) विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधी आंदोलन करणे.

राजकीय सहभाग:

राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी संघटन उभे करणारी ही विद्यार्थी संघटना असून या संघटनेने विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवाद, देशभक्ती व हिंदूत्ववादी विचारसरणी रुजविण्याचे कार्य केले. त्यामुळे भाजपमध्ये युवा संघटन मोठ्या प्रमाणात उभे राहिले.

आज भाजपमध्ये जे नेतृत्व उभे राहीलेले आहेत ए.बी.व्ही.पी. या विद्यार्थी संघटनेतून निर्माण झालेले आहे.

२.२.२.४ समारोप व सारांश:

भारतामध्ये स्वातंत्र्यासाठी जो लढा व आंदोलन सुरु झाले या आंदोलनात युवकांनी व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यानंतर मराठवाडा मुक्ती संग्राम, गोवा मुक्ती संग्राम या ही आंदोलनात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. भारतामध्ये आतापर्यंत अन्याय अत्याचार विरोधात लढे झाले त्या लढयात, आंदोलनात युवक व विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तपणे सक्रिय सहभाग घेतला. महाराष्ट्रात ज्या ज्या सामाजिक चळवळी व आंदोलने झाली त्याही आंदोलनात सक्रिय सहभाग विद्यार्थी व युवकांनी घेतला व डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे नांव मराठवाडा विद्यापीठाला द्या यासाठी नामांतर चळवळीत लाखोच्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्याचे फी वाढ, देणगीची सक्ती, विकास निधीची वसुली, परिक्षेतील गोंधळ, प्रवेशासाठी आरक्षण कोठा, वसतीगृहाची सोयी सुविधा, कॉलेजमधील सोयी सुविधा, परिक्षा पद्धतीतील सुधारणा, निकालातील गोंधळ, विद्यार्थ्यांचे मानसिक व आर्थिक शोषण व रॅगींग विरोधात विद्यार्थ्यांच्या संघटनांची व चळवळीची आवश्यकता भासली.

त्यामुळे एस.एफ.आय., ए.आय.एस.एफ., एन.एस.यु.आय., ए.बी.व्ही.पी., बहुजन विद्यार्थी परिषद, पुरोगामी विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र विद्यार्थी सेना, सम्यक विद्यार्थी आंदोलन, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, युवक क्रांती दल, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना, मनसे विद्यार्थी संघटना इत्यादी विद्यार्थी संघटनेने विद्यार्थ्यावरील शैक्षणिक क्षेत्रातील होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात आंदोलन केले व त्यांच्या अडीअडचणी सोडविल्या आहेत.

२.२.३ अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ:

प्रस्तावना :

अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ हि चळवळ समाज प्रबोधन, विज्ञानवाद, विवेकवाद, मानवतावाद आणि मानवी हक्कांच्या रक्षणाशी जोडलेली चळवळ आहे. महाराष्ट्रात डॉ. नरेंद्र अच्युत दाभोळकर यांनी समाजातील अनिष्ट सामाजिक प्रथा, परंपरा व विविध स्वरुपाचा श्रद्धेच्या नावाखाली सुरु असलेल्या अंधश्रद्धांच्या निर्मुलनासाठी १९८९ साली समविचारी कार्यकर्त्यांना एकत्र करुन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती हि संघटना स्थापन केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतासाठी अतिशय सुलभ, सोप्या शब्दात भारतीय राज्यघटना लिहून भारतीय समाजातील अंधश्रद्धा, विविध अनिष्ट अमानवी प्रथा परंपरा नष्ट केल्या आहेत. भारतीय संविधानात कलम ५१ (क) मध्ये मुलभूत कर्तव्यामध्ये ''वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्तीचा विकास करणे'' हे भारतातील प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

भारतातील नागरीकांना कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्य देऊन कोणत्याही धर्माचे आचरण, पालन करण्याचा व प्रसार करण्याचा मुलभूत अधिकार दिला आहे. मात्र धर्म स्वातंत्र्यांचा अधिकार हा वैयक्तिक अधिकार असून सार्वजनिक ठिकाणी हा अधिकाराचा वापर करता येणार नाही. तसेच हा अधिकार कायदा व सुव्यवस्थेच्या आड येणार नाही याची काळजी प्रत्येक नागरीकांनी घेणे आवश्यक आहे. मुलभूत कर्तव्यानुसार समाजातील अंधश्रद्धा व अनिष्ट प्रथा परंपरा आणि अमानवी प्रथा नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ कार्य करीत आहे.

पंचसुत्री :

२.२.३.१ वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करणे –

वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करणे म्हणजे कोणतीही गोष्ट किंवा घटना घडते त्यामागील कार्यकारणभाव लक्षात घेणे होय. समाजात तर्कशुद्धपणा, कार्य-कारणभाव समजुन घेण्याची वृत्ती वाढविणे आणि वैज्ञानिक व विवेकवादी, बुद्धीवादी दृष्टिकोन अंगीकरण्यासाठी लोकांमध्ये प्रबोधन करणे. समाजात जे भोंदू लोक सामान्य लोकांची श्रद्धेच्या नावाखाली फसवणूक करतात त्यांचे प्रबोधन करणे.

२) शोषण व फसवणूक करणाऱ्या अंधश्रद्धाना विरोध करणे –

समाजातील भोळ्या भाबड्या व सामान्य लोकांचे शोषण व फसवणूक करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे हे सुत्र अत्यंत महत्त्वाचे असलेले दिसून येते. भारतीय समाजात चातुवर्ण्य पद्धती, जातीव्यवस्था जातीभेद, पोटजाती, विविध प्रकारची उच्च निच्चता यामुळे वरीष्ठ, उच्च वर्णीय, उच्च जातीय लोकाकडून खालच्या वर्णाचे व खालच्या जातीचे शोषण करताना अंधश्रद्धेच्या सर्वात जास्त बळी भारतीय महिला असल्याचे निर्दशनास आलेले आहे. आजही बहुजन समाजातील स्त्रीयांच्या अंगात येणे, भानामती, मुरळीप्रथा, देवदासी प्रथा, भोंदूबाबाला बळी पडण्याचे प्रमाण हे स्त्रीयामध्ये जास्त आहे. या महिलांना या अंधश्रद्धेमुळे आपली मानसिक फसवणूक झाली किंवा शोषण होत आहे याचे भान किंवा जाणीव नसते.

त्यामुळे अशा शोषण व फसवणूक करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करण्यासाठी समाजात प्रबोधन करणे हे महत्त्वाचे सूत्र या चळवळीचे आहे.

३) धर्माची विधायक चिकित्सा करणे –

हे सूत्र अतिशय भावनीक व वादग्रस्त आहे. मात्र धर्माची चिकित्सा करणे मात्र ती विधायक. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे संविधानानाने सांगितल्याप्रमाणे धर्म हि खाजगी बाब असुन सरकार किंवा प्रशासनाला किंवा शासकीय संस्थेला कोणताही धर्म असणार नाही.

अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ/समिती धर्मातील जुन्या, कालबाह्य आणि मानवी हक्काचे उल्लंघन करणाऱ्या, महिलांचे शोषण करणाऱ्या रूढी, प्रथा परंपराची तर्कसंगत व विधायक स्वरुपाची चिकित्सा करुन मानवी मुल्यांना, लोकशाही मुल्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत आहे.

४) समविचारी संघटनाशी जोडून घेणे–

समाजामध्ये ज्या ज्या संघटना चळवळी समाजातील अन्याय, अत्याचार किंवा जातीभेद विरुद्ध सामाजिक विषमतेविरुद्ध समाजातील महिलांच्या शोषणाविरुद्ध व लोकशाही मुल्यासाठी काम करीत आहेत. त्या सर्वच चळवळीस आपल्या सोबत अंधश्रद्धा निर्मुलनासाठी जोडून घेणे हे सुत्रही संघटना कार्यासाठी महत्वाचे आहे.

समाज प्रबोधनाच्या कार्यातील सर्व पुरोगामी चळवळीस जोडून घेणे हे सुत्र महत्वाचे आहे. ज्यामुळे अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत जाईल.

५) संत आणि समाज सुधारकाच्या विचारांचा वारसा जतन करणे–

भारतामध्ये विशेषत: महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखा, संत एकनाथ तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगे महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज, संत कबीर, म. फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा जतन करण्याचे व अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीची वाटचाल करण्याचे कार्य करीत आहे.

महाराष्ट्रातील सर्व वारकरी संप्रदायातील संतानी समाज प्रबोधन व समाजातील अंधश्रद्धा निवारण करण्याचे कार्ये केलेले आहे. त्यामुळे त्या सर्व राष्ट्रसंताच्या आणि समाज सुधारकाच्या विचाराचा वारसा जतन करण्याचे कार्ये करणे म्हणजे अंधश्रद्धा निर्मुलन समिती/चळवळीच्या कामाला हातभारच होय.

२.२.३.२ अंधश्रद्धा समितीचे समाज प्रबोधनपर उपक्रम :

१) विवेक वाहीनी :

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांसाठी चालविला जाणारा अंधश्रद्धा निर्मुलन समितीचा विशेष उपक्रम म्हणजे विवेक वाहिनी होय. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी युवा पिढीमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवाद रुजविणे, त्यांच्यात लोकशाही मुल्य रुजविणे, सामाजिक बांधीलकी व संविधानप्रती आदर निर्माण करण्यासाठी हा विवेक वाहिनी हा उपक्रम सुरु केला आहे. विवेक वाहीनीच्या माध्यमातून समाज उपयोगी वैज्ञानिक दृष्टीकोन, तर्कशुद्ध विचार निर्णय क्षमता, संवाद कौशल्ये, लोकशाही मुल्ये, सामाजिक समस्या, समाजातील व भोंदुबाबाचे चमत्कार, अघोरी प्रथा परंपरा, व्यसनाधिनता, हुंडाबळी, ऑनर किलींग, जातीभेद, संप्रदायिकता इत्यादी समाज प्रबोधनकार कार्यक्रम शाळा कॉलेजमधुन आयोजित करुन वैज्ञानिक दृष्टीकोन युवा पिढीत रुजविण्याचे कार्य केले जात आहे.

२) विज्ञान बोध वाहिनी–

या उपक्रमातंर्गत शाळा किंवा गावाशी संपर्क साधून नियोजन केले जाते. ठरलेल्या दिवसी त्याठिकाणी पर्यावरण, आरोग्य, अंधश्रद्धेवर पुस्तक, प्रदर्शन व पोस्टर्स प्रदर्शन, टेलीस्कोपने ग्रहतारे निरीक्षण, लघु फिल्म शो, चमत्काराचे प्रयोग इ. उपक्रम करुन अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते प्रबोधन करीत असतात.

३) आकाश निरीक्षण–

सामान्य लोकांमध्ये आजही राशीचक्र, विविध ग्रहे, फलज्योतिष, तसेच ग्रहानुसार शुभ–अशुभ, जन्मकुंडली इत्यादीमुळे समाजात अंधश्रद्धा निर्माण होत आहेत. त्यामुळे ह्या प्रकारच्या अंधश्रद्धा निवारण करण्यासाठी टेलीस्कोप, फिरते तारांगणद्वारे समाजात होणाऱ्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी समाज प्रबोधन केले जाते.

४) शिक्षक प्रशिक्षण शिबीरे–

जिल्हा परिषदेच्या परवानगीने शिक्षकांसाठी अंधश्रद्धा निर्मुलन शिबीर किंवा वैज्ञानिक जाणीवा शिबीरे आयोजित करण्याचे कार्ये अंधश्रद्धा निमुर्लन समिती करीत असते.

या शिबीराद्वारे शिक्षकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याचे कार्ये करीत आहे.

५) वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प–

प्राथमिक शाळेतील ४ ते ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीवा निर्माण करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ अशाप्रकारचे प्रकल्प आयोजित करीत असते.

६) भोंदू महाराजांना पकडणे –

समाजात चमत्काराच्या नावाखाली महिलांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण करणाऱ्या किंवा नरबळी, भूतपूजा, पुर्वजाची पुजा करवून घेणाऱ्या भोंदू महाराजांना पकडून देणे, पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्यावर कार्यवाही करणे असे कार्य अंधश्रद्धा निर्मुलन समिती करीत आहे.

७) अंनिस वार्तापत्र–

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे 'अंनिस वार्तापत्र' हे सांगली येथे प्रकाशित होत असून वार्तापत्राचे प्रमुख मा. राहुल थोरात गेली अनेक वर्ष काम पहात आहेत. या वार्तापत्रामध्ये अंधश्रद्धेमुळे भोंदु महाराज पकडल्याच्या बातम्या, अंधश्रद्धा निर्मुलनासंबंधी लेख, कार्यशाळा, कार्यकर्त्यांची शिबीरे, चमत्काराचे प्रयोग, अंनिस कार्यकारीणी, अंनिस कार्यकारिणी सदस्य इ. ची यादी व महाराष्ट्रातील महत्वाच्या घडामोडी इत्यादीची माहिती यामध्ये आहे.

८) श्रद्धा आणि अंधश्रद्धा –

अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा अभ्यास करीत असताना श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामध्ये काय फरक आहे हे आपण समजून घेतले पाहिजेत.

खरंतर श्रद्धा आणि अंधश्रद्धेचे शिक्षण भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात झालेले आहे. मात्र श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्या व्यक्तीसापेक्ष, कालसापेक्ष, स्थळसापेक्ष आहेत.

या घटनेला कार्यकारण भाव असतो. निश्चित घटना घडण्यामागे पुरावा असतो. त्यामुळे व्यक्तीचा विश्वास निर्माण होतो. उदा. बटन दाबल्यास टी.व्ही. चालु होतो, बल्ब लागतो किंवा ए.सी. चालु होतो. अशा घटनेमागे विज्ञान असणे व कार्यकारण भाव असतो.

मात्र श्रद्धा म्हणजे ज्या घटनेला कोणताच पुरावा नसतो मात्र श्रद्धेचे समर्थन मात्र केले जाते. उदा. देवाच्या पाया पडणे, नवस करणे, मंदीर उभे करणे यामुळे आपल्या इच्छा पुर्ण होऊ शकतात. अशा श्रद्धा समाजात निर्माण होतात. मात्र याला कोणताही पुरावा नसतो किंवा यामागे कोणतेही विज्ञान नसते. देव, भूत, भोंदूगिरी करणारा बाबा महाराज, इत्यादी बीबींची सत्यता, सत्य पडताळून पाहिले जात नाही. पुढे देव, भूत, भोंदू महाराज इत्यादी वर अंधपणे टाकलेला विश्वास ह्या पुढे अंधश्रद्धा निर्माण होतात.

कोणतीही श्रद्धा ही अंधश्रद्धाच असते असे डॉ. नरेंद्र दाभोळकर म्हणतात, यानंतर आपण श्रद्धा व अंधश्रद्धेबाबत खालील निकष अभ्यासणे आवश्यक आहे.

१) सत्याच्या निकषावर स्वत:ला तपासण्यास जी नकार देणे ती अंधश्रद्धा असते.

२) श्रद्धा ही माणसाला भिती किंवा मोह या दोन बाबींवर मात करण्यास मदत करते.

३) डोळसपणे चिकीत्सा करुन विवेकानुसार विचार करायला प्रतिबंध करते, ती अंधश्रद्धा होय.

४) इतरांवर भावनिकरित्या विवेकाला बाजुला ठेवून विचार करायला लावते ती श्रद्धा असली तरीही ती अंधश्रद्धाच असते.

५) विज्ञानाला मान्यता न देता चमत्काराला व रुढी प्रथा परंपरेला महत्व देणारी अंधश्रद्धाच असते.

२.२.३.३ देव आहे की नाही –

अंधश्रद्धा निर्मुलन समिती वैज्ञानिक दृष्टीकोन व मानवतावाद व संविधानवाद आणि वैचारीक स्वातंत्र्य याला मध्यवर्ती मानुन कार्य करीत आहे. महत्वाचे म्हणजे जेथे विज्ञान सुरु होते, तेथे देव, धर्म, रुढी, प्रथा याला महत्व नसते. त्यामुळे ही समिती धर्माला देवाला सकारात्मकरित्या विरोध करीत नसली तरी देव, धर्म यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या अनिष्ट प्रथा, परंपरा, रुढी आणि अंधश्रद्धा, भोंदुगिरी यांना मानत नाही.

अंधश्रद्धा निर्मुलन समितीने हे घोषित केले की, अंनिस कोणत्याही देव, धर्माविरोधात नाही तर देव धर्माच्या नावावर सुरु असलेल्या अंधश्रद्धा, भोंदूगिरी करणारे महाराज, फसवणूक व अंधश्रद्धेतून होणारी लोकांची फसवणूक यांच्या विरोधात ठाम भूमिका घेवून काम करीत आहे.

२.२.३.४ अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा विरोधी कायदा, २०१३ –

अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष मा. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना महाराष्ट्रात अंधश्रद्धेमुळे समाजात खुप मोठ्या प्रमाणात भोंदूगिरी, भोंदू महाराज, देवदासी, जोगत्या, जटा प्रथा, अंगात

देव येणे, करणी करणे, देवाला नरबळी देणे, देवाला नवस करणे, भोंदू महाराजाकडून चमत्काराच्या नावाखाली होणारी महिलांची फसवणूक थांबविण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन समाजात रुजविण्यासाठी महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मुलन कायदा मंजूर करावा यासाठी आग्रह धरला.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची हत्या २० ऑगस्ट, २०१३ रोजी झाली. त्यानंतर लोकांचा असंतोष कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २१ ऑगस्ट, २०१३ रोजी या कायद्याचा अध्यादेश काढला. यानंतर डिसेंबरमध्ये विधीमंडळाची मंजूरी मिळाली आणि या विधेयकास २० डिसेंबर, २०१३ रोजी राज्यापालानी स्वाक्षरी करुन मान्यता दिली आणि अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा विरोधी कायदा २०१३ हा कायदा मंजूर झाला.

अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा विरोधी कायदा हा समाजातील अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा व पिशाच्च बांधा, करणी, अंगात देव येणे, भोंदु बाबा कडून महिलांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण, भोंदुगिरी करणाऱ्या बोगस महाराजाचे चमत्काराचे वाढते प्रकार व भोळ्या भाबड्या लोकांचे वाढते शोषण व वाढते अंधभक्त इत्यादीला आळा आणि प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांना कायदेशीर प्रतिबंधात्मक अटकेची कार्यवाही करण्यासाठी हा कायदा मंजूर करण्यात आला.

खरंतर आजही कायदा होऊन सुद्धा अघोरी प्रथा व जादुटोणा आणि भोंदूगिरी करणारे ढोंगी महाराज यांना आळा बसलेला नाही.

याउलट अंधश्रद्धा ह्या आमच्या श्रद्धा आहेत व महाराजाच्या भोंदूगिरीला मान्यता देण्याचे अप्रत्यक्ष कार्य आज काही घटकांकडून केले जात आहे. आज भोंदूमहाराजाची भक्तांची संख्या वाढतच आहे आणि भोंदूबाबांना आर्थिक व राजकीय मदत करण्याचे अप्रत्यक्ष कार्य समाजांनी काही घटक अप्रत्यक्ष करीत आहेत.

त्यामुळे ज्या कायद्यामुळे समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट, अघोरी व अमानवी प्रथा, भोंदुगिरी महाराजाचे चमत्काराच्या नावाखाली होणारे शोषण थांबणे किंवा त्यांचे प्रमाण कमी होणे आवश्यक होते. मात्र या कायद्याचा म्हणावा तेवढा प्रभाव समाजात पडलेला दिसून येत नाही, उलट भोंदुमहाराजाचे फसवेगिरीचे प्रमाण व भक्तांची संख्या वाढतच आहे. यामध्ये सत्ताधारी व विरोधक राजकीय पक्षाचे कार्यकर्ते सुद्धा अपवाद नाहीत.

२.२.३.५ समारोप व सारांश :

समाजातील धर्म, जात, देव व अघोरी, अनिष्ट अमानवी प्रथा परंपरा यामुळे निर्माण झालेल्या अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष मा. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती २१ सप्टेंबर, १९८९ रोजी स्थापन केली.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य तळागाळातील लोकापर्यंत पोहचविण्यासाठी ७० पेक्षा जास्त पुस्तके आणि अंनिस वार्तापत्र प्रकाशित केले. विविध दैनिक वर्तमान पेपर, मासिके, संदर्भ ग्रंथात लेख लिहिले. वैज्ञानिक दृष्टिकोन व मानवता व अघोरी प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा निर्मुलनासाठी

समाजात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिवेशने, परिषदा घेऊन लाखो कार्यकर्ते तयार केले. शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण व्हावा यासाठी उपक्रम राबविले. विवेक वाहिनीच्याद्वारे कॉलेजमधील विद्यार्थी विद्यार्थीनींमध्ये अंधश्रद्धा निर्मुलनविषयी जनजागृती करुन युवा कार्यकर्ते तयार केले. मात्र अजुनही समाजातील अंधश्रद्धा व देव धर्माच्या नावावर भोंदूगिरी थांबलेली नाही.

२.३ पारिभाषिक शब्द:

१) **स्त्रीवाद:** म्हणजे स्त्रीयांच्या प्रश्नाचा अभ्यास करणारा विचार किंवा स्त्रीयाच्या अन्याय अत्याचाराच्या प्रश्नांवर अभ्यास करुन प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणारा विचार प्रवाह.

२) **घटनात्मक तरतुदी:** भारतीय राज्यघटनेत केलेल्या तरतुदी होय.

३) **मनुस्मृती:** विषमतावादी, बहुजनांना, स्त्रीयांना गुलाम करणारा, स्त्रीया व शुद्राचे अधिकार नाकारणारा ग्रंथ होय.

४) **देणगी:** शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून विकास निधी म्हणून जबरदस्तीने वसुल करणारा निधी किंवा रक्कम होय.

५) **वाढीव फी:** महाविद्यालय व विद्यापीठाकडून दरवर्षी प्रवेश फी वाढवून वसुली करणारी रक्कम.

६) **अंधश्रद्धा:** समाजातील अवैज्ञानिक व अंधपणाने चालु असणाऱ्या अघोरी, अमानवी, अनिष्ट प्रथा परंपरा होय.

७) **भोंदूगिरी:** देव धर्माच्या नावाखाली समाजाचे, महिलांचे चमत्कार करुन आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण करण्यासाठी केलेले प्रयत्न होय.

८) **वैज्ञानिक दृष्टिकोन:** प्रत्येक घडणाऱ्या निसर्गातील घटनेमागे कार्यकारण भाव असतो आणि प्रत्येक घटनेमागे कारणे व पुरावे सिद्ध करण्यास प्रवृत्त करणारा विचार होय.

९) **करणी:** महिलेच्या मानसिकतेचा गैरफायदा घेवून तिला जो त्रास होतो किंवा आजार झाला आहे त्याला एखादा जादुटोणा करणारा व्यक्तीच जबाबदार आहे. त्यानेच काही तरी तुझ्यावर जादू, तंत्रविद्या केली असा भास करुन देणे होय.

१०) **अंगात येणे:** देव, भुत, आत्मा हा अंगात आला आहे असे भासवून त्या प्रकारचे वर्तन करावयास लावणे होय.

२.४ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) स्त्रीयासाठी प्रथम शाळा कोणी सुरु केली
   - म. फुले

२) महिलांच्या विकासासाठी हिंदू कोड बील कोणी मांडले
   - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३) महिलांचे शोषण करणारा ग्रंथ कोणता
- मनुस्मृती

४) आंतरराष्ट्रीय महिला दिन केव्हा साजरा केला जातो.
- ८ मार्च

५) राजर्षी शाहू महाराजांनी कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध कोणता कायदा केला.
- कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, १९१९

६) एन. एस. यु. आय. ही कोणत्या पक्षाची विद्यार्थी संघटना आहे.
- राष्ट्रीय काँग्रेस पक्ष

७) एस. एफ. आय. ही संघटना कोणत्या राजकीय पक्षाची विद्यार्थी संघटना आहे.
- भारतीय कम्युनिस्ट पक्ष

८) ए.बी.व्ही.पी. ही संघटना कोणत्या पक्षाशी संबंधित विद्यार्थी संघटना आहे?
- भारतीय जनता पार्टी

९) अंधश्रद्धा निर्मुलन समिती कोणी स्थापन केली?
- संस्थापक-कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर

१०) अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा मुख्य उद्देश काय आहे?
- समाजातील अनिष्ट प्रक्षा, अघोरी व अमानवी प्रथा नष्ट करणे.

११) अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे दोन उपक्रम सांगा.
१) जटा निर्मुलन
२) विवेक वाहिनी
३) बुवा बाजी विरुद्ध अभियान
४) सॉक्रेटीस व्हाया तुकाराम ते नरेंद्र दाभोळकर पथनाट्य

२.५ सारांश व समारोप

सदर प्रकरणामध्ये स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रीयांना स्वातंत्र्य समता व सामाजिक न्याय देण्यासाठी पुरुषाच्या बरोबरीने स्थान देण्यासाठी तसेच स्त्रीयांना शिक्षणाचा, राजकीय व आर्थिक अधिकार देण्यासाठी स्त्रीवादी विचार पुढे आला. स्त्रीयाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आणि स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात सक्षम करण्यासाठी आणि एक माणुस म्हणून त्यांना पुरुषाच्या बरोबरीचे समान स्थान मिळविण्यासाठी विविध स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या. त्यामुळे स्त्रीयावरील अन्याय अत्याचार कमी होण्यास मदत झाली आणि स्त्रीयांना हक्क, अधिकार व सामाजिक न्याय मिळविण्यासाठी शासनाने विविध कायदे केले. यामुळे स्त्रीवादी चळवळीचे खुप मोठे योगदान आहे.

विद्यार्थी हा घटक महत्वाचा मानून विद्यार्थ्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी विद्यार्थी संघटना उभ्या केल्या. आजही सर्व विद्यापीठ व महाविद्यालयात विविध विद्यार्थी संघटना विद्यार्थ्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी प्रश्न आंदोलन करीत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अनेक महत्व आजही आहे तसेच भविष्यातही महत्व असणार आहे.

समाजातील असणाऱ्या अनिष्ट, रूढी, परंपरा, देव धर्माच्या नावावर होणारी भोंदुगीरी, चमत्कार करणारे भोंदू महाराज यामुळे सामान्य लोकांचे मानसिक व आर्थिक शोषण वाढत आहे. त्यामुळे समाजातील असणाऱ्या अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा चळवळ प्रयत्न करीत आहे.

२.६ सरावासाठी प्रश्न

१) महिला चळवळी/स्त्रीवादी चळवळीची माहिती लिहा.

२) स्त्रीवादी चळवळीचा उगम व विकास या विषयावर माहिती लिहा.

३) भारतातील विद्यार्थी चळवळ याविषयी माहिती सांगा.

४) महाराष्ट्रातील विद्यार्थी चळवळ स्पष्ट करा.

५) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीची भूमिका स्पष्ट करा.

६) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा उगम विकास स्पष्ट करा.

७) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीची अंधश्रद्धा निर्मुलनात भूमिका विषद करा.

२.७ संदर्भ ग्रंथ यादी

१) डॉ. बोबडे प्रकाश ''कोलाज'' (आर्थिक व सामाजिक चळवळी, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

२) डॉ. शिरगावे दादाबाहेब, डॉ. शिंदे वसंत, ''स्थानिक स्वराज्य संस्था आणि महाराष्ट्रातील चळवळी, निराली प्रकाशन, पुणे

३) डॉ. बोर्डे सुनिता, डॉ. खडसे संतोष, ''ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रीया'', शुभम पब्लिकेशन, पुणे

४) मुन मिनाक्षी, ''फुले आंबेडकरी स्त्री चवळव'' समता प्रकाशन, नागपूर

५) पाटील विजय, रत्नपारखी संजय, ''महाराष्ट्राचे राजकार आणि सामाजिक चळवळी, दुरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६) डॉ. बोर्डे खडसे सुनिता, ''महाराजा सयाजीराव गायकवाड यांची स्त्री सुधारणा महाराजा सयाजीराव गायकवाड चरीत्र साधने समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.

७) प्रा. पानस्कर विजय, ''नवसामाजिक चळवळी व महाराष्ट्राचे राजकारण'', दुरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

❑❑❑

प्रकरण–३

सामाजिक– राजकीय चळवळी (भाग –१)

उद्दिष्टे – या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्ही –

१. महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय चळवळी समजून घ्याल.

२. महाराष्ट्रातील सामाजिक आणि राजकीय चळवळीच्या उद्याची कारणे स्पष्ट कराल.

३. सामाजिक आणि राजकीय चळवळी मधील सहसंबंध लावू शकाल.

....

१. प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, आपण मागील प्रकरणात सामाजिक चळवळींच्या व्यापक स्वरूपात अभ्यास केला. त्यामध्ये विशेषतः स्त्रीवादी चळवळ, विद्यार्थी चळवळ आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ या महत्त्वपूर्ण चळवळींचा सखोल आढावा घेतला. या सर्व चळवळी समाजातील अन्याय, असमानता आणि सामाजिक अडथळ्यांविरुद्ध उभ्या राहिलेल्या असून त्यांनी समाजपरिवर्तनात मोलाची भूमिका बजावली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक चळवळींची संकल्पना, त्यांची उद्दिष्टे, साधने आणि परिणाम यांविषयी आपल्याला मूलभूत आकलन झाले आहे. याच अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात आपण आणखी काही महत्त्वपूर्ण सामाजिक–राजकीय चळवळींचा अभ्यास करणार आहोत. विशेषतः कामगार चळवळ, शेतकरी चळवळ आणि दलित चळवळ या तीन प्रमुख चळवळींचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. या चळवळींचे स्वरूप, उद्दिष्टे, कार्यपद्धती, तसेच त्यांच्या मागील सामाजिक, आर्थिक व राजकीय कारणांचा अभ्यास आपण करणार आहोत.या सर्व चळवळी मुख्यतः महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचा अभ्यास करताना महाराष्ट्राच्या सामाजिक रचनेचा, राजकीय परिस्थितीचा आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करणे आवश्यक ठरते. या चळवळींनी केवळ संबंधित घटकांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला नाही, तर समाजातील व्यापक परिवर्तनाला चालना दिली आहे. कामगारांच्या हक्कांसाठीची लढाई, शेतकऱ्यांच्या आर्थिक न्यायासाठीचे आंदोलन आणि दलित समाजाच्या सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष हे सर्व एकमेकांशी संबंधित असून त्यांनी लोकशाही व्यवस्थेला अधिक बळकट करण्यास हातभार लावला आहे.म्हणूनच, या प्रकरणाच्या अभ्यासातून आपण या चळवळींची गरज, त्यांचे स्वरूप, त्यांचे योगदान आणि मर्यादा यांचा सखोल अभ्यास करून समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत त्यांच्या स्थानाचे योग्य मूल्यांकन करू शकतो.

२. विषय विवेचन

या प्रकरणात आपण कामगार चळवळ, शेतकरी चळवळ आणि दलित चळवळ या तीन महत्त्वपूर्ण सामाजिक–राजकीय चळवळींचा सखोल अभ्यास करणार आहोत. या चळवळी समाजातील विविध घटकांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी आणि सन्मानासाठी उभ्या राहिलेल्या असून त्यांचा भारतीय लोकशाहीच्या विकासात मोलाचा वाटा आहे. विशेषतः महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या चळवळींचा उदय आणि विकास समजून घेणे आवश्यक ठरते.

कामगार चळवळही औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून उदयास आलेली चळवळ आहे. औद्योगिक क्रांतीनंतर कामगार वर्गावर होणारे शोषण, कमी वेतन, दीर्घ कामाचे तास आणि कामाच्या ठिकाणी असुरक्षित या समस्यांविरुद्ध कामगारांनी संघटित होऊन संघर्ष सुरू केला. महाराष्ट्रात विशेषतः मुंबई, पुणे यांसारख्या औद्योगिक केंद्रांमध्ये कामगार चळवळीने महत्त्वपूर्ण स्वरूप धारण केले. कामगार संघटनांची स्थापना, संप, आंदोलने आणि कायदेशीर लढाया यांच्या माध्यमातून कामगारांनी आपल्या हक्कांसाठी लढा दिला.

दुसरीकडे, शेतकरी चळवळही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्यांमधून निर्माण झालेली आहे. शेतीतील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा, पिकांना योग्य भाव न मिळणे, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारपेठेतील अस्थिरता या कारणांमुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला. त्यामुळे आपल्या हक्कांसाठी आणि योग्य किंमतीसाठी शेतकऱ्यांनी संघटित होऊन विविध आंदोलनांचे आयोजन केले. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींनी सरकारच्या धोरणांवर प्रभाव टाकत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.

तिसरी आणि अत्यंत महत्त्वाची म्हणजे दलित चळवळ. ही चळवळ सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध उभी राहिलेली आहे. दीर्घकाळापासून दलित समाजावर होणारे अन्याय, अत्याचार, अस्पृश्यता आणि सामाजिक बहिष्कार याविरुद्ध लढा देण्यासाठी ही चळवळ उभी राहिली. शिक्षण, समान हक्क, सामाजिक प्रतिष्ठा आणि न्याय मागण्यासाठी दलित समाजाने संघर्ष केला. महाराष्ट्रात या चळवळीला विशेष बळ मिळाले आणि तिच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने पुढे गेली.

या तिन्ही चळवळींच्या अभ्यासातून आपण त्यांच्या उद्दिष्टांचा, कार्यपद्धतीचा, नेतृत्वाचा, तसेच त्यांच्या यश-अपयशाचा आणि मर्यादांचा विचार करणार आहोत. त्याचबरोबर या चळवळींनी समाजव्यवस्थेवर आणि शासनव्यवस्थेवर कसा प्रभाव टाकला, हेही समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक चळवळींच्या व्यापक संदर्भात या चळवळींचे महत्त्व स्पष्टपणे लक्षात येईल.

२.१ **कामगार चळवळ** (Worker's Movement)

अठराव्या शतकानंतरच्या काळात कामगार संघटनांना समाजात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळात कामगार संघटना अस्तित्वात नव्हत्या, त्या वेळी परिस्थिती आणि गरजेनुसार काही कामगार संघटना निर्माण होत असत, परंतु त्यांचा हेतू साध्य झाला की त्या संघटनांचे अस्तित्व लोप पावत असे. त्यामुळे स्थायी स्वरूपाच्या कामगार संघटना अस्तित्वात नव्हत्या. औद्योगिक क्रांतीनंतर समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था बदलल्या गेल्या. जगात सर्वत्र मोठ्या प्रमाणात कारखाने निर्माण होऊन कामगार वर्गाची निर्मिती झाली. कामगार वर्गांच्या विविध संघटना निर्माण होऊन कामगाराच्या समस्या, प्रश्न, अडचणी सोडविण्यात येऊ लागल्या. समाजात भांडवलदार, श्रीमंत लोकांचा एक वर्ग आणि औद्योगिक कार्यक्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष कार्य करणारा मजूर वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. औद्योगिक क्रांतीतूनच कामगार संघटनांची निर्मिती झाल्यामुळे औद्योगिक क्रांतीच कामगार संघटनांची जननी आहे असे मानले जाते. प्रस्तुत प्रकरणात आपण महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा अभ्यास करणार आहोत.

कामगार संघटना चळवळीचा उदय आणि विकास

औद्योगिक क्रांती ही कामगार संघटनांची जननी आहे. औद्योगिक, आधुनिक कारखाना पद्धतीची

सुरुवात भारतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. भारतात आजच्या कामगार संघटनांचा उदय विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाला. मुंबई व बंगाल येथे कापड व ज्यूटचे कारखाने वाढले. कामगारांची संख्या वाढत गेल्यामुळे कामगारांच्या बाबतीत समस्या, अडचणी निर्माण झाल्या, कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटनांचा उदय झाला. भारतातील कामगार संघटनेची स्थापना मुंबईतील कामगार श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी केली. इ. स. १८९० साली श्री. लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई गिरणी कामगार संघ' स्थापन करण्यात आला. पुढील काळात प्रिंटर्स युनियन कलकता (१९०६), बाँबे पोस्टल युनियन (१९०७), कामगार हितवर्धक सभा व सोशल सर्व्हिस लिग यांची स्थापना (१९१०) झाली. या सर्व कामगार संघटना कामगार कल्याण संघटना होत्या, त्यामुळे आधुनिक कामगार संघटनेचे स्वरूप प्राप्त झाले नव्हते. पहिल्या महायुद्धानंतर स्वरूप प्राप्त झाले. दरम्यान, १९१९ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना झाली. कामगारांचे कामाचे तास, वेतन, सोई-सवलती, बेकारी निवारण, आजारपण, पंगुत्व, अपघात यांपासून संरक्षण इत्यादी समस्या सोडविण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय संघटनेकडून करण्यात येऊ लागले. सुमारे १२० देशांनी आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे.

महाराष्ट्रातील कामगार चळवळ

महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ मानली जाते. कारण पश्चिम भारतातील औद्योगिकीकरणाचा पाया प्रामुख्याने मुंबई आणि तिच्या परिसरात अधिक प्रमाणात घातला गेला. मुंबई आणि महाराष्ट्रात १९६० नंतर औद्योगिकीकरणाचा विस्तार झाला. मुंबईतील कापड गिरण्या १८५१ साली सुरू झाल्या. १८८५ पर्यंत कापड गिरण्यांची संख्या ७५ पर्यंत गेली होती. १९०५ पासून मुंबईच्या कापड गिरण्यांत अनेक लहान मोठे संप झाले. इ. स. १९०८ साली मुंबईच्या गिरणी कामगारांनी पहिला राजकीय संप केला. राजद्रोहाच्या आरोपाखाली २४ जून, १९०८ रोजी लोकमान्य टिळकांना मुंबईत अटक करण्यात आली. टिळकांना सहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. या घटनेविरुद्ध सर्व भारतभर आंदोलने झाली. मुंबईच्या गिरणी कामगारांनी टिळकांच्या अटकेविरुद्ध संप केला. या संदर्भात श्री. डी. सी. होम यांनी असे लिहून ठेवले होते की, 'भारतातही आता कामगार वर्गात राजकीय जागृती सुरू झाली आहे असे कॉम्रेड लेनिन यांनी म्हटले होते.' भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या घटनेला फार मोठे स्थान आहे.भारतातील कामगार वर्गाने केलेला हा पहिला राजकीय संप होता.

१९०१च्या जनगणनेनुसार मुंबईची लोकसंख्या ९ लक्ष ७९ हजार होती. त्या वेळी मुंबईत १६८ कारखान्यांत सुमारे दोन लाख कामगार होते. याशिवाय गोदी, बंदरे, घरबांधणी, माथाडी, हमाली या उद्योगांतील असंघटित एक लाख रोजंदारी मजूर होते. या तीन लाखांत ५१ टक्के मराठी, २६ टक्के गुजराती व बाकीचे २३ टक्के अन्य भाषिक कामगार होते. सुमारे एक लाख कामगारांनी सतत सहा दिवस हा राजकीय संप चालू ठेवून टिळकांना झालेल्या सहा वर्षांच्या शिक्षेच्या विरोधात संघर्ष केला होता. कामगारांचा हा पहिला राजकीय संप होता. कापड, गिरणी कामगारांचा दुसरा सार्वजनिक संप २६ एप्रिल, १९२९ पासून सुरू झाला. सुमारे ३२ कापड गिरण्यांतील एक लाख कामगार संपावर होते. हा संप २९ दिवस चालू होता.

१९२६ ते १९२९ च्या दरम्यान भारतातील कामगार चळवळीतील साम्यवादी नेत्यांचे प्राबल्य वाढले होते. डाव्या राजकीय विचाराचे नेतृत्व लाभल्यामुळे कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचे कामगार संघटनेवरील वर्चस्व वाढले होते. मुंबईच्या कापड गिरणी कामगार संपातून, ज्यूट मिल कामगारांच्या लढ्यातून आणि जमशेदपूरच्या टाटा आयर्न अँड स्टील वर्क्समधील कामगार चळवळीतून साम्यवादी (डाव्या) नेत्यांचा वाढलेला प्रभाव दिसून येत होता. औद्योगिक तटेविषयक कायद्याच्या आधारे ब्रिटिश शासनाने १९२९ साली आघाडीच्या सर्व साम्यवादी नेत्यांना अटक केली. मिरत येथे त्यांच्यावर खटले भरण्यात आले. साम्यवादी पक्षावर बंदी आल्यानंतर साम्यवादी कार्यकर्ते राष्ट्रीय महासभेच्या नियंत्रणाखाली कार्य करू लागले.

दरम्यान, आर्थिक जागतिक मंदीचा फटका भारताच्या वसाहती अर्थव्यवस्थेला सोसावा लागला. आर्थिक मंदीची झळ महाराष्ट्राच्या कामगार क्षेत्रालाही लागली. मुंबईतील गिरणी कामगारांनी १९२६ व १९२८ मध्ये विराट संप घडवून आणले. त्यामुळे संपूर्ण औद्योगिक क्षेत्र ढवळून निघाले. अशा औद्योगिक अशांततेची आणि आर्थिक अस्थैर्याची दखल घेऊन ब्रिटिश सरकारने 'रॉयल कमिशन ऑन लेबर इन इंडिया' ची नेमणूक केली. १९३१ साली रॉयल कमिशनने आपला अहवाल सादर करून कामगारांसाठी उपयुक्त कायदे करण्याची शिफारस केली. कामगार वर्गात राजकीय जागृती घडून आल्यामुळे ते स्वातंत्र्य चळवळीत आघाडीवर राहिले. १९४२ च्या चलेजाव चळवळीत कामगार नेते व कामगार कार्यकर्ते तुरुंगात गेले. राष्ट्रवादी कामगार नेते तुरुंगात गेल्याने या चळवळीत सामील न झालेल्या ब्रिटिश धार्जिण्या 'साम्यवादी नेत्यांनी' 'आयटक' वर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. महायुद्धाच्या समाप्तीनंतर सर्व स्वातंत्र्य सैनिकांची तुरुंगातून सुटका झाली. दरम्यान, साम्यवादी पक्ष अप्रिय झाल्यामुळे राष्ट्रवादी विचारांच्या नेत्यांना कामगार वर्गाकडून प्रचंड पाठिंबा मिळाला. ग. द. आंबेकर, एस. एम. जोशी, अशोक मेहता, जी. जी. मेहता, रामभाऊ रुईकर, पीटर अलवासिस इत्यादी राष्ट्रवादी, समाजवादी फॉर्वर्ड ब्लॉक गटांचे नेते महाराष्ट्रात लोकप्रिय झाले. महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रांचा केंद्रबिंदू मुंबई हा होता. मुंबईच्या कामगार क्षेत्रात कापड गिरणी कामगार सर्वांत प्रभावी होते. त्यांचे संघटन राष्ट्रीय सभेचे कार्यकर्ते ग. द. आंबेकर यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघा मार्फत केले होते. समाजवादी विचारांचे कार्यकर्ते राष्ट्रीय मिल मजदूर संघात कार्य करू लागले. परंतु कापड गिरणी कामगारांमध्ये साम्यवादी नेते श्रीपाद अमृत डांगे यांची 'गिरणी कामगार युनियन' ही सर्वांत प्रभावशाली संघटना होती. दरम्यान, अन्य उद्योग व्यवसायात कामगार संघटन जोमाने वाढले होते. गोदी कामगारांचे पी. डिमेलो, रेल्वे कामगारांचे पीटर अलवासिस, इंजिनिअरिंग व रसायन उद्योगाचे आदिम आदिल, विमा व पांढरपेशा कामगारांचे एफ. एम. पिंटो, बेस्ट कंपनीचे जी. जी. मेहता यांनी नेतृत्व केले होते. तसेच ना. म. जोशी, मणिवेन कारा, रामभाऊ खेडगीकर, वसंत कर्णिक इत्यादी नेते विविध क्षेत्रांत कामगारांचे संघटन करीत होते. साम्यवादी नेत्यांत श्रीपाद डांगे, मिरजकर, जोगळेकर, रणदिवे, पाटकर, तांबिटकर, कुरणे, घुमे इत्यादी जुने आणि नवे नेते कार्यरत होते.

१९४७ साली मुंबई राज्यात 'मुंबई औद्योगिक संबंध कायदा' लागू करण्यात आला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 'आयटक' वर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या कामगार नेत्यांनी केला, परंतु तो अयशस्वी ठरल्यामुळे त्यांनी १९४७ साली 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' (इंटक) ही संघटना स्थापन केली. पुढे १९४८ साली फेब्रुवारीमध्ये समाजवादी नेते काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी स्वतंत्र समाजवादी पक्षाची स्थापना केली. पुढे १९४८ च्या डिसेंबरमध्ये समाजवादी, रॉयवादी आणि फॉर्वर्ड ब्लॉकच्या नेत्यांनी एकत्र येऊन 'हिंद मजदूर सभा' या कामगार संघटनेची स्थापना केली.

१९५५ साली भारतीय जनसंघाने कामगार क्षेत्रात प्रवेश केला. त्यांनी 'भारतीय मजदूर संघ' राष्ट्रीय संघटना निर्माण केली. पुंढे १९५८ साली लोहियावादी नेते समाजवादी पक्षातून बाहेर पडून त्यांनी 'हिंद मजदूर पंचायती' ही कामगार संघटना स्थापन केली. हिंद मजदूर पंचायती मार्फत जॉर्ज फर्नाडिस यांचे नेतृत्व कामगार क्षेत्राला लाभले. मुंबई महानगरपालिका कामगार संघटना, बेस्ट कामगार संघटना, हॉटेल कामगार, टॅक्सी चालक अशा असंघटित संघटना जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली उभारल्या. कॉम्रेड डांगे यांच्यानंतर जॉर्ज फर्नाडिस हेच एक प्रभावी, शक्तिशाली कामगार नेते म्हणून पुढे आले. गोदी कामगारांचे नेते पी. डिमेलो यांच्या नंतर एस. आर. कुलकर्णी, मनोहर कोतवाल, शांती पटेल, प्रभू देसाई, खान यांनी त्यांच्या कार्याची जबाबदारी सांभाळली. 'लाल निशाण गट' नावाची कामगार संघटना साम्यवादी पक्षातून फुटलेल्या अति डाव्या विचारांच्या नेत्यांची ही संघटना होय. त्यांचा प्रभाव ग्रामीण भागात विशेषतः साखर कारखाना क्षेत्रात विशेष होता.

मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर येथील कामगार संघटनांनी सामाजिक आणि सांस्कृतिक जडण-घडणीतही सक्रिय सहभाग घेतला होता. गणेशोत्सव, दहिहंडी, मेळे, नाटक कंपन्या, भजनी मंडळे, कलापथके, क्रीडा मंडळे, व्यायामशाळा, शिक्षणसंस्था, बँका, पतसंस्था इ. क्षेत्रांत कामगार संघटना सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समरस झाल्या होत्या.

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी जे मोठे जनआंदोलन झाले त्यामध्ये इंटक वगळता सर्व कामगार संघटनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. १९५५ साली सर्व कामगार संघटनांनी एक आणि समाजवादी पक्षाच्या कामगार संघटनांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीस जोरदार पाठिंबा दिला दिवसाचा लाक्षणिक संप केला होता. एक दिवस 'मुंबई बंद' ही घोषणा केली होती. साम्यवादी प्रभावी कामगार चळवळ अस्तित्वात होती. त्या वेळी महाराष्ट्रात सुमारे आठ हजार कारखाने, होतो. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. विविध राजकीय पक्षांच्या नेतृत्वाखाली गिरण्या, उद्योगधंदे होते. त्यामध्ये सात लाख नव्वद हजार कामगार काम करीत होते.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर १९६३ साली महागाई, करवाढ, सक्तीच्या बचत योजनेच्या निषेधार्थ मुंबई महानगरपालिकेचे कामगार हे जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली संपावर गेले. हा संप आठवडाभर चालला. या संपाला मुंबईतील नव्वद हजार हॉटेल कामगारांनी, तीस हजार वाहतूक व गोदी कामगारांनी आणि सतरा हजार टॅक्सीवाल्यांनी पाठिंबा दिला होता. तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मध्यस्थीने हा संप मागे घेतला गेला. कामगारांच्या मागण्या काही प्रमाणात मान्य झाल्या. इंटक संघटनेने या संपाला पाठिंबा दिला नाही. मार्च, १९६६ मध्ये बोनसच्या मागणीसाठी मुंबईतील गिरणी कामगारांनी संप केला होता. याच महिन्यात राज्य सरकारी नोकरांनी केंद्रीय सरकारी नोकरांप्रमाणे महागाई भत्ता मिळावा, समान वेतन मिळावे व राहण्यास घर मिळावे म्हणून लाक्षणिक उपोषण केले होते.

१९६७ साली शिवसेनेने 'भारतीय कामगार सेना' स्थापन करून मुंबईच्या कामगार क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली होती. १९६४ च्या कम्युनिस्ट पक्षातील फुटीनंतरही पुढे १९७० पर्यंत आयटक संघटना अविभाज्य होती. परंतु १९७० साली मार्क्सवाद्यांनी 'सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स' (सिद्ध) नावाचा आपला आखिल भारतीय महासंघ स्थापन केला. महाराष्ट्रातून कोल्हटकर, कुरणे, रणदिवे, कृष्णन, संझगिरी इत्यादी नेते आयटकमधून बाहेर पडून सिटूमध्ये दाखल झाले. त्यामुळे आयटक आणखी दुबळी झाली.

१९६७ साली मुंबईत संयुक्त समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते डॉ. दत्ता सामंत यांनी कामगार क्षेत्रात आपले कार्य सुरू केले. ते घाटकोपर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. एक निःस्वार्थी, झुंझार, प्रभावी कामगार नेता म्हणून कामगार क्षेत्रांत त्यांचा लौकिक फार मोठा होता. त्यांनी आपल्या कामाची सुरुवात ही इंजिनिअरिंग उद्योगात सुरू करून रासायनिक व औषधनिर्मिती उद्योगात आपला प्रभाव वाढविला. डॉ. दत्ता सामंत हे कामगार वर्गात अल्पावधीत लोकप्रिय नेते बनले.

१९७१ साली मुंबईतील गिरणीमालकांनी खाडिलकर सूत्रानुसार बोनस देण्याचे नाकारल्यामुळे कम्युनिस्टांच्या गिरणी कामगार युनियनबरोबर असणारे कामगार ११ ऑक्टोबर, १९७१ पासून बेमुदत संपावर गेले. पाच दिवस संप चालल्यानंतर गिरणीमालकांनी खाडिलकर सूत्रानुसार बोनस देण्याचे मान्य केले. किमान वेतन आणि बोनसचे कायदे होत असले तरी सर्वच उद्योगपती त्याचे पालन करतातच असे नाही. १९७१ साली इचलकरंजीच्या धनी मंत्रमान बंद केल्यामुळे हजारो कामगारांवर बेकारीचे संकट ओढावले. १९७२ साली महाराष्ट्रात दुष्काळ असतानाही कामगारांची आंदोलने चालू होती. हिंद मजदूर पंचायतीमार्फत जॉर्ज फाँडिस यांच्या संघटनेने मुंबईच्या बेस्ट कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा संप करून वेतनवाढ व बोनस देण्याचे महापालिकेच्या प्रशासनाने मान्य केला.

१९८२ चा मुंबईत झालेला कापड गिरणी कामगारांचा संप

महाराष्ट्र गिरणी कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांचा संप झाला. या संपात दोन लाख पन्नास हजार कामगार सहभागी झाले होते.भारतातील औद्योगिक तंट्यामधील हा एक अत्यंत महत्त्वाचा संप म्हणून ओळखला जातो. हा संप एक वर्षाहून अधिक काळ लांबला. मुंबईत आजवर गिरणी कामगारांनी केलेल्या संपामध्ये हा सर्वांत दीर्घकाळ चाललेला संप होता. कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारण्यासंबंधीच्या मागण्या या संपात सुरुवातीला केल्या होत्या. परंतु पुढे वाढलेल्या मागण्यांच्या विस्तारामुळे संपाला विस्तृत महत्त्व प्राप्त झाले. किमान वेतन, हक्काची १५ दिवस रजा, ५ दिवस प्रासंगिक रजा, कायमस्वरूपी नोकरी, वेतन वाढ, बोनस अशा मागण्या करण्यात आलेल्या होत्या. संप लांबल्यामुळे ८० टक्के कामगार आपल्या मूळ गावी गेले. या संपाचे आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम झाले. कामगाराच्या आर्थिक मागण्यांमुळे खाजगी व शासकीय मालकीच्या उद्योगांना एक प्रकारचे आव्हानच ठरले गेले. मुंबईतील ६० गिरण्यांपैकी ४७ कापड गिरण्या खाजगी मालकीच्या आणि उरलेल्या नॅशनल टेक्सटाईल कापरिशनच्या मालकीच्या होत्या. शासन गिरणी मालकाची बाजू उचलून धरत आहे. कारण कामगारांना पगारवाढ दिली तर शासनाच्या मालकीच्या १०६ कापड गिरण्यांमधूनही पगारवाढ द्यावी लागेल. शासनाने वेतनवाढीचा मुद्दा नाकारला होता. परिस्थिती नियंत्रित राहावी म्हणून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ज्या वेळी राज्य सरकार व खाजगी उद्योगपती दोघेही कामगारांच्या मागण्या पूर्ण करावयास तयार नसतात आणि संघर्ष अगदी पराकोटीला जातो, त्या वेळी राजकीय परिणाम टाळता येत नाहीत. मुंबईतील कापड गिरण्यातील कामगारांच्या संपाचे केलेले राजकारण हे त्याचे ठळक उदाहरण म्हणावे लागेल. तेव्हा संघटित केलेली 'कृती' आणि राजकीय धडे देण्यासाठी केलेला 'संप' या घटनेतील सामर्थ्य कमी मानले जाऊ नये, ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झालेली आहे.

कामगार चळवळीचे यशापयश

१. कामगार चळवळीला राजकीय विचारांचा पाया असला तरीही काही वेळा राजकीय, पक्षांच्या अंतर्गत विरोधामुळे कामगार संघटनेचे विभाजन होऊ शकते. उदा. १९४७ साली काँग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांनी आयटकचे संबंध तोडून इंटक संघटना स्थापन केली. काँग्रेस, साम्यवादी, समाजवादी, भारतीय जनसंघ, भारतीय जनता पक्ष इत्यादी राजकीय पक्ष तत्त्वशून्य, स्वार्थी, गटबाजीचे राजकारण करताना दिसतात. त्यामुळे कामगार संघटनांचे अस्तित्व धोक्यात येते. राजकीय नेत्यांनी आपली राजकीय भूमिका बदलली तर त्याचा परिणाम कामगार संघटनांच्या कार्यावर होतो. उदा. कॉम्रेड डांगे नंतरच्या राजकारणात साम्यवादी पक्षाच्या तत्त्वनिष्ठ राजकारणाऐवजी काँग्रेस पक्षाच्या बाजूने निर्णय घेऊ लागले होते. गिरणगावातील साम्यवादी पक्षाचा प्रभाव शिवसेनेने संपविला. १९७४ साली रेल्वे कामगारांच्या संपानंतर जॉर्ज फर्नांडिस मुंबई सोडून दिल्लीला गेले. त्यामुळे समाजवादी नेत्यांच्या प्रभावाला ओहोटी लागली. त्यांच्या जागी डॉ. दत्ता सामंत, दि. बा. पाटील, अण्णासाहेब पाटील असे नेते उदयाला आले. थोडक्यात, राजकीय नेत्याच्या वर्तनावर आणि कृतीवर कामगार संघटनेचे स्थैर्य अवलंबून असते.

२. राजकीय जाणीव – जागृतीमुळे कामगारांच्या हितसंवर्धनाबरोबरच काही राजकीय व सामाजिक चळवळीनांही पाठिंबा देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका कामगार संघटना पार पाडीत असतात. उदा. लोकमान्य टिळकांना सहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली तेव्हा मुंबईच्या कामगार संघटनांनी एक दिवसाचा राजकीय संप केला होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला कामगार संघटनांनी १९५५ साली एक दिवसाचा लाक्षणिक संप करून पाठिंबा दिला होता.

३. कामगार संघटनाचे मुख्य उद्दिष्ट कामगारांचे हितसंवर्धन करणे हे असते. कामगारांचे वेतन, भत्ते, सवलती, निवृत्तीवेतन, रजा, विश्रांती, बढती, आजारी, अपंग, अंध, बेकारी अशा अवस्थेतील साहाय्य, अपघातातील साहाय्य इत्यादींसंबंधी कामगार वर्गाकडून मागण्या होत असतात. कामगारांच्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी कामगार संघटनांना आंदोलने, संप, मोर्चे, बंद या मार्गाचा अवलंब करावा लागतो. कामगारांचे प्रश्न सोडविताना चर्चा, विचारविनिमय, तडजोड अशा सनदशीर मार्गांचा अवलंब करणे हिताचे ठरते.

४. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात कामगार संघटनांची निर्मिती झालेली आढळते. महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे परिसरात कामगार संघटना आणि त्यांची आंदोलने झालेली आढळतात. १९०५ पासून मुंबईच्या कापड गिरण्यांतील कामगारांनी अनेक संप केले होते. कामगार वर्गान तघटितपणे, कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मागण्या केल्या तर चर्चेद्वारे विचारविनिमयाने शासन संघटीतपणे आणि उद्योजक मार्ग काढू शकतात. कामगार वर्गाकडून केलेल्या योग्य, रास्त आणि शक्य असणाऱ्या मागण्या मान्य होऊ शकतात. कामगारांच्या संघटित शक्तीला (चळवळीला) अनन्यसाधारण महत्त्व असते. कामगार चळवळ आणि राजकीय पक्ष यांच्यात परस्परसंबंध निर्माण होतात. प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या नेतृत्वाखाली कामगार संघटना स्थापन करताना दिसतो. काँग्रेस, साम्यवादी, जनसंघ, शिवसेना इत्यादी राजकीय पक्षांनी आपापल्या कामगार संघटना स्थापन केलेल्या आहेत. कारण कामगारांना संघटित करण्याची प्रेरणा ही राजकीय जाणिवेतून होत असते. राजकीय पक्षाचे जे संघटनात्मक आधार असतात त्यामध्ये कामगार संघटनांना महत्त्वाचे स्थान असते.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न १

२.२ अ) योग्य की अयोग्य ते सांगा :

१. औद्योगिक क्रांतीपूर्वी स्थायी कामगार संघटना अस्तित्वात होत्या.

२. औद्योगिक क्रांतीमुळे कामगार वर्गाची निर्मिती झाली.

३. भारतातील पहिली कामगार संघटना नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केली.

४. १९०८ सालचा संप हा कामगारांचा पहिला राजकीय संप मानला जातो.

५. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना १८९० साली झाली.

६. महाराष्ट्रातील कामगार चळवळ मुख्यतः ग्रामीण भागात केंद्रित होती.

७. १९८२ चा गिरणी कामगार संप हा अल्पकाळ चाललेला होता.

ब) रिकाम्या जागा भरा :

१. औद्योगिक क्रांती ही कामगार संघटनांची .... मानली जाते.

२. भारतातील पहिली कामगार संघटना .... यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली.

३. मुंबईतील पहिला राजकीय संप .... साली झाला.

४. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची स्थापना .... साली झाली.

५. १९८२ च्या गिरणी कामगार संपाचे नेतृत्व .... यांनी केले.

६. 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' (INTUC) ची स्थापना .... साली झाली.

क) योग्य पर्याय निवडा

१. कामगार संघटनांची जननी कोणती मानली जाते?

अ) कृषी क्रांती	ब) औद्योगिक क्रांती
क) हरित क्रांती	ड) माहिती क्रांती

२. भारतातील पहिली कामगार संघटना कोणी स्थापन केली?

अ) लोकमान्य टिळक	ब) नारायण मेघाजी लोखंडे
क) डॉ. आंबेडकर	ड) महात्मा गांधी

३. १९०८ चा संप कोणत्या घटनेविरोधात झाला होता?

अ) कर वाढ	ब) टिळकांची अटक
क) वेतन कपात	ड) महागाई

४. १९८२ च्या गिरणी कामगार संपाचे नेतृत्व कोणी केले?

अ) जॉर्ज फर्नांडिस	ब) श्रीपाद डांगे
क) डॉ. दत्ता सामंत	ड) एस. एम. जोशी

५. खालीलपैकी कोणती कामगार संघटना आहे?

अ) आयटक	ब) इंटक
क) हिंद मजदूर सभा	ड) वरील सर्व

ड) जोड्या जुळवा :

अ गट (नेते/घटना)	**ब गट (संबंध)**
१) नारायण मेघाजी लोखंडे	अ) गिरणी कामगार संघटना
२) १९०८ चा संप	ब) टिळकांच्या अटकेविरोधात
३) डॉ. दत्ता सामंत	क) १९८२ चा गिरणी संप
४) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना	ड) १९१९ स्थापना

ग/उपघटक – २) शेतकरी चळवळ (Peasant Movement in Maharashtra)

महाराष्ट्रात १९७८ साली शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटना स्थापन झाली. यापूर्वी महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनाचे पडसाद फारसे उमटले नव्हते. तरीपण काही भागात शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उठाव झालेले आढळून येतात. १८७५ साली पुणे-अहमदनगर भागात सावकारांकडून होणारे शोषण आणि कृषी-व्यवसायाचे व्यापारीकरण या-विरुद्ध पाच-पंचवीस खेड्यात मर्यादित स्वरूपात आंदोलने, दंगली झाल्या होत्या. त्या वेळी एक हजार शेतकऱ्यांना तुरुंगात टाकले होते. या उठावावर चौकशीसाठी 'डेक्कन रॉयट्स कमिशन' (Deccan Riots Commission) नेमले होते. त्या कमिशनपुढे सार्वजनिक सभेने आपले निवेदन सादर करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडलेली होती. १९२०-२१ च्या दरम्यान श्रीमती गोदावरी परूळेकर यांनी वारली जमातीत जनआंदोलन घडवून आणले होते. सावकारी, जंगलग्रस्त जमिनी, धरणग्रस्त जमिनी अशा प्रश्नांवर आंदोलने छेडण्यात आली होती. १९४० ते १९७८ या काळात महाराष्ट्र शेतकरी आंदोलनाबाबत शांत होता.

१९७३ पासून देशाच्या विविध भागांत पंजाब, गुजरात, तमिळनाडू, मध्य प्रदेश, कर्नाटक राज्यांत शेतकऱ्यांची आंदोलने सुरू झालेली होती. १९७८ साली महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनाला खरी सुरुवात झाली. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शेतकऱ्यांची आंदोलने सुरू झाली. माधवराव बोरास्ते, बोरावके, प्रल्हाद पाटील, मोरे, म्हात्रे इत्यादींनी त्यांना साथ दिली. 'शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व रास्त भाव मिळावा' हे उद्दिष्ट पायाभूत तत्त्व मानून शेतकऱ्यांची आंदोलने छेडण्यात आली. 'भीक नको, हवे घामाचे दाम' अशी थेट शेतकऱ्यांच्या काळजाला भिडणारी भाषा वापरून शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची स्थापना केली. 'अंगारमळा' या आंबेठाणच्या मातीतून शेतकरी संघटनेचा स्फुलिंग बाहेर पडला आणि पुढील काळात तो महाराष्ट्रभर पसरला.

१९७८ ते १९८३ या पाच वर्षांच्या काळात शेतकऱ्यांची आंदोलने अधिक प्रभावीपणे झाली. १९८० ते १९८१ या एकाच वर्षात संघटनेने केलेल्या वेगवेगळ्या आंदोलनात हुतात्मा झालेल्या शेतकऱ्यांची संख्या

२१ एवढी झाली. शरद जोशी यांनी कांदा, ऊस, तंबाखू, दूध उत्पादक या संदर्भात जोरदार आंदोलने केली. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक थोपविण्याचे बळ, लाखोंच्या सभा आणि बुद्धिजीवीपासून ते ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजुरांपर्यंत सर्वांनाच आकर्षित करणारी सैद्धांतिक मांडणी यामुळे शेतकरी संघटना आणि शरद जोशी यांची जनमानसावरील पकड अधिकच घट्ट झाली. कांदा आंदोलन, तंबाखू आंदोलन, ऊस आंदोलन, कापूस आंदोलन यांद्वारे शेतकरी संघटनेने शासनावर विशेष प्रभाव पाडला. अशा प्रकारे एक दबाव गट म्हणून शेतकरी संघटना प्रभावी ठरली असली तरी १९८२ साली झालेल्या दूध आंदोलनात तिला माघार घ्यावी लागली. दूध आंदोलनाचा फटका बसल्यानंतरच शेतकरी संघटनेने आपल्या संघटनात्मक बांधणीकडे लक्ष घातले. निश्चित उद्दिष्टे, विशिष्ट कार्यपद्धती आणि परिवर्तनाची दिशा या दृष्टीने संघटनात्मक बांधणीला महत्त्व देणे आवश्यक झाले.

१९८३ साली मनमाड येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनात संघटनात्मक बांधणीचा विचार करण्यात आला. सत्तेशी संघर्ष करून आपल्या मागण्या मंजूर करून घेणे किंवा सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहून शेतकऱ्यांचे हितसंबंध जोपासण्याचे कार्य करणे असे दोन पर्याय शेतकरी संघटनेपुढे होते, रामचंद्र पाटील यांच्या गटाने राजकारणाशी संबंध आले असा आग्रह धरला, तर अलिबागाने राजकारणापासून अ नेते मंडळी राजकीय आशा-आकांक्षेपासून दूर होती, परंतु नाशिककडील बोला संघटन, आंदोलन, चळवळ या गोष्टींना महत्व दिले. शरद जोशी यांनी या दोन्ही बाजूंची परस्परविरोधी मते विचारात घेऊन ना कोणत्या पक्षीय राजकारणाशी संबंध ठेवून शेतकरी संघटनेच्या सहभागी भूमिका ठरविली, राजकारणापासून, राजकीय प्रवाहापासून अलिप्त राहून चालणार नाही, राजकारणाशी संबंध ठेवून राहिली तरच प्रभावी शक्तिशाली दबाव गट म्हणून शेतकरी कार्य करता येईल असे जोशी यांना वाटले, दोन्ही गटांच्या मतांचे समर्थन करून दोन्ही बाजू फायदे मिळविण्याच्या प्रयत्नात शरद जोशीचे धोरण दुटप्पीपणाचे बनले, त्यामुळे शेतकरी संघटनेच्या कार्यात दुहेरी भूमिका निर्माण झाली, शुद्ध चळवळ आणि राजकारण याबाबतीत संघटनेत संभ्रम निर्माण झाल्यामुळे विविध राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाला पाठिंबा दिला, आपल्या स्थानिक नेतृत्वाच्या राजकारणाला शेतकरी संघटनेच्या आंदोलनातील सहभागाचा फायदा होईल. या भावनेने हे कार्यकर्ते शेतकरी संघटनेचे कार्य करीत होते.

शेतकरी संघटनेची विचारसरणी

महाराष्ट्रातील कृषिप्रधान समाजव्यवस्थेत मोठे जमीनदार, मध्यमभूधारक, अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक आणि शेतमजूर अशी वर्गवारी आढळते. अल्प शेती आणि अपुरा पाणीपुरवठा यामुळे शेतीचे उत्पादन कमी होते, त्यामुळे शेतकरी वर्गाचा कर्जबाजारीपणा वाढलेला आहे. मोठ्या जमीनदारांचे तसेच मध्यम भूधारकांचे शेती उत्पादन जेव्हा वाढते तेव्हा त्यांच्या शेतमालाला योग्य व रास्त किंमत मिळत नाही; त्यामुळे हे बडे शेतकरीही कर्जबाजारी होऊ शकतात. तसेच वारसाहक्कानुसार जमिनीच्या वाटण्या होऊन अल्पभूधारकांची पुढील पिढी अत्यल्पभूधारक बनते. त्यामुळे त्यांना कालांतराने शेती उत्पादनातून जीवनमानाच्या, राहणीमानाच्या गरजांची पूर्तता करणे कठीण होऊन बसते, अपुरा भांडवलपुरवठा, अपुरा पाणीपुरवठा, नवीन तंत्रज्ञानाचा अभाव, पारंपरिक शेतीपद्धती यामुळे शेतीचे उत्पादन घटू लागले आहे. तेव्हा शेती व्यवसायाला पुरेसे भांडवल, बी-बीयाणे, खते, औषधे आणि पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. तसेच

शेतीमालाला योग्य व रास्त भाव मिळवून दिला पाहिजे, शेतकरी संघटनेने शेती व्यवसायाच्या या समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांची आंदोलने सुरू करून शासनाचे लक्ष वेधून घेतले. अत्यल्पभूधारकांचे शेतीपासून मिळणारे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना शेती व्यवसायात शेतमजुरी करावी लागते. शेतीमालाला रास्त व योग्य किंमत मिळत नसल्यामुळे बडे व मध्यम शेतकरी शेतमजुरांना कमी वेतन देताना दिसतात. शासनाकडून शेतमजुरांच्या मजुरीचे दर वाढवून घेतले तर शेतकऱ्यांवरच अन्याय होईल; शेती व्यवसाय अधिकच तोट्यात जाईल हे ओळखूनच शेतकरी संघटनेने शेतमजुरांसाठी अजून तरी कोणत्याही प्रकारचे आंदोलन केलेले नाही.

शेतकरी संघटनेच्या विचारसरणीचा मागोवा घेताना पुढील तीन दृष्टिकोनांतून शेतकरी संघटनेचा विचार करणे योग्य ठरेल.

१. ग्रामीण भागाचा विकास घडवून आणला असता देशाचा आर्थिक विकास होईल अशी आर्थिक भूमिका शेतकरी संघटनेने स्वीकारली होती. शेतीतून निर्माण होणारा कच्चा माल हाच औद्योगिक उत्पादनाचा पाया आहे. परतु भारतात आर्थिक नियोजनाचा अभाव असल्यामुळे उद्योगधंद्यांना केवळ प्रोत्साहन मिळाले आणि त्यातून ग्राहक-संस्कृती (Consumer Culture) निर्माण झाली आणि ही संस्कृती जोपासण्याच्या प्रयत्नात शेतीकडे आणि शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष झाले. शेतकरी संघटनेच्या युक्तिवादात तर्कसुसंगतता आढळते. ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेतीमालाला योग्य व रास्त भाव मिळाला नाही.

२. शेतकरी संघटनेच्या विचारसरणीचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे शेतकरी संघटनेने आपल्या तत्त्वप्रणालीत काहीशी गूढवादी भूमिका घेतली आहे. संघटनेची लोकप्रियता आणि सामान्य जनतेचा भरघोस पाठिंबा मिळविण्यासाठी संघटनेने एककलमी कार्यक्रम जाहीर केला. शेतीमालाला वाजवी भाव मिळाले तर ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्रश्न सुटतील, दारिद्र्य नष्ट होईल अशा घोषणा केल्यामुळे सामान्य शेतकरी आकर्षित होऊन शेतकरी संघटनेचा पाया बळकट होईल असे काहीसे गूढवाढी तत्त्वज्ञान मांडण्याचे धाडस संघटनेने केलेले दिसते.

३. शेतकरी संघटनेच्या विचारसरणीचा तिसरा भाग म्हणजे आपली मते, विचार इतर मतप्रवाहाशी जुळणारे आहेत अशी भूमिका घेणे, शरद जोशींनी गांधीवाद, मार्क्सवाद, माओवाद या विचार प्रणालीशी संघटनेच्या विचारसरणीचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. संघटनेची आंदोलन तंत्रे (संघ, घेराव, मोर्चे, बंद, रस्ता रोको) ही गांधीवादीच आहेत, संघटनेने मार्क्सचा भौतिकवाद स्वीकारून भांडवलवादाला विरोध केला आहे आणि कमकुवतपणाचा दुवा शोधून काढणे ही जाणीव म्हणजेच आंदोलनाचे शक्तिस्थान हे माओचे तंत्र संघटनेने स्वीकारले होते. शेतकऱ्यांच्या चळवळीतून, आंदोलनातून जेव्हा संघटना स्थापन करावयाची असते तेव्हा शांततेचा मागनिच जाणे आवश्यक आहे असे शरद जोशींचे मत आहे. शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनाकडे पाहिले तर संघटनेने काही ठरावीक प्रभाव क्षेत्रेच निवडली होती असे म्हणावे लागेल. शेतकरी संघटनेने कांदा, तंबाखू, ऊस यांसाठी आंदोलने केली परंतु ज्वारी, बाजरी, नाचणी यांबाबत आंदोलने केली नाहीत. शेतमजुरांचे मजुरीचे दर वाढविण्याबाबत आंदोलन केले नाही.

महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची आंदोलने

१९७८ ते १९८८ या दहा वर्षांच्या काळात शेतकरी संघटनेने विविध प्रकारची प्रखर आंदोलने केली. शेतीमालाला योग्य व रास्त किंमत मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांची आंदोलने घडवून

आणली. कांदा, ऊस, तंबाखू, दूध, कापूस अशा उत्पादित मालाला योग्य भाव (दर) मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटनेने पुढील आंदोलने प्रभावीपणे केलेली आहेत.

१. **कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन** शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचा प्रारंभ १९७८ साली कांदा आंदोलनाने झाला. नाशिक, लासलगाव, पुणे-चाकण लोणंद या कांदा-विक्रीच्या प्रसिद्ध बाजारपेठा आहेत. जेव्हा कांद्याचे उत्पादन भरपूर येते तेव्हा कांद्याचे भाव उतरतात. काही वेळा कांद्याचे भाव एवढे कोसळतात की, शेतकरी कांदा रस्त्यावर सोदन जातात. त्यांना वाहतूक भाडे व ऑक्ट्राय कर देण्याएवढीही रक्कम कांद्याच्या विक्रीतून मिळत नाही. अशा वेळी शासनाने एक रुपया किलो भावाने कांदा-खरेदी करावी म्हणून शरद जोशी यांनी आमरण उपोषण केले. पुणे-नाशिक मार्गावरील या रास्ता रोको आंदोलनाला हिंसक वळण लागून वाहतूक विस्कळीत झाली, शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचा प्रभाव पु.लो.द. शासनावर पडला. नाफेडमार्फत कांदा खरेदी करून तो परकीय राष्ट्रात पाठविण्याचे धोरण शासनाने मान्य केले. १९८० साली शेतकरी संघटनेने लासलगाव येथे कांदा अआंदोलन घडवून आणले होते. आपण आपल्या मागण्या शक्तिप्रदर्शनाद्वारे शासनाकडून मान्य करून घेऊ शकतो असा आत्मविश्वास शेतकरी संघटनेत निर्माण झाला.

२. **ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन:** महाराष्ट्रात भारताच्या १२ टक्के क्षेत्र उसाखाली असून साखरेचे उत्पादन देशाच्या १७ टक्के होते. सुमारे पाच लक्ष हेक्टर क्षेत्रांमध्ये अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद, पुणे, नाशिक, सातारा, सोलापूर या जिल्हांत उसाचे पीक घेतले जाते. उसाला किफायतशीर दर मिळावा या उद्देशाने शेतकरी संघटनेने गेल्या २५ वर्षात अनेक वेळा प्रभावीपणे आंदोलने केलेली आहेत. १९८०-८१ दरम्यान नाशिक जिल्ह्यात आणि मराठवाड्यात शेतकरी संघटनेने रास्ता रोको, रेल्वे रोको अशी आंदोलने केली. खेरवाडी रेल्वेस्थानकाला आंदोलकांनी आग लावली. आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांनी शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी चर्चा करून समझोता घडवून आणला. २००३ व २००४ साली संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी उसाला टनाला किमान १२०० रुपये दर मिळावा म्हणून प्रखर आंदोलने केली. महाराष्ट्र शासनाने शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी चर्चा करून उसाला प्रती टन एक हजार रुपये दर देण्याचे मान्य केले. पश्चिम महाराष्ट्रात रघुनाथ पाटील, राजू शेट्टी यांनी या ऊस आंदोलनाचे नेतृत्व प्रभावीपणे केले होते.

३. **तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन:** महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमेवरील निपाणी गावाच्या परिसरात तंबाखूचे उत्पादन चांगल्या प्रकारे होते. परंतु तंबाखूचे व्यापारी तंबाखू-उत्पादकाची आर्थिक पिळवणूक करतात. तंबाखूला योग्य व रास्त भाव मिळवून देण्यासाठी शरद जोशी, सुभाष जोशी यांनी निपाणी येथे तंबाखू उत्पादकांचे 'रास्ता रोको' आंदोलने छेडले. सुमारे पाच हजार शेतकऱ्यांनी सतत २० दिवस एकत्र येऊन रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलकांना अटक करण्याचे सत्र सुरू झाले. त्या वेळी आजूबाजूच्या खेड्यातून हजारो लोक आंदोलनात सामील झाले. सुमारे २०-२५ हजार आंदोलकांना थोपविण्यासाठी पोलिसांनी लाठीमार, अश्रुधूर आणि गोळीबार केला. त्यामध्ये वीस शेतकऱ्यांचा बळी गेला. शेकडो शेतकरी जखमी झाले. कर्नाटक शासनाने शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी तंबाखू दराबाबत फेरविचार करण्याचे आणि तंबाखू खरेदी-विक्रीसाठी सहकारी संस्था स्थापन करणे यासंबंधी आश्वासन दिल्यामुळे हे

आंदोलन मागे घेण्यात आले. महाराष्ट्र शासनाने तंबाखू एकाधिकार योजना अमलात आणण्याचे आहीर केले.

४. **दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन :** १९८०-८२ च्या दरम्यान धुळे, जळगाव जिल्हे दूध उत्पादनाच्या बाबतीत अग्रेसर होती. आता महाराष्ट्रात दूध उत्पादन व्यवसाय सर्वच जिल्हघात कमी-अधिक प्रमाणात वाढलेला आहे. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर इत्यादी ३६ ठिकाणी दूध योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्रात सहकारी दूध संस्था २३४८४ असून १५ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. याशिवाय असंख्य खासगी दुग्ध संस्था कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील दूध व्यवसाय संकटात सापडलेला आहे. राज्यातील फक्त सहा शासकीय दूध योजना नफ्यात आहेत. अनेक सहकारी संस्थामधील आजारपण, वाढती स्पर्धा, अति उत्पादन, घटता दर्जा, वाढता तोटा यामुळे दुग्ध व्यवसाय तोट्यात आहे. त्यामुळे दूध उत्पादकांना दूधाला योग्य दर मिळत नाही. १९८२ साली शरद जोशी यांनी धुळे येथे दूध उत्पादकांचे दूध आंदोलन केले. या आंदोलनात गायी-म्हशींची मिरवणूक काढण्यात आली. दूध उत्पादकांनी शासनाला दूध विकू नये असा आदेश शरद जोशी यांनी दिला. परंतु दूध-उत्पादकांनी हा आदेश न मानल्यामुळे शेतकरी संघटनेचे हे दूध आंदोलन अयशस्वी ठरले. गेल्या २५ वर्षांत शेतकरी संघटनेने वेळोवेळी दूध उत्पादकांची आंदोलने केली. महाराष्ट्र शासनाने या आंदोलनाची आणि सहकारी संस्थांच्या कार्याची दखल घेऊन दुधाच्या शासकीय खरेदीचे दर काही प्रमाणात वाढवून दिलेले आहेत.

५. **कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन** महाराष्ट्रात विशेषतः विदर्भात २८.४ लाख हेक्टर जमिनीत कापसाचे पीक घेतले जाते. देशातील कापसाच्या एकूण उत्पादनापैकी १७ टक्के कापसाचे उत्पादन महाराष्ट्रात होते. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य व रास्त भाव मिळावा या उद्देशाने शरद जोशी यांनी कापूस आंदोलन घडवून आणले. वस्त्रोद्योगासंबंधी शासनाने ठरविलेले धोरण कापूस उत्पादकांच्या हिताच्या विरोधी आहे. शासनाने परदेशातून कृत्रिम धाग्याची आयात मोठ्या प्रमाणात केल्यामुळे कापसाच्या मागणीवर विपरीत परिणाम होऊन कापसाचे दर कमी होतील आणि कापूस उत्पादकाचे नुकसान होईल. त्यामुळे कापसाचे उत्पादन घटेल, त्याचा परिणाम म्हणून कापड गिरण्या बंद पडतील. राजीव गांधीचे शासन शेतकरी आणि कामगार यांच्या हिताच्या विरोधी आहे असे समजून शरद जोशी आणि कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांनी एकाच व्यासपीठावर एकत्र येऊन केंद्रशासनावर टीकास्त्र सोडले. परंतु केंद्रशासनावर कोणताही परिणाम झाला नाही. परकीय कृत्रिम धाग्यापासून तयार होणाऱ्या वस्त्राला 'राजीव वस्त्र' असे संबोधून अशा कपड्याची अनेक गावामध्ये होळी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने जी एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरू केली होती ती बंद करण्यात यावी असे केंद्र सरकारने सुचविले होते. परंतु ही योजना बंद केली तर विदर्भातील काँग्रेस पक्षावर त्याचा वाईट परिणाम होईल हे महाराष्ट्रीयन काँग्रेस नेत्यांनी केंद्रशासनाच्या लक्षात आणून दिले. त्यामुळे कापूस एकाधिकार योजना चालू राहिली. पुढे १९८६ व १९८८ साली शरद जोशींनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची आंदोलने केली परंतु ती आंदोलने अयशस्वी ठरली. शरद जोशींनी पाताळगंगा येथील रिलायन्स वस्त्रोद्योगाला वेढा घालून तेथील कृत्रिम धागा इतर कारखान्यांना पाठविण्यावर निर्बंध घालण्याचा कार्यक्रम घोषित केला. परंतु शरद जोशींचे हे आंदोलन अयशस्वी ठरले. कारण रिलायन्सने पाताळगंगा येथील गोदामातील माल अन्य ठिकाणी पाठविला होता.

त्यानंतर १९९०-९१ साली याच कारणांसाठी पुन्हा आंदोलन करण्याचे त्यांनी घोषित केले. परंतु ही आंदोलनेही त्यांनी शेवटच्या क्षणी मागे घेतली होती. त्यामुळे शेतकरी वर्ग नाराज झाला. १९८८ च्या कापूस आंदोलनानंतर शेतकरी संघटनेकडे कोणताही ठोस कार्यक्रम शिल्लक राहिलेला नव्हता.

६. शेतकरी संघटनेचे स्त्रीमुक्ती आंदोलन: १९८६ साली नाशिक जिल्हयातील चांदवड येथे शरद जोशी यांनी शेती व्यवसायातील शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिलांची परिषद भरविली होती. या परिषदेस महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत स्त्रियांना उमेदवारी देण्यात येईल असा ठराव या परिषदेने मंजूर केला. पुढे १९९२ साली झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शेतकरी संघटनेमार्फत महिलांना उमेदवारी देण्यात आलेली नाही. एवढेच नव्हे तर शेतकरी संघटनेच्या नियामक मंडळात कोणत्याही स्त्री उमेदवाराला संधी दिलेली नाही. शरद जोशी यांनी महिलांच्या राजकारणातील सहभागासंबंधी उपेक्षा केली अशी त्यांच्यावर टीका झाली.

शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण

महाराष्ट्रातील एक प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उदयाला आलेल्या आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावीपणे आंदोलने करणाऱ्या शेतकरी संघटनेत आज गटबाजी व फाटाफुटीने कळस गाठला आहे. आजवर अनेक महत्त्वाचे नेते आणि कार्यकर्ते शेतकरी संघटनेतून बाहेर पडले आहेत. विजय जावंधिया यांच्यापासून ते पाशा पटेल यांच्यापर्यंत ही यादी मोठी आहे. शरद जोशी यांना वगळून शेतकरी संघटना पुढे चालविणे म्हणजे कार्यकर्त्यांनी त्यांच्याविरुद्ध केलेले उघड-उघड बंडच होय. जेव्हा विजय जावंधिया, शंकर धोंडगे, पाशा पटेल ही नेतेमंडळी बाहेर पडली तेव्हा शरद जोशी यांचा शेतकरी समाजात करिश्मा होता. लाखोंच्या संख्येने शेतकरी त्यांच्या पाठीशी होते. त्यामुळे या नेत्यांच्या जाण्याने संघटनेवर कोणताच परिणाम झाला नाही. परंतु आता ती परिस्थिती राहिली नाही. ज्यांच्या सभा-आंदोलनांनी संपूर्ण महाराष्ट्रीयन शेतकरी समाज ढवळून काढला त्यांचा आज शेतकरी संघटनेतच प्रभाव क्षीण झाला आहे. 'कोटी कोटी शेतकऱ्यांचे पंचप्राण' ही बिरुदावली ज्यांनी बहाल केली तेच कार्यकर्ते खासदार जोशी यांचे बस्तान गुंडाळायला लागले आहेत. खा. जोशी यांना वगळून शेतकरी संघटना चालवावी असे वाटणारा एक मोठा गट सध्या रघुनाथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सक्रिय झालेला आहे. लक्ष्मण वडले, अमर हबीब, श्रीकांत घाटगे (कोल्हापूर), राजु शेट्टी (कोल्हापूर), दीपक भोसले (सोलापूर), कालीदास आपटे (अंबेजोगाई), अमृत शिंदे (परभणी) यांच्यासह अनेक कार्यकर्ते यांत आहेत. शरद जोशींच्या नेतृत्वावर श्रद्धा, निष्ठा ठेवणारा गट आणि शरद जोशींच्या नेतृत्वाला आव्हान देणारा बंडखोरांचा गट अशी सरळ सरळ फूट पडलेली आहे.

ज्या उद्देशाने शेतकरी संघटना जन्माला आली. तो 'रास्त भाव' अजून शेतकऱ्यांना मिळालेला नाही. खासदार जोशी शेती मालाला रास्त भाव मिळावा यासाठी 'ब्र' काढीत नाहीत. त्यांचे नेतृत्व आता शेतकऱ्याच्या हितासाठी राहिले नसून ते त्यांच्या स्वतःभोवतीच फिरत आहेत. जोशी हे जन्माने शेतकरी नाहीत. आजवर त्यांनी संघटनेची सूत्रे स्वतःकडेच ठेवली होती. पण आता शेतकरी कुटुंबात वाढलेल्यांच्या हाती सत्तासूत्रे सोपवावीत असे स्पष्ट वक्तव्य रघुनाथदादा पाटील यांच्यासह अनेक जण करीत आहेत. गेल्या दोन वर्षांत शेतकरी संघटनेत या ना त्या कारणाने प्रमुख कार्यकत्यांमध्ये वाढलेली आहे. खा. जोशी यांच्या भोवती असणाऱ्या चार-दोन कार्यकर्त्यांच्या कुरापती नेहमीच चालू असताना दिसतात. रघुनाथदादा पाटील शेतकरी

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष असताना परभणीत काही कार्यकर्त्यांनी त्यांना धक्काबुक्की केली होती. या कार्यकर्त्यांना मुद्दामच त्यांच्या अंगावर सोडण्यात आले होते. या घटनेची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली होती. चौकशी समितीने रघुनाथदादा पाटील यांच्यावरच कारवाई करा असा निकाल दिला. पाटील यांनी परभणीला झालेला प्रसंग आपणहून स्वतःवर ओढवून घेतला. स्वतंत्र भारत पक्ष वा शेतकरी संघटना यामध्ये आपल्या मर्जीशिवाय काही घडू नये, असे वाटणारी एक चौकडी तयार झाली होती. स्वतः कार्यक्रम जाहीर करणे वा कार्यकारिणीने जाहीर केलेला कार्यक्रम सोईचा वा फायद्याचा नसल्यास परस्पर रद्दबातल करणे, याद्वारे स्वतःचे अस्तित्व आणि महत्त्व वाढविण्याची कार्यकर्त्यांत अहमहमिका लागली होती. आपल्याशिवाय शेतकरी संघटनेला पर्याय नाही, शरद जोशीनंतर आपणच, या इराद्याला पहिला धक्का बसला तो परभणीच्या प्रसंगात. यापुढे आपला एकाधिकार चालणे कठीण वाटू लागल्यानेच त्यांच्यात वेगळी चूल मांडण्याचा विचार बळावू लागला. असंतुष्ट असणाऱ्यांना पदांची व इतरही आमिषे दाखविली गेली, जातीयवादाचा विषारी प्रचारही झाला परंतु संघटनेला खिंडार काही पडेना. शेवटी दिलजमाईची भाषा सुरू झाली. परंतु शरद जोशींना ही तडजोड मान्य नव्हती. त्यांनी कधी कुणाची पर्वाच केली नाही.

शरद जोशी यांनी जातीयवादी पक्षांबरोबर जाण्याचा जो निर्णय घेतला होता तो बंडखोर नेत्यांना मान्य नव्हता. वास्तविक युती कोणाशी करावी याचे अधिकार असणाऱ्या द्विसदस्य समितीचे एक सदस्य खुद्द रघुनाथ पाटीलच होते. तसेच ते स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्षही होते. वर्धा येथे झालेल्या चिंतन शिबिरात भारताने आता मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्याने शेतकरी संघटनेचे काही प्रयोजनच उरले नाही तेव्हा आता साऱ्यांनी स्वतंत्र भारत पक्षाला बळ द्यावे अशी मांडणी करणारे रघुनाथ पाटीलच होते. वास्तवात रघुनाथ पाटील यांची सारी मदार राजू शेट्टीसारख्या लढाऊ कार्यकर्त्यांवर होती. परंतु २००४ साली राजू शेट्टी शेतकरी संघटनेतून बाहेर पडले. शरद जोशीशिवाय शेतकरी संघटनेची भाषा करणाऱ्या नेत्यांना आता शरद जोशी यांच्या निर्णयक्षमतेविषयी शंका वाटू लागलेली आहे. संघटनेच्या विचाराचा खरा आणि मूळ गाभा घेऊन आम्हीच काम करीत असल्यामुळे आम्ही आहे त्याच ठिकाणी आहोत, शरद जोशी यांच्यात बदल झालेला आहे. असे या प्रमुख कार्यकर्त्यांचे मत आहे. शरद जोशी यांनी आजवर संघटनेत दुसरा नेता कोण किंवा आपल्यानंतर कोण असा पर्यायच निर्माण होऊ दिला नाही. शरद जोशी यांनी जी विविध आंदोलने केली त्या सर्व आंदोलनाची सर्व सूत्रे पद्धतशीरपणे स्वतःच्याच हातात ठेवली होती. स्वतःच्या सहकाऱ्यांचाही हस्तक्षेप त्यांना आवडत नसे. विरोधी पक्षाचे तर सोडाच, बाबा आढावासारख्या निष्पक्षपाती कार्यकर्त्याचे सहकार्य त्यांनी निपाणीच्या तंबाखू आंदोलनाच्या वेळी नाकारले होते. तेवीस शेतकऱ्यांचा बळी जाऊन तंबाखू आंदोलनाचाही अकाली अंत झाला. अशा प्रकारे शरद जोशींच्या नेतृत्वावर टीका होत असली आणि त्यांच्या आंदोलनातील यशापयशाचे परीक्षण केले तरीही त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेले प्रयत्न नाकारता येणार नाहीत. शेती उत्पादित मालाला योग्य व रास्त भाव मिळवून देण्यासाठी त्यांनी चालविलेल्या शेतकरी चळवळीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतकरी संघटनेने आजपर्यंत केलेल्या आंदोलनामुळे शेतीमालाला रास्त भाव मिळाला नाही असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. किंबहुना, बरे भाव मिळत गेल्यानेच शेतकरी आंदोलनाची आवश्यकता महत्त्वाची वाटू लागलेलीआहे, असे म्हणता येईल.

शेतकरी संघटना आणि राजकारण

शेतकरी संघटना स्थापन झाली तेव्हा सुरुवातीच्या काळात ही संघटना शेतकऱ्यांचे आर्थिक हितसंबंध जोपासणारी असेल आणि ती कोणत्याही परिस्थितीत राजकीय स्वरूपाची नसेल असे जाहीर करण्यात आले होते. शेतकरी संघटना कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा देणार नाही किंवा कोणत्याही राजकीय पक्षात सामील होणार नाही. परंतु शेतकरी संघटनेच्या सदस्याला किंवा कार्यकर्त्याला जो राजकीय पक्ष आवडेल त्या पक्षात तो सामील होऊ शकेल असे ठरविण्यात आले होते. संघटनेचा कोणत्याच राजकीय पक्षावर किंवा सरकारवर विश्वास नव्हता. कारण सर्वच राजकीय पक्ष केवळ शेतकऱ्यांची मते मिळविण्याच्या प्रयत्नात असतात तर, शासन नेहमीच शेतकऱ्यांच्या मालाला रास्त व योग्य भाव मिळू नये या प्रयत्नात असते. शेतकरी संघटनेला स्वतःचा राजकीय पक्ष काढावयाचा नव्हता. सत्ताधारी पक्ष शक्तिशाली नसावा, तसेच सत्ताधारी राजकीय पक्षाला समर्थपणे विरोध करणारी शक्ती असावी असे संघटनेच्या नेत्यांना वाटत होते. शेतकरी संघटनेला डावे पक्ष आणि त्यांची विचारसरणी मान्य नव्हती. जमिनीचे फेरवाटप करून शेतमजुरांना जमिनीचे वाटप करावे ही डाव्यांची विचारसरणी शेतकरी संघटनेला मान्य नव्हती.

शेतकरी विरुद्ध शेतमजूर अशी फूट पाडण्याची डाव्या पक्षांची विचारसरणी शरद जोशी यांना मान्य नव्हती. शेतकरी कामगार पक्ष डाव्या विचारसरणीचा पक्ष असून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात संघटित करण्यात आणि शेतीमालाला रास्त भाव मिळवून देण्यात अपयशी ठरला आहे असे मत शरद जोशींनी मांडले होते. १९८८ साली जनता पक्षाने नागपूरच्या विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या वेळी शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढून शेतकरी संघटनेच्या कार्याचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न केला असा आक्षेप जोशी यांनी घेतला होता. शरद जोशींनी १९९० च्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना युतीला पराभूत करावे असे मत प्रकट केले होते.

१९८९ साली होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी शरद जोशी यांनी प्रयत्न चालू ठेवले होते. दरम्यान महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी विरोधी पक्ष शेतकरी संघटनेबरोबर चर्चा करू लागले होते. जनता दल व राष्ट्रीय मोर्चाने तसेच काँग्रेस पक्षानेही शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले होते. शरद जोशी यांनी अशा या राजकीय परिस्थितीचा फायदा उचलण्यासाठी शेतकरी संघटनेला जे उमेदवार अनुकूल आहेत त्यांना पुरस्कृत करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आपण कोणत्या राजकीय पक्षाला मतदान करावे याविषयी शेतकऱ्यांत संभ्रम निर्माण झाला. अशा प्रकारे शेतकरी संघटनेतील शेतकऱ्यांच्या मतांचे विभाजन झाले. शरद जोशींनी काँग्रेस आणि काँग्रेसेतर पक्षांच्या उमेदवारांना पुरस्कृत करण्याचा आत्मघातकी व अयोग्य निर्णय घेतल्यामुळे शेतकरी संघटना मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली.

१९८९ मध्ये केंद्रस्थानी विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार सत्तेवर आले. त्यांनी कृषी उत्पादन मूल्य निर्धारण आयोगाच्या अध्यक्षपदी शरद जोशी यांची नियुक्ती केली. कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असणारे हे पद होते. पुढे १९९० साली समाजवादी जनता दलाचे सरकार आल्यानंतर शरद जोशींनी या पदाचा राजीनामा दिला. परंतु सरकारच्या विनंतीवरून त्यांनी या पदावर राहण्याचे मान्य केले. या पदावर असताना शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. १९९० साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जनता दलाचा एक घटक पक्ष म्हणून शेतकरी संघटनेने निवडणूक लढवून चार जागा जिंकल्या होत्या. एक दबाव गट या

पलीकडे शेतकरी संघटनेला सत्तेच्या राजकारणात फारसे स्थान नव्हते. दरम्यान शरद जोशींचे एक विश्वासू ज्येष्ठ अनुयायी अनिल गोटे शेतकरी संघटनेतून बाहेर पडले. त्यामुळे काही प्रमाणात शेतकरी संघटना कमकुवत झाली.

पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहून शेतकरी संघटनेचे कार्य चालू ठेवल्यामुळे शरद जोशी खेड्यापाड्यांपर्यंत जाऊन पोहोचले. शरद जोशींनी १९७८ ते १९८८ या काळात केलेल्या विविध आंदोलनांना शेतकरी वर्गाने प्रचंड पाठिंबा दिला. शेतकरी संघटनेने आयोजित केलेल्या आंदोलनांना लाखोच्या संख्येने शेतकरी उपस्थित राहू लागले. परंतु राजकीय पक्षविहीत संघटना उभी करण्यासाठी पाळावयाची पथ्ये शेतकरी संघटनेने पाळली नाहीत. राजकीय निवडणुकीत भाग न घेणे, निवडणुकीत भाग घेणाऱ्यांना पाठिंबा न देणे, चळवळीतील कार्यकर्त्यांनी निवडणुकीत संघटनेची पुण्याई न वापरणे अशी पथ्ये शेतकरी संघटनेने, शरद जोशींनी पाळली नाहीत. त्यामुळे ही संघटना राजकीय पक्षविहीत राहिली नाही. संघटनेच्या सुरुवातीच्या आंदोलनात शरद जोशी यांनी आपल्याबरोबर माधवराव बोरास्ते व माधवराव मोरे या सत्ताधारी काँग्रेसच्या नेत्यांना घेतले होते. अगदी सुरुवातीला नाशिक भागातील कांदा आंदोलन मालोजीराव मोघल वगैरे पवार काँग्रेसच्या व जनता पक्षाच्या त्या भागातील कार्यकर्त्यांनी सुरू केले व शरद जोशींनी त्यामध्ये नंतर भाग घेतला होता. शरद पवार यांनी इतर सर्व पक्षांच्या नेत्यांना बरोबर घेऊन शेतकऱ्यांच्या दिंडीच्या कार्यक्रमात भाग घेतला तेव्हा शरद जोशींनी या दिंडीत शेतकऱ्यांनी जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांना आवाहन केले होते. तरीही शेतकयांची दिंडी निघालीच. त्या वेळी मुख्यमंत्र्यांनी वाटाघाटीला बोलविल्यावर शरद जोशी, माधवराव बोरास्ते, माधवराव मोरे या आपल्या शिलेदारांना घेऊन गेले होते. चळवळीतील हवा काढून घेण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी टाकलेल्या डावाला शरद जोशी बळी पडले होते, एकीकडे मागण्यासाठी रेल्वे मार्ग, रस्ते रोखावयाचे, तर मान्य होण्यासाठी त्याच मागण्या घेऊन शांततेच्या मार्गाने जाणाऱ्या दिडीमध्ये सामील होऊ नका म्हणून सांगावयाचे आणि ऐन मोक्याच्या वेळी आंदोलन मागे घ्यावयाचे असा पोरकटपणा शरद जोशींनी त्यावेळी केला होता.

दरम्यान एक खुला राजकीय पर्याय म्हणून प्रोतकरी संघटनेला एक स्वतंत्र राजकीय फ्लॅटफॉर्म असावा या हेतूने शरद जोशी यांनी 'स्वतंत्र भारत पक्ष' स्थापन केला. प्रगत खुल्या आर्थिक विचारांचा, व्यापार व्यवसायाच्या बाबतीत पूर्णपणे नवा दृष्टिकोण असलेला आणि समाजातील उद्योगी, प्रयोगशील लोकांना एकत्र आणू पाहणारा असा हा स्वतंत्र भारत पक्ष आहे असा विचार जनमानसात रुजविण्याचा प्रयत्न संघटनेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी सुरू केला. दरम्यान शरद जोशी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील राजकीय पक्षांच्या पाठिंब्यावर राज्यसभेचे सदस्यत्व प्राप्त केले होते.

स्वाभिमानी शेतकरी संघटना

शेतकरी संघटनेतील एकाधिकारशाही आणि आंदोलनातील धरसोड वृत्तीला बहुसंख्य कार्यकर्ते कंटाळले होते. राजू शेट्टी या. निःस्वार्थी, धडाडीच्या स्वाभिमानी कार्यकर्त्याने शेतकरी संघटनेतील गटबाजी, पक्षपातीपणा आणि सत्तास्वार्थी राजकारण पाहून संघटनेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. २००४ साली शेतकरी संघटनेतून बाहेर पडून कोल्हापूर या सर्वाधिक साखर उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यात राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. कर्नाटकातील रयत संघाशी संघटन करून संपर्क माध्यमांच्या आणि बिगर शासकीय संघटनाच्या विशेष सहकार्यामुळे राजू शेट्टी आणि त्यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना राष्ट्रीय व्यासपीठापर्यंत

भरारी मारू शकली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर व मोबदला मिळावा यासाठी राजू शेट्टी यांनी प्रखर ऊस आंदोलने केली. सहकारी दूध संघातील संचालक वर्गाच्या भ्रष्टाचाराला पायबंद घालण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दूध आंदोलन सुरू केले. साखर सम्राट व दूध सम्राट यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी राजू शेट्टी यांनी आंदोलने छेडली. २००४ साली राजू शेट्टी महाराष्ट्र – विधानसभेवर निवडून आले होते. २००९ आणि २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकांत ते खासदार म्हणून निवडून आले होते. एक प्रभावी, आक्रमक संघटना म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेला पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळालेला आहे. ऊस उत्पाद्कांना आणि दूध उत्पादकांना योग्य न्याय मिळवून देण्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे योगदान निश्चितच मोठे आहे.

स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – २

अ) योग्य की अयोग्य ते सांगा :

१. महाराष्ट्रात शेतकरी संघटना १९७८ साली स्थापन झाली.

२. शरद जोशी हे शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते होते.

३. १८७५ च्या उठावाचा संबंध औद्योगिक कामगारांशी होता.

४. 'भीक नको, हवे घामाचे दाम' हा नारा शेतकरी चळवळीशी संबंधित आहे.

५. दूध आंदोलन पूर्णपणे यशस्वी ठरले.

६. शेतकरी संघटनेने सुरुवातीपासूनच राजकारणात सक्रिय सहभाग घेतला.

ब) रिकाम्या जागा भरा :

१. महाराष्ट्रात शेतकरी संघटना .... साली स्थापन झाली.

२. शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते .... होते.

३. १८७५ साली झालेल्या उठावाची चौकशी .... कमिशनने केली.

४. भीक नको, हवे .... दाम हा शेतकरी चळवळीचा नारा होता.

५. कांदा आंदोलनाचे प्रमुख केंद्र .... होते.

६. .... आंदोलनात शेतकरी संघटनेला माघार घ्यावी लागली.

क) योग्य पर्याय निवडा

१. शेतकरी संघटनेची स्थापना कोणी केली?

अ) राजू शेट्टी ब) शरद जोशी

क) महात्मा गांधी ड) बाबासाहेब आंबेडकर

२. शेतकरी संघटनेचे मुख्य उद्दिष्ट काय होते?

अ) राजकीय सत्ता मिळविणे ब) शेतमालाला योग्य भाव मिळविणे

क) औद्योगिक विकास ड) शिक्षण प्रसार

३. खालीलपैकी कोणते आंदोलन शेतकरी चळवळीशी संबंधित आहे?

अ) गिरणी कामगार संप | ब) कांदा आंदोलन

क) विद्यार्थी आंदोलन | ड) स्त्रीवादी आंदोलन

४. स्वाभिमानी शेतकरी संघटना कोणी स्थापन केली?

अ) शरद जोशी | ब) रघुनाथ पाटील

क) राजू शेट्टी | ड) विजय जावंधिया

५. शेतकरी संघटनेचा नारा कोणता?

अ) जय जवान जय किसान | ब) भीक नको, हवे घामाचे दाम

क) इन्कलाब जिंदाबाद | ड) वंदे मातरम्

ड) जोड्या जुळवा :

अ गट (नेते/घटना)	**ब गट (संबंध)**
१) शरद जोशी	अ) शेतकरी संघटना
२) १८७५ उठाव	ब) डेक्कन दंगे
३) राजू शेट्टी	क) स्वाभिमानी शेतकरी संघटना
४) कांदा आंदोलन	ड) रास्त भावाची मागणी

२.३ अ) **दलित चळवळ** (Dalit movement since 1960)

दलित चळवळ ही एक सामाजिक चळवळ असून तिचे स्वरूप विद्रोही (Protest) आहे. भारतीय समाजव्यवस्था ही जातिसंस्थेवर आधारलेली असल्यामुळे कामाची, व्यवसायाची विभागणी जातीवर ठरलेली होती. त्यामुळे समाजात वरिष्ठ, कनिष्ठ अशी वर्गवारी निर्माण झाली. कष्टाची, हलकी कामे करणाऱ्या लोकांना कनिष्ठ समजण्यात येऊ लागले. उच्चवर्णीय, वरिष्ठ जातीतील लोकांकडून कनिष्ठ जातीतील लोकांची पिळवणूक होऊ लागली. सामाजिक, आर्थिक, राजकीय पातळीवर दलितांना हीन दर्जाची अमानुष वागणूक मिळू लागली. सवर्ण, उच्च्च जातींकडून दलितांचे शोषण होऊन त्यांचे अधिकार हिरावून घेण्यात आले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात दलित समाजाने आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध, पिळवणुकीविरुद्ध आवाज उठविला. आपले हिरावून घेतलेले अधिकार परत मिळविण्यासाठी, आपण आपल्या स्वत्वासाठी लढे उभारले पाहिजेत, संघर्ष केला पाहिजे, विद्रोह केला पाहिजे या जाणिवेतून दलित चळवळीचा उदय झालेला आहे. पारंपरिक जातिव्यवस्थेमध्ये अस्पृश्य, मागासलेल्या लोकांना मिळालेल्या अमानुष वागणुकीतून व संतापातून दलित चळवळ निर्माण झालेली आहे.

रॉबर्ट मर्टन यांनी मांडलेला सापेक्ष वंचितता सिद्धांत दलित चळवळीच्या निर्मितीला तंतोतंत लागू पडतो. मर्टन यांच्या मते, समाजातील विविध स्तरांतील लोक जेव्हा राहणीमान, जीवन, दर्जा आणि स्थिती यांचा अन्य स्तरांतील लोकांबरोबर तुलना करतात तेव्हा विशिष्ट पातळीवरील लोकांना त्यांच्यामधील तफावत प्रकर्षाने जाणवते. भारतीय समाजव्यवस्थेतील दलित समाजाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवरील

वंचिततेची जाणीव झाल्यामुळे त्यांच्यात अन्यायाविरुद्ध लढा देण्याची (विद्रोह करण्याची) मानसिकता निर्माण झाली आणि त्यातूनच दलित चळवळ उदयाला आली.

महाराष्ट्र व दलित चळवळ

दलित चळवळीचा अभ्यास करताना प्रथम 'दलित' या संज्ञेचा अर्थ समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. व्यापक अर्थाने दलित चळवळीचा अर्थ असा आहे की, अस्पृश्य समजल्या गेलेल्या सर्व जातिजमाती आणि आदिवासी यांचा समावेश दलितांमध्ये होतो. भारतीय समाजव्यवस्था ही जातीवर आधारलेली असल्यामुळे जन्मावरून माणसाची जात व दर्जा ठरविला जातो. प्रतीची, हलकी, कष्टाची कामे कनिष्ठ जातीतील लोक करीत असत. चातुर्वण्यपद्धतीमधील जाती, जमाती, आदिवासी अशा सर्व कनिष्ठ जाती, जमातीमधील दलितांची संख्या सुमारे १६ कनिष्ठ जातींचे अस्पृश्य लोक दलित म्हणून ओळखले जातात. सध्या भारतातील अनुसूचित शुद्र वर्णाच्या लोकांना अस्पृश्य मानले जात होते. १९९१ च्या जनगणनेनुसार ७७% दलित मजूर शेतमजूर म्हणून काम करतात, काही जागृत सुशिक्षित दलितांना आरक्षण धोरणाचा लाभ काही प्रमाणात मिळालेला आहे. बाकीचे दलित लोक हलकी, कष्टाची कामे करताना दिसतात.

दलित चळवळीचा प्रवास

महाराष्ट्रातील दलित चळवळीचा अभ्यास करताना दलित चळवळीच्या कालखंडाचे तीन भाग पाडावे लागतील.

(अ) आंबेडकर पूर्व दलित चळवळ

भारतीय समाजातील दलितांमध्ये जागृती निर्माण करण्याचे, त्यांचा उद्धार करण्याचे सर्वप्रथम कार्य महात्मा फुले, रामास्वामी नायकर 'पेरीयार', नारायण गुरू यांनी केलेले आहे. महात्मा फुले यांनी दलितांना शिक्षण देऊन त्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी १८५२ साली शाळा स्थापन केल्या. लहुजी वस्ताद आणि राणबा अशा दलित सहकाऱ्यांना हाताशी धरून त्यांनी दलित लोकांमध्ये शिक्षणाविषयी जिज्ञासा निर्माण केली. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी जनजागृती घडवून आणण्याचे महान कार्य केले. मद्रास प्रांतात इ. व्ही. रामास्वामी नायकर 'पेरीयार' यांनी १९२५ साली ब्राह्मणेतरांचा (दलितांचा) स्वाभिमान जागृत करण्यासाठी 'Self respect movement' सुरू केली. नारायण गुरू यांनी केरळमधील ईझवा दलितांमध्ये 'एक जात, एक धर्म, एक देव' असे विचार मांडून जनजागृती घडवून आणली. त्यामुळे दलितांमध्ये ब्राह्मणी मूल्यांच्या विरोधी जाण्याची मानसिकता तयार झाली.

छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दलितांच्या उद्धारासाठी शिक्षणदानाचे कार्य केले. दलितांनी वरिष्ठ वर्गांच्या सहानुभूतीवर अवलंबून न राहता स्वबळावर आपले न्याय्य हक्क प्राप्त करावेत असे त्यांच्या कार्याचे मुख्य उद्दिष्ट होते.

महाराष्ट्र राज्यातील दलित वर्गाला जागृत करण्याचे कार्य गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे आणि किसन फागुजी बनसोडे या प्रभुतींनी केलेले आहे. १८८६ साली ब्रिटिश लष्कारातून निवृत्त झाल्यानंतर गोपाळ बाबा वलंगकर यांनी दापोली येथे 'अनार्य दोष परिहार' नावाची संस्था स्थापन करून त्याद्वारे दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्यांच्या मते अस्पृश्यता ही ईश्वरनिर्मित नसून ती एक सामाजिक रूढी आहे. समाजातील उच्चवर्णीयांनी कनिष्ठ वर्णीयांवर (दलितांवर) लादलेली ती गुलामगिरी

आहे. ब्रिटिश लष्करात भरती होताना अस्पृश्यांवर जे निर्बंध घातले होते त्याविरुद्ध आवाज उठवून अस्पृशांना न्याय देण्याचे कार्य वलंगकर यांनी केले होते. पुणे येथील शिवराम जानबा कांबळे यांनी दलित अनिष्ट चालीरीती नष्ट करण्याचे प्रयत्न केले. 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक त्यांनी काही समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी दलितांमधील पोतराज, देवदासी यांसारख्या काळ चालवून दलितांच्या आचार-विचारांत सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले. त्यांनी १९२९ साली झालेल्या पर्वती मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. विदर्भात किसन फागुजी बनसोडे यांनी दलित मुलांच्यासाठी शाळा, वसतिगृहे सुरू केली. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे आणि सामाजिक प्रश्नांवर परिषदा भरवून दलित समाजाला जागृत करण्याचे, स्वाभिमानी बनविण्याचे कार्य केले. याशिवाय विठोबा रावजी मून, केशवरावजी खंडारे, रेवाराम कवाडे, कालीचरण नंदा गवळी इत्यादी समाजसुधारकांनी दलित समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. दलित चळवळीच्या या पहिल्या कालखंडात विद्रोह नव्हता.

(ब) डॉ. आंबेडकरांच्या काळातील दलित चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी आणि आपल्या न्याय्य हक्कांच्या प्राप्तीसाठी दलितांना जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी दलितांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी १९२४ साली 'बहिष्कृत हितकारीणी सभा' ही संस्था स्थापन केली. त्यांनी मूक नायक, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत आणि जनता या माध्यमांतून विपुल लिखाण करून दलितांमध्ये सुधारणा, जागृती आणि शिक्षणप्रसाराचे कार्य केले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा महामंत्र त्यांनी दलित समाजाला दिला. चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदिर प्रवेश, गोलमेज परिषद, हिंदू कोड बील, सायमन कमिशन, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, मजूर पक्ष, समता सैनिक दल, पुणे करार, दलित हक्कांचा जाहीरनामा आणि भारताचे संविधान इत्यादींबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चळवळी समाज परिवर्तनासाठी प्रेरक होत्या. डॉ. आंबेकडकर यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आघाड्यांवर विरोध नोंदविले आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या या मानवमुक्तीच्या लढ्यात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या मूल्यांचा शोध घेणारे विद्रोह होते. मानव विज्ञाननिष्ठ व्हावा, त्याला मानवतेची व अस्मितेची जाणीव व्हावी अशा व्यापक उद्दिष्टाभोवतीच डॉ. आंबेडकरांचे सर्व लढे केंद्रीभूत झालेले होते. सत्याग्रह, सभा, संमेलने, परिषदा, यांद्वारे त्यांनी दलितांना सामाजिक हक्क प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले होते. दलितांमध्ये राजकीय जाणीव निर्माण होण्यासाठी आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. स्वतंत्र मतदारसंघाची मागणी, तीन गोलमेज परिषदांमध्ये दलितांना राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी घेतलेला सहभाग, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन व रिपब्लिकन पक्षाची बांधणी यांद्वारे त्यांनी दलितांमध्ये राजकीय जाणीव आणि जागृती निर्माण केली. हिंदू धर्मात राहून दलितांना समान हक्क मिळणे अशक्य आहे हे ओळखूनच त्यांनी धर्मांतर केले. डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध धर्मात प्रवेश करून सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले. त्यामुळे दलितांना नवीन मूल्ये मिळाली, त्यांना स्वाभिमान व माणुसकी मिळाली, त्यांचा न्यूनगंड गळून पडला, स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण बदलला. दलितांचा स्वाभिमान, आत्मविश्वास, स्वतंत्र अस्मिता, क्रांतिकारी जाणीव, राजकीय जागृती, विज्ञाननिष्ठ मूल्ये स्वीकारण्याची मानसिक तयारी ही आंबेडकरांच्या काळातील दलित चळवळीची ठळक वैशिष्ट्ये होत.

(क) डॉ. आंबेडकरांनंतरची दलित चळवळ

दलित चळवळीच्या तिसऱ्या कालखंडात रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर व दलित साहित्य यांनी वेळोवेळी केलेल्या चळवळींचा समावेश केला जातो. १९३५ सालानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीला व्यापक असा वर्गीय पाया देण्याचा प्रयत्न केलेला होता. स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात तसा उल्लेख आढळतो. परंतु पुढे त्यांनी वर्गीय भूमिका सोडून देऊन शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. प्रभावी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला पर्यायी विरोधी पक्ष असावा या हेतूने डॉ. आंबेडकरांनी ज्येष्ठ समाजवादी विचारवंत राममनोहर लोहिया यांच्याशी बोलणी केली, तसा त्यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन विसर्जित करून रिपब्लिकन पक्षाची उभारणी करावी असे विचार आंबेडकरांच्या मनात येऊ लागले होते, तसा त्यांनी संकल्प सोडलेला होता. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची चळवळ आणि रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेचा संकल्प या दोन महत्त्वपूर्ण चळवळी केल्या होत्या. परंतु धर्मांतराच्या चळवळीनंतर दोन महिन्यांनी डॉ. आंबेडकराचे निधन झाल्यामुळे त्यांनी सुरू केलेल्या राजकीय व धार्मिक चळवळी दिशाहीन, नेतृत्वहीन बनल्या. डॉ. आंबडेकरांच्या पश्चात एन. शिवराज, राजाभाऊ खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड यांच्यासारख्या जुन्या व जाणत्या नेत्यांनी ३ ऑक्टोबर, १९५७ रोजी नागपूर येथे रिपब्लिकन पक्ष स्थापन केला. १९५७ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या पक्षाचे सहा खासदार निवडून आले होते. रिपब्लिकन पक्ष स्थापन झाल्यापासून एक वर्षाच्या आत त्याचे विभाजन झाले. ॲड. बी. सी. कांबळे यांनी आपला वेगळा गट स्थापन केला. दादासाहेब गायकवाड आणि इतर नेते वेगळे राहिले. बी. सी. कांबळे यांचा 'दुरुस्त गट' व इतरांचा 'नादुरुस्त गट' अशी विशेषणे रिपब्लिकन गटांना प्राप्त झाली. पुढे १९६२ साली रिपब्लिकन पक्ष आणखी चार गटात फुटला गेला. बी. सी. कांबळे हे कायम काँग्रेसच्या विरोधात राहिले, इतर नेत्यांनी मात्र काँग्रेस पक्षाबरोबर नेहमीच घरोबा ठेवला. रिपब्लिकन पक्षात कांबळे गट, गायकवाड गट, भंडारे गट, गवई गट, खोब्रागडे असे गट निर्माण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा पक्ष स्थापन करणे आणि त्याआधारे राजकारण करणे हे नंतरच्या नेत्यांना जमले नाही. कारण सत्तेची अभिलाषा असणाऱ्या नेत्यांना काँग्रेसचे आकर्षण कायमपणे राहिले गेले. रिपब्लिकन पक्ष जातीच्या बाहेर जाऊ शकला नाही. रिपब्लिकन पक्ष एकजातीय राहिला यांत या पक्षाचे नुकसान झाले. या पक्षाला संसदीय राजकारणात जातीच्या पलीकडे जाऊन जनाधार प्राप्त करता आलेला नाही. याबाबत काही प्रमाणात काँग्रेस पक्षाला दोष द्यावा लागेल. काँग्रेसने नेहमीच रिपब्लिकन पक्षाच्या मतांचे राजकारण केले. रिपब्लिकन पक्षातील अनेक नेत्यांना काँग्रेस पक्षाने विविध आमिषे दाखवून आपल्या बाजूला खेचले. त्यामुळे काँग्रेस पक्षाला सत्तेचा मार्ग अधिक सुकर झाला. दादासाहेब गायकवाड, आर. डी. भंडारे, रा. सु. गवई, दादासाहेब रुपवते, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, न्या. भोळे, रामदास आठवले इत्यादी नेत्यांनी काँग्रेस पक्षाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संधान बांधून सत्तेचे राजकारण केले. रिपब्लिकन गटातटांच्या राजकारणाला कंटाळलेली जनता पर्याय शोधत असताना दलित पँथरची स्थापना झाली. दलित तरुणांनी नागरी हक्कासाठी आणि सामाजिक न्यायासाठी दलित पँथर ही चळवळ उभारली. मागासवर्गीय जातिजमाती, नवबौद्ध, कष्टकरी, गरीब, भूमिहीन शेतकरी, स्त्रिया आणि सर्व शोषित यांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न होता. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद अशा भागात दलित पँथरची चळवळ पसरलेली होती. परंतु संपूर्ण महाराष्ट्रभर ही चळवळ पसरू शकली नाही आणि तसा प्रयत्नही झाला नाही. रिपब्लिकन पक्षाप्रमाणे

दलित पँथरमध्येही अंतर्गत मतभेद निर्माण झाले. १९७४ मध्ये राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांचे गट वेगळे झाल्याने दलित पँथरमध्ये फूट पडली. राजा ढाले यांना बौद्ध धर्म आणि त्यातील विचार महत्त्वाचे वाटत होते तर, नामदेव ढसाळ दलित प्रश्नांची सांगड मार्क्सवादाशी घालत होते. याशिवाय व्यक्तिगत हेवेदावे, नेतृत्वस्पर्धा यामुळे दलित पँथर ही संघटना विभागली. यातूनच पुढे मास मूव्हमेंट, दलित मुक्तिसेना, दलित युवक आघाडी, प्रशिक विद्यार्थी संघटना, भारतीय विद्यार्थी संसद, डी. एस. फोर, बामसेफ, भा. रि.प./बहुजन महासंघ इत्यादी संघटनांची निर्मिती झाली. दलित पँथरची चळवळ ज्या प्रमाणात शहरी भागात वाढली त्या प्रमाणात ग्रामीण भागात फारशी वाढली नाही अशी खंत डॉ. लता मुरुगकर यांनी आपल्या 'दलित पँथर मूव्हमेंट इन महाराष्ट्र' या ग्रंथात व्यक्त केली आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार ही दलित पँथरची विचारप्रणाली होती. परंतु दलित पँथरच्या जाहीरनाम्यातून प्रकट होणारी विचारप्रणाली ही कांहीशी डाव्या विचारांशी सलगी करणारी होती. त्यामुळे ती आंबेडकरांच्या विचाराविरोधी आहे अशा प्रकारचा गदारोळ दलित पँथर चळवळीत निर्माण झाला. त्यामुळे दलित पँथरच्या जाहीरनाम्यावरून दलित पँथरमध्ये दोन गट पडले होते. दलित पँथरने दलितांच्या समस्यांसंबंधी जे कार्यक्रम राबविले त्यामध्ये धरसोड वृत्ती होती. दलितांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्याची समस्या, नामांतराचा प्रश्न, झोपडपट्टीवासीयांचे प्रश्न, सार्वजनिक सेवांतील बॅकलॉग भरून काढण्याचा प्रश्न, रिडल्सचा प्रश्न, दलितांसाठी सहकारी बँका उघडण्याचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांबाबत दलित पँथरच्या नेत्यांनी आपली भूमिका मांडली आणि जळजळीत प्रतिक्रिया व्यक्त केली. परंतु हे प्रश्न सोडविण्यासाठी दलित पँथरनी आपली भूमिका ठामपणे लावून धरली नव्हती. त्यामुळे दलित पँथरच्या चळवळीत या प्रश्नांच्या बाबतीत धरसोड वृत्ती निर्माण झाली. १९७४ साली झालेली वरळी दंगल आणि १९७७ चा मराठवाडा नामांतराचा प्रश्न यांबाबतीत दलित पँथरने आक्रमक आणि क्रांतिकारी जहाल भूमिका घेतली होती. याशिवाय भूमिहीन शेतमजूर, महिला, सफाई कामगार यांच्या प्रश्नासंबंधी दलित पँथरने लढे उभारले होते. १९७४ हे वर्ष दलित पँथरने विद्रोही वर्ष म्हणून जाहीर केले होते. अशा प्रकारे दलित पँथरने विविध प्रश्नांसंबंधी प्रकट केलेले विद्रोह 'निषेध चळवळ' म्हणून विचारात घ्यावे लागतात. दलितांनी दलितांच्या मुक्तीसाठी उभारलेली संघटना म्हणून दलित पँथरचा उल्लेख करता येईल. दलितांवर होणाऱ्या अत्याचार प्रसंगी आक्रमकपणे धावून जाणारी ती एक प्रभावी संघटना विश्लेषण करताना असे मत मांडले आहे की, बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञान व प्रतीकांमधून सर्व होती. असे अरुण साधू यांनी म्हटलेले आहे. डॉ. गोपाळ गुरू यांनी दलित पँथरचे सैद्धांतिक जातीतील लोकांची एकजूट कशी करता येईल याबद्दलची स्पष्टता दलित पँथरच्या कार्यक्रमात व सांस्कृतिक प्रश्नांमधील अग्रक्रम पँथरला ठरविता आला नाही. दलित पँथरने भावनिक प्रश्नांवर अधिक जोर दिला होता. त्यामुळे आर्थिक भूमिकेमुळे पँथरला दलितांच्या वर्गीय जुटीच्या दृष्टीने काहीच करता आलेले नाही. डॉ. पी.जी. जोगदंड यांच्यामते. 'दलित पँथरच्या, आक्रमक पवित्र्यात इतर दलित जाती, आदिवासी यांचे भान जसे सुटले, तसे स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे आणि दडपणुकीचे भानही सुटले. दलित पँथर नेतृत्वाने आपल्या चळवळीत स्त्रियांचे नेतृत्व उभे राहावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला नाही. कारण दलितांमधील अभिजन वर्गाची हितसंबंधी चळवळ असे संकुचित रूप दलित चळवळीला आलेले होते. आज दलित चळवळीला जे स्वरूप आले आहे त्यात आपल्याला व्यक्तिगत हेवेदावे, वैचारिक दिवाळखोरी, संघटनात्मक विस्कळीतपणा, नियोजनबद्ध कार्यक्रमाचा अभाव, अस्पष्ट उद्दिष्टे या सर्व गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. राखीव जागेवर डोळा ठेवून वावरणारे सुशिक्षित तरुण, निवडणुकीच्या राजकारणावरच सर्व शक्ती एकत्रित करणारे राजकारणी, संघर्षापेक्षा सामोपचाराने वागणारे कार्यकर्ते, आंबेडकरी धम्मापेक्षा पारंपरिक कर्मकांड, विधी करणारे अतिउत्साही या सर्वांनी मिळून दलित

चळवळीला आज अवकळा आणलेली आहे. आज दलितांमध्ये स्थितिशीलता निर्माण होऊन या चळवळीचा मार्ग रोखला गेलेला आहे.'

दलित चळवळीचे भवितव्य

१९५६ नंतरची सर्व दलित चळवळ ही भारतीय राज्यघटनेच्या मर्यादेतच फिरत राहिलेली दिसते. भारतीय राज्यघटना भांडवलशाहीतील सर्व मूलभूत स्वातंत्र्याचे आश्वासन देणारी होती आणि त्या स्वातंत्र्याच्या आधाराने जनतेच्या चळवळी संघटित करून समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या समग्र परिवर्तनाच्या दिशेने पावले उचलता येतील अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कल्पना होती. ही राज्यघटना विशिष्ट काळ अस्पृश्य जातिजमातींना खास अधिकार देण्याचे आश्वासन देणारी होती, यामुळे शिक्षण होईल,सुशिक्षितांचा समुदाय संघटित होईल. आपल्या व समाजाच्या दुःखाचे आणि ही दुःखे ज्यांच्यामुळे भोगावी लागतात त्या शत्रूचे त्याला सम्यक ज्ञान होईल आणि तो त्या शत्रुविरुद्ध पेटून उठून सामाजिक-आर्थिक न्यायाच्या चळवळीत ओढला जाईल, केवळ या आशेवरच बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या संबंधी तडजोडवादी भूमिका स्वीकारली होती. ही राज्यघटना कोण आणि केव्हा मोडून टाकील याचे भविष्यही ही राज्यघटना तयार करताना घटना परिषदेत २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी त्यांनी आपल्या भाषणात वर्तविले होते.

प्रा. रावसाहेब कसबे यांच्या मते, आज दलित चळवळीचा विचार केवळ राजकीय दृष्टीने करून चालणार नाही, तर त्यात सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीचाही समावेश करावा लागेल. त्याचप्रमाणे दलितांच्या राजकीय चळवळीचा विचार करताना केवळ रिपब्लिकन पक्षाच्या गटागटाच्या विचार करून भागणार नाही. तर दलितांच्या नावाने व्यापक राजकारण करायला काँग्रेससारख्या इतर पक्षांत गेलेल्या नेत्यांचा व त्यांच्या चळवळींचाही विचार करावा लागेल. कारण त्यांना तेथे जाऊनही आपण 'आंबेडकरवादी' आहोत असे जाहीर केल्याशिवाय राजकारण करणे अशक्य झालेले दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या अपेक्षेने राज्यघटना स्वीकारण्यात तडजोड केली होती, ती त्यांची अपेक्षा अर्धी पूर्ण झाली. राज्यघटनेतील खास सवलतीचा फायदा घेऊन दलित-बौद्ध समाजातून एक सुशिक्षितांचा वर्ग निर्माण झाला. तो काही प्रमाणात संघटितही झाला आणि दलित नेतृत्वाच्या आजूबाजूला फिरकूही लागला. परंतु भारतीय राज्यघटनेने ज्या वर्ग-वर्चस्वाचा मार्ग खुला ठेवला होता त्या वरच्या वर्गात आपला समावेश व्हावा अशी खुद्द बाबासाहेबांच्या नंतरच्या दलित नेतृत्वातील अनेकांची इच्छा होती. एकीकडून सर्वच दलित जनतेला या वरच्या वर्गात तर नेता येणे शक्य नव्हते आणि संपूर्ण दलित जनतेला सामाजिक, आर्थिक न्याय मिळवून द्यायचा म्हणजे वर्गवर्चस्वाविरुद्ध लढाई करून बाबासाहेबांना अभिप्रेत असणाऱ्या राज्यसमाजवादाची, वर्गहीन समाजव्यवस्थेसाठी चळवळ करायची तर, दुसरीकडून नेत्यांना वरच्या वर्गात जाऊन बसण्याची घाई झालेली होती या मानसिक दुभंगलेपणातूनच दलित नेतृत्व आणि दलित जनता यांची नाळ कायमची तुटली आणि दलित जनतेला बाबासाहेबांच्या नंतर सर्वमान्य नेता राहिला नाही. ज्या वर्गाच्या हातात येथील अर्थसत्ता आणि राज्यसत्ता आहे ते सतत जागरूक राहिले. या राज्यघटनेच्या विरोधी आवाज उठविणाऱ्यांना अनेक आमिषे दाखवून सतत दाबून ठेवण्याची त्यांनी सोय करून घेतली. सत्ताधारी वर्ग आणि त्यांच्या सुरात सूर मिसळून संसदीय लोकशाहीला 'साधना' ऐवजी 'साध्य' मानणारा दलित नेत्यांचा वर्ग निर्माण झाला. घटनात्मक चौकटीत बंदिस्त झालेल्या दलित नेत्यांना समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीसाठी घटनात्मक

चौकटी पलीकडे आणि संसदीय राजकारणाच्या मर्यादांच्या बाहेर राहून काही तरी करावे लागते यांचा पूर्णपणे विसर पडला.

महाराष्ट्रातील दलित संघटनांचे ऐक्य घडवून चळवळ पुढे नेण्याचे प्रयत्न आजवर अनेक वेळा झाले, परंतु हे ऐक्य टिकले नाही. कधी हटवादी व हट्टाग्रही नेत्यांनी आपले सवते सुभे पुनश्च निर्माण केले, तर कधी ऐक्याला सुरुंग लावण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न काही राजकीय पक्षांनी केले. १९ डिसेंबर, १९८९ रोजी मुंबई येथे आंबेडकर भवनमध्ये दलित नेत्यांची प्रदीर्घ बैठक होऊन दलितांमधील गटातटांचे राजकारण संपविण्यात आले. दरम्यान दलित पँथरच्या नेत्यांनी दलित पँथरच्या विसर्जनाला कडाडून विरोध केला. त्यानंतर ६ जानेवारी, १९९० रोजी शिवाजी पार्कवर दलितांची विराट सभा होऊन दलित नेत्यांचे ऐक्यदर्शन घडून आले. परंतु १९९० साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत दलितांच्या ऐक्याला पुन्हा ग्रहण लागले. दलित नेते अन्य राजकीय पक्षांशी युती करून सत्ताप्राप्तीच्या मागे लागले. त्यामुळे दलितांच्या ऐक्याला पुन्हा तडे गेले. रामदास आठवले यांनी काँगेस पक्षाशी तर प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीग आघाडीबरोबर युती केली. १९८० ते १९९८ पर्यंत रिपब्लिकन पक्षाला व विधानसभेसाठी १३ जागा काँग्रेस पक्षाने रामदास आठवले गटाला दिल्या होत्या, परंतु या गटाला एकाही जागेवर विजय मिळाला नाही, रिपब्लिकन कांबळे गटाला १९९० च्या विधानसभेत ४ आणि २००४ च्या विधानसभेत १ जागा मिळाली. २००४ च्या लोकसभेत रामदास आठवले एक जागा मिळाली होती. प्रकाश आंबेडकर यांच्या बहुजन महासंघाला १९९९ च्या विधानसभेत या गटाला लोकसभेत एक जागा मिळाली. अशा प्रकारे निवडणुकीच्या राजकारणात नेहमी वजाबाकी दलितांची आणि बेरीज अन्य राजकीय पक्षांची झालेली आहे. एकूण दलित नेत्यांच्या ऐक्याच्या अभावाचे हे परिणाम आहेत.

६ डिसेंबर, १९९५ रोजी झालेल्या चैत्यभूमीवरील सभेत आणि २५ डिसेंबर, १९९५ रोजी आंबेडकर भवन, दादर येथे झालेल्या बैठकीत आंबेडकरवादी चळवळीतील सर्व नेत्यांनी आपापले पक्ष व संघटना विसर्जित करून ऐक्याचा एकच रिपब्लिकन पक्ष असल्याचे जाहीर केले होते. परंतु पुढील काळात झालेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांत दलित नेत्यांचे ऐक्य टिकून राहिले नाही.

गेल्या ५० वर्षांच्या काळातील दलित चळवळीचा आढावा घेतला असता महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर रिपब्लिकन गटातटांचे सत्तेचे राजकारण सातत्याने चालू असलेले दिसते. मताच्या राजकारणात आपली किंमत करण्यात आपले नेते कमी पडत नाहीत, तर ते स्वतःच्या पलीकडे पाहत नाहीत या गोष्टीची प्रखर जाणीव दलित जनतेला झालेली आहे. म्हणूनच दलित नेत्यांच्या गटातटाच्या राजकारणाला कंटाळलेली दलित जनता नेतृत्वाचा नवा पर्याय शोधताना दिसते. देशात दलितांची संख्या १६.२% असून महाराष्ट्रात ती १०.२% आहे. महाराष्ट्रातील दलित समाज हा झुंझार-लढाऊ वृत्तीचा (Most militant) आहे हे नामांतराच्या आंदोलनाने दाखवून दिले आहे. मागासवर्गीयांचे सर्व प्रश्न धसास लावून सोडविण्याचे श्रेय दलित जनतेचे आहे. अलीकडे आघाडीचे राजकारण सुरू झाल्यामुळे दलित नेत्यांना संसदीय राजकारणात आपल्या समाजासाठी जास्तीतजास्त लाभ कसा मिळवयाचा याचे गणित सोडवावे लागत आहे. बदलत्या राजकीय व आर्थिक परिस्थितीत आता दलित नेत्यांना योग्य निर्णय घेऊन सत्तेचे राजकारण करावे लागणार आहे याची जाणीव दलित जनतेला झालेली आहे. दलित समाजातील कर्तृत्ववान नेतृत्व जनतेच्या पाठिंब्यावर सत्ताप्राप्ती करू शकते हे मायावती यांनी उत्तर प्रदेशात दाखवून दिले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातही दलित जनतेच्या

राजकीय सहभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे या विषयीची जाणीव अन्य राजकीय पक्षांना आहे. त्यामुळे दलित जनता, दलित नेते यांच्या सहकार्याची गरज त्यांना नेहमीच भासत असते. भविष्यकाळात दलितांचा पाठिंबा घेऊनच त्यांना आघाडीचे राजकारण करावे लागणार आहे.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३.

अ) योग्य की अयोग्य ते सांगा :

१. दलित चळवळ ही एक सामाजिक व विद्रोही चळवळ आहे.

२. रॉबर्ट मर्टन यांनी सापेक्ष वंचितता सिद्धांत मांडला.

३. दलित पँथर चळवळ ग्रामीण भागात अधिक प्रभावी होती.

४. डॉ. आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा संदेश दिला.

५. रिपब्लिकन पक्ष कधीही फुटला नाही.

६. दलित चळवळीचा संबंध केवळ आर्थिक प्रश्नांशी आहे.

ब) रिकाम्या जागा भरा :

१. 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना .... यांनी केली.

२. 'Self Respect Movement' .... यांनी सुरू केली.

३. दलित पँथरची स्थापना .... साली झाली.

४. 'अनार्य दोष परिहार' संस्था .... यांनी स्थापन केली.

५. शिका, संघटित व्हा आणि .... करा हा संदेश होता.

६. दलित पँथरची चळवळ मुख्यतः .... भागात केंद्रित होती.

क) योग्य पर्याय निवडा

१. दलित चळवळीचा मुख्य उद्देश काय होता?

अ) राजकीय सत्ता मिळविणे ब) सामाजिक न्याय व समान हक्क

क) औद्योगिक विकास ड) धार्मिक प्रचार

२. 'सापेक्ष वंचितता सिद्धांत' कोणी मांडला?

अ) मॅक्स वेबर ब) रॉबर्ट मर्टन

क) कार्ल मार्क्स ड) डुर्काइम

३. दलित पँथरची स्थापना कोणत्या दशकात झाली?

अ) १९५० ब) १९६०

क) १९७० ड) १९८०

४. ‘बहिष्कृत हितकारिणी सभा’ कोणी स्थापन केली?

अ) महात्मा फुले ब) शाहू महाराज

क) डॉ. आंबेडकर ड) पेरीयार

५. 'Self Respect Movement' कोणी सुरू केली?

अ) नारायण गुरु ब) महात्मा फुले

क) पेरीयार ड) गायकवाड

ड) जोड्या जुळवा :

अ गट (नेते/घटना)	**ब गट (संबंध)**
१. महात्मा फुले	अ) बहिष्कृत हितकारिणी सभा
२. पेरीयार	ब) सत्यशोधक समाज
३. डॉ. आंबेडकर	क) Self Respect Movement
४. दलित पँथर	ड) सामाजिक न्याय चळवळ

३. सारांशः

भारतातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेतकामगार चळवळ, शेतकरी चळवळ आणि दलित चळवळया तिन्ही चळवळींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या चळवळी समाजातील शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी उभ्या राहिल्या आणि त्यांनी भारतीय लोकशाही अधिक सशक्त करण्याचे कार्य केले.

कामगार चळवळही औद्योगिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली चळवळ आहे. औद्योगिक क्रांतीनंतर कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. कमी वेतन, दीर्घ कामाचे तास, असुरक्षित कामाचे वातावरण, सामाजिक सुरक्षेचा अभाव या समस्यांविरुद्ध कामगारांनी संघटितपणे संघर्ष सुरू केला. कामगार संघटनांची स्थापना झाली आणि संप, मोर्चे, आंदोलने या माध्यमातून त्यांनी आपले प्रश्न मांडले. परिणामी, कामगार कायदे, किमान वेतन, कामाचे निश्चित तास, बोनस, विमा यांसारख्या सुविधा मिळविण्यात यश आले. कामगार चळवळीने औद्योगिक संबंधांमध्ये समतोल निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

शेतकरी चळवळही भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नव्हता, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, बाजारातील दलालांचे शोषण, सिंचनाचा अभाव या समस्यांनी त्यांना त्रस्त केले होते. या समस्यांविरुद्ध शेतकऱ्यांनी संघटित होऊन चळवळी उभारल्या. महाराष्ट्रात शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने भीक नको, हवे घामाचे दाम हा प्रभावी नारा दिला. कांदा आंदोलन, ऊस दर आंदोलन, दूध आंदोलन यांसारख्या चळवळींनी सरकारला धोरणात्मक बदल करण्यास भाग पाडले. शेतकरी चळवळीमुळे कृषी धोरणांमध्ये सुधारणा होऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय

पातळीवर महत्त्व प्राप्त झाले.

दलित चळवळही सामाजिक न्याय आणि समतेसाठीची क्रांतिकारी चळवळ आहे. भारतीय समाजातील जातिव्यवस्थेमुळे दलितांवर दीर्घकाळ अन्याय, शोषण आणि अस्पृश्यतेची वागणूक लादली गेली होती. या अन्यायाविरुद्ध दलितांनी संघटितपणे संघर्ष सुरू केला. महात्मा फुले, पेरियार, नारायण गुरु यांनी दलितांमध्ये शिक्षण आणि स्वाभिमानाची जाणीव निर्माण केली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीला व्यापक आणि सशक्त स्वरूप दिले. त्यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली चवदार तळे सत्याग्रह, मंदिर प्रवेश आंदोलन, मनुस्मृती दहन यांसारख्या चळवळी झाल्या. त्यांनी भारतीय राज्यघटनेतून समता, स्वातंत्र्य आणि न्याय यांची हमी दिली. आंबेडकरांनंतर दलित पँथर, रिपब्लिकन पक्ष, दलित साहित्य चळवळ यांनी दलित प्रश्नांना नवे स्वरूप दिले.

या तिन्ही चळवळींचा एक समान धागा म्हणजे हक्कांसाठीचा संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाची आकांक्षा. कामगारांनी आर्थिक न्यायासाठी, शेतकऱ्यांनी उत्पादनाच्या योग्य किमतीसाठी आणि दलितांनी सामाजिक समतेसाठी लढा दिला. या चळवळींमुळे भारतीय समाज अधिक जागरूक, संघटित आणि अधिकारसंपन्न झाला.

तथापि, आजच्या काळात या चळवळींसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण यामुळे कामगारांच्या समस्यांचे स्वरूप बदलले आहे. शेतकरी अजूनही कर्जबाजारीपणा आणि बाजारपेठेतील अस्थिरतेला सामोरे जात आहेत. दलित चळवळीतही संघटनात्मक विभाजन, नेतृत्वातील मतभेद आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे एकसंधता कमी झालेली दिसते.

एकूणच, या तिन्ही चळवळींनी भारतीय लोकशाहीला सामाजिक आधार दिला आहे. सामाजिक समता, आर्थिक न्याय, मानवाधिकार आणि लोकशाही मूल्येयांची जपणूक करण्यासाठी या चळवळींचे योगदान अमूल्य आहे. भविष्यातही या चळवळींना बदलत्या परिस्थितीनुसार नवीन दिशा, एकता आणि प्रभावी नेतृत्वाची आवश्यकता आहे.

४. पारिभाषिक शब्द (प्रस्तुत घटकातील महत्त्वाचे पारिभाषिक शब्दांचे संक्षिप्त अर्थ)

- कामगार चळवळ कामगारांच्या हक्क, वेतन, कामाच्या अटी व सामाजिक सुरक्षा यांसाठी उभारलेली संघटित चळवळ.
- औद्योगिक क्रांती उद्योगधंद्यांमध्ये यंत्रसामग्रीच्या वापरामुळे उत्पादन पद्धतीत झालेला मोठा बदल, ज्यामुळे कामगार वर्गाची निर्मिती झाली.
- कामगार संघटना कामगारांच्या हितसंवर्धनासाठी स्थापन केलेली संघटित संस्था, जी त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्य करते.
- संप (Strike) कामगारांनी आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी काम बंद ठेवून केलेले आंदोलन.
- वेतन (Wages) कामगारांनी केलेल्या श्रमाच्या बदल्यात त्यांना मिळणारे मोबदला किंवा पैसे.

- शेतकरी चळवळ शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक व बाजारपेठीय समस्यांवर उपाय मिळविण्यासाठी उभारलेली संघटित आंदोलनात्मक प्रक्रिया.
- रास्ता रोको आंदोलन शासनाचे लक्ष वेधण्यासाठी रस्ते अडवून वाहतूक बंद करण्याच्या स्वरूपात केलेले आंदोलन.
- रास्त भाव (Remunerative Price) शेतमालाच्या उत्पादन खर्चाचा विचार करून शेतकऱ्यांना योग्य नफा मिळेल असा मिळणारा दर.
- दबाव गट (Pressure Group) शासनाच्या धोरणांवर प्रभाव टाकण्यासाठी विशिष्ट हितसंबंध जपणारी संघटित गट/संस्था.
- एकाधिकार खरेदी योजना (Monopoly Procurement Scheme) शासनाकडून एखाद्या कृषी उत्पादनाची खरेदी करण्याचा एकमेव अधिकार स्वतःकडे ठेवून बाजार नियंत्रित करण्याची योजना.

५. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे (१,२,३,.. ..)

स्वयंअध्यन १ ची उत्तरे

अ) १-अयोग्य, २-योग्य, ३-योग्य, ४-योग्य, ५-अयोग्य, ६-अयोग्य, ७-अयोग्य

ब) १-जननी, २-नारायण मेघाजी लोखंडे, ३-१९०८, ४-१९१९, ५-डॉ. दत्ता सामंत, ६-१९४७

क) १-ब, २-ब, ३-ब, ४-क, ५-ड

ड) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

स्वयंअध्यन २ ची उत्तरे

अ) १-योग्य, २-योग्य, ३-अयोग्य, ४-योग्य, ५-अयोग्य, ६-अयोग्य

ब) १-१९७८, २-शरद जोशी, ३-डेक्कन रॉयट्स, ४-घामाचे, ५-नाशिक/लासलगाव, ६-दूध

क) १-ब, २-ब, ३-ब, ४-क, ५-ब

ड) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

स्वयंअध्यन ३ ची उत्तरे

अ) १-योग्य, २-योग्य, ३-अयोग्य, ४-योग्य, ५-अयोग्य, ६-अयोग्य

ब) ७-डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ८-पेरीयार, ९-१९७२, १०-गोपाळ बाबा वलंगकर, ११-संघर्ष, १२-शहरी

क) १३-ब, १४-ब, १५-क, १६-क, १७-क

ड) १८) १-ब, २-क, ३-अ, ४-ड

६. स्वाध्याय – (परीक्षेत विचारले जाऊ शकणारे दीर्घ आणि लघु प्रकारचे प्रश्न)

अ) दीर्घ प्रश्न

१. महारष्ट्रातील कामगार चवळीचा आढावा घ्या.

२. महारष्ट्रातील शेतकरी चवळीचा आढावा घ्या.

३. महारष्ट्रातील दलित चवळीचा आढावा घ्या.

ब) लघु प्रश्न

१. कामगार संघटना

२. स्वाभिमानी शेतकरी संघटना

३. आंबेडकर कालीन दलित चळवळ

४. आंबेडकर उत्तर दलित चळवळ

५. शेतकरी संघटनेची विचारसरणी

६. अधिक अभ्यासासाठी संदर्भ

१. शोभा कारेकर, शरद घोडके, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल पब्लिकेशन, नागपुर

२. पाटील बी. बी., महाराष्ट्र शासनाने राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. राठी शुभांगी, महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन् अथर्व पब्लिकेशन, भुसावळ

४. पाटील वा. भा. महाराष्ट्र प्रशासन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

५. शिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

६. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शोभा कारेकर, शरद पोडके, अंशुल पब्लिकेशन, नागपुर

७. महाराष्ट्र शासनाने राजकारण, पाटील बी. बी., फडके प्रकाशन, कोल्हापूर

८. महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन, शुभांगी राठी अथर्व पब्लिकेशन्, भुसावळ

९. महाराष्ट्र प्रशासन, पाटील भा., महेंद्र पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

१०. भोसले बाळासाहेब, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, अध्यक्षीय भाषण, ३६ वी महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद, बारामती, २०१९

११. पळशीकर, सुहास, बिरमल नितीन, पवार प्रकाश, महाराष्ट्रचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७

१२. पळशीकर, सुहास, समकालीन भारतीय राजकारण काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन,

१३. सिंग जगदीप, भारतीय संविधान, के, के, पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, २०२२

१४. पवार प्रकाश, महाराष्ट्रच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९

❑❑❑

प्रकरण–४

सामाजिक– राजकीय चळवळी (भाग –२)

अनुक्रमणिका

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ पर्यावरण संवर्धन चळवळ

४.३.२ सहकार चळवळ

४.३.३ आरक्षणावर आधारित चळवळ

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचण्यासाठी संदर्भ ग्रंथ

४.१ उद्दिष्टे

१. नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करणे

२. जैवविविधतेचे संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण

३. आर्थिक दुर्बल घटकांचे हितरक्षण करणे

४. स्वावलंबन आणि परस्पर सहकार्य वाढवणे

५. सामाजिक समता आणि प्रतिनिधित्व मिळवून देणे

६. समान संधी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे

४.२ प्रास्ताविक

महाराष्ट्राच्या सत्ताकारणाला आणि राजकीय पटलाला खऱ्या अर्थाने दिशा देण्याचे काम येथील सामाजिक चळवळींनी केले आहे. पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेल्या या राज्यात राजकीय सत्ता आणि सामाजिक आंदोलने नेहमीच एकमेकांशी जोडली आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजतागायत महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि राजकारणाला आकार देण्यात 'सहकार चळवळी'चा मोठा वाटा

आहे. साखर कारखाने आणि सहकारी बँकांच्या माध्यमातून ग्रामीण भागात नेतृत्वाची नवी फळी निर्माण झाली, ज्याने राज्याच्या सत्तेची सूत्रे दीर्घकाळ हाती ठेवली.

दुसऱ्या बाजूला, सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी 'आरक्षणावर आधारित चळवळी' महाराष्ट्रात अत्यंत तीव्रतेने उदयास आल्या. मराठा, ओबीसी, दलित आणि धनगर समाजघटकांनी आपापल्या हक्कांसाठी उभारलेल्या लढ्यांमुळे राज्याचे समकालीन राजकारण पूर्णपणे ढवळून निघाले असून, प्रत्येक राजकीय पक्षाला या चळवळींच्या दबावानुसार आपली रणनीती आखावी लागत आहे.

या पारंपरिक चळवळींसोबतच, आधुनिक काळात वाढते औद्योगिकीकरण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर 'पर्यावरण संवर्धन चळवळ' महत्त्वाची ठरत आहे. 'आरे जंगल बचाव', पश्चिम घाट संरक्षण आणि नद्यांच्या प्रदूषणाविरोधातील आंदोलनांनी केवळ निसर्गाचे रक्षण केले नाही, तर विकासाचे आराखडे ठरवताना सरकारला पर्यावरणीय धोरणांचा विचार करण्यास भाग पाडले. थोडक्यात सांगायचे तर, सहकाराने दिलेली आर्थिक ताकद, आरक्षणाने दिलेली सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाने दिलेली भविष्याची दृष्टी या त्रिसूत्रीवरच महाराष्ट्राचे समकालीन राजकारण गतिमान आहे.

४.३ विषय विवेचन

४.३.१ पर्यावरण संवर्धन चळवळ

महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धन चळवळ ही केवळ निसर्ग वाचवण्याचा लढा नसून तो राज्याची संस्कृती जैवविविधता मानवी अस्तित्व आणि शाश्वत विकास टिकवून ठेवण्यासाठी चालवलेला एक वैज्ञानिक आणि सामाजिक संघर्ष आहे सह्याद्रीच्या पर्वतरांगा ७२० ज्ञा चा समुद्रकिनारा, विस्तीर्ण नद्या आणि वेगाने वाढणारी शहरे यामूळे महाराष्ट्रात विविध प्रकारच्या पर्यावरण चळवळींचा उदय झाला आहे

पर्यावरण संवर्धन चळवळीची प्रमुख उद्दिष्टे

१. **जैवविविधतेचे रक्षण**

दुर्मिळ वनस्पती प्राणी आणि पक्षी यांच्या नैसर्गिक अधिवासांचे जतन करणे.

२. **प्रदूषणावर नियंत्रण**

हवा पाणी आणि माती यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी कायदे आणि जनजागृती करणे.

३. **शाश्वत विकास**

भावी पिढ्यांचा विचार करून नैसर्गिक संसाधनांचा (उदाहरणार्थ पाणी खनिजे) मर्यादित व योग्य वापर करणे.

४. **हवामान बदलाचा सामना**

वाढते जागतिक तापमान आणि चक्रीवादळे यासारख्या संकटावर मात करण्यासाठी कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि वृक्ष लागवड वाढवणे.

महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धन चळवळी :

अ) पश्चिम घाट सह्याद्री संवर्धन चळवळ

पश्चिम घाट हा जागतिक जैवविविधतेच्या अत्यंत संवेदनशील हॉटस्पॉट पैकी एक आहे महाराष्ट्रातील कोल्हापूर रत्नागिरी सिंधुदुर्ग सातारा पुणे आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या सह्याद्रीच्या रक्षणासाठी ही चळवळ कार्यरत आहे सह्याद्रीतील बेकायदेशीर बॉक्साईड खाणकाम वन जमिनींचे वाढते व्यापारीकरण महामार्गासाठी होणारी प्रचंड वृक्षतोड आणि पवन ऊर्जा प्रकल्पाच्या नावाखाली नष्ट होणारे डोंगराळ भाग या विरोधात स्थानिक पर्यावरण वाद्यांनी तीव्र लढे उभारले आहेत

१. गाडगीळ विरुद्ध कस्तुरीरंगन अहवाल

केंद्र सरकारने नेमलेल्या डॉ. माधव गाडगीळ समितीने पश्चिम घाटाचा ६४% भाग पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करून तिथे खाणकाम व मोठ्या प्रकल्पावर पूर्ण बंदी घालण्याची शिफारस केली होती. राज्यांच्या विरोधानंतर डॉक्टर कस्तुरीरंगत समितीने हा भाग ३७% वर आणला ज्याच्या अंमलबजावणीसाठी आजही पर्यावरणवादी आंदोलन करत आहेत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने काढलेल्या नव्या मसुदा अधिसूचनेनुसार महाराष्ट्रातील १७३४० चौरस किमी क्षेत्र इको सेन्सिटिव्ह म्हणून प्रस्तावित आहे या क्षेत्रात रेड कॅटेगरी उद्योग मोठे क्रेशर्स आणि नवीन खान कामांना परवानगी देण्यासाठी ही चळवळ सरकारवर कायदेशीर दबाव टाकत आहे.

चळवळीचे फायदे

सह्याद्रीचे रक्षण झाल्यामुळे महाराष्ट्राला कृष्णा कोयना गोदावरी यासारख्या प्रमुख नद्यांचे पाणी अखंडपणे मिळत आहे तसेच अरबी समुद्रातून येणाऱ्या माणसांच्या ढगाला अडवून संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस पाडण्यात सह्याद्री महत्त्वाची भूमिका बजावत या चळवळीमुळे वाघ बिबट्या, शेकरू आणि औषधी वनस्पतींचे नैसर्गिक अधिवास सुरक्षित राहिले आहेत जे हवामान बदलाच्या या काळात संपूर्ण राज्यासाठी ढाल म्हणून काम करत आहेत.

२. नागरी पर्यावरण आणि नदी बचाव आंदोलने

हा वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या दुष्परिणाम विरुद्ध सुजान नागरिकांनी उभारलेला एक अत्यंत महत्त्वपूर्ण संघर्ष आहे मुंबई पुणे नागपूर आणि नाशिक यासारख्या हा नगरांमध्ये सिमेंटचे जंगल वाढत असताना नैसर्गिक संसाधनांचे अस्तित्व धोक्यात आली आहे या शहरांचे पर्यावरण आणि जीवन वाहिनी असलेल्या नद्या वाचवण्यासाठी झालेल्या चळवळी आहेत.

अ) नागरी पर्यावरण चळवळ

अर्बन हिट आयलँड शहरांमध्ये सिमेंटचे रस्ते काँक्रीटच्या इमारती आणि वाढत्या वाहनांमुळे उष्णतेचे बेट तयार होत असून शहरांचे तापमान सातत्याने वाढत आहे मेट्रो उड्डाणपूल रिंग रोड आणि निवासी प्रकल्पांसाठी दरवर्षी हजारो जुने वृक्षतोड होत असल्याने शहरांमधील फुफुसे नष्ट (green lungs) होत आहेत. या विनाशाविरुद्ध पूर्वी केवळ ग्रामीण जनतेची होणारी आंदोलने आता शहरांमध्ये नागरी पर्यावरण चळवळ म्हणून व्यापक झाली आहेत.

ब) आरे जंगल बचाव आंदोलन मुंबई

मुंबईतील गोरेगाव भागात असलेल्या आरे वसाहतीतील सुमारे ३००० हून अधिक झाडे मेट्रो थ्रीच्या कार शेड साठी तोडण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता याला विरोध करण्यासाठी मुंबईतील महाविद्यालयीन तरुण ज्येष्ठ नागरिक बॉलीवूड सेलिब्रिटी आणि पर्यावरण प्रेमींनी एकत्र येऊन मोहीम सुरू केली चिपको आंदोलनाच्या धर्तीवर लढा देण्याच्या उद्देशाने हजारो नागरिकांनी रात्रीच्या वेळी जंगलात जाऊन झाडांना मानवी साखळी द्वारे भेटले आणि पोलिसांच्या लाठी हल्ल्याला व अटकेला सामोरे जात अहिंसक लढा दिला हा विषय सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेला ज्यामुळे प्रशासनाला वृक्षतोडीबाबत पर्यावरण पूरक धोरणे आखणे आणि आरे च्या मोठ्या भागाला राखीव व घोषित करणे भाग पडले आहे.

क) मुळा मुठा नदी सुधार प्रकल्प, पुणे

पुणे महापालिकेने साबरमती नदीच्या धर्तीवर मुळा मुठा नद्यांच्या काठांचे सौंदर्य करण आणि काँक्रिटीकरण करण्याचा रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्प हाती घेतला या प्रकल्पासाठी नदीपात्रातील हजारो झाडे तोडणे आणि पात्राचे सिमेंट करण करणे नियोजित होते ज्यामुळे नदीची नैसर्गिक पाणी शोषण्याची क्षमता संपून पुण्यात महापुराचा धोका वाढणार होता नागरिकांनी जीवित नदी सारख्या संस्थांच्या नेतृत्वाखाली पुण्यात नदीपात्र बचाव आंदोलन सुरू केली नागरिकांनी चिपको आंदोलन करत झाडांना वाचवले नदीचे सुशोभीकरण किंवा सुधार करण्याऐवजी नदीमध्ये सोडले जाणारे सांडपाणी रोखून तिचे पुनरुजीवन करावे या मागणीवर पुणेकर ठाम राहीले आहेत.

ड) मिठी नदी आणि गोदावरी नदी बचाव लढे

मिठी नदी आंदोलन मुंबई २००५ च्या मुंबई महापुरानंतर मिठी नदीच्या प्रदूषणाचा आणि तिच्यावरील अतिक्रमणाचा मुद्दा समोर आला पर्यावरणवादी कार्यकर्ते स्टॅलिन दयानंद आणि वन शक्ती संस्थेने मिठी नदीच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय हरित लवादात मोठा कायदेशीर लढा दिला गोदावरी नदी ही नाशिकची जीवन वाहिनी असलेल्या गोदावरी नदीत मिसळणारे सांडपाणी आणि कुंभमेळ्या दरम्यान होणारे प्रदूषण रोखण्यासाठी गोदावरी गटारीकरण विरोधी मंचाने मोठे आंदोलन उभे केले रामकुंडा परिसरातील काँक्रीट काढण्यासाठी पर्यावरण वाद्यांनी प्रशासनाला कायदेशीर नोटीस दिली आहेत.

इ) नागरी व नदी आंदोलनाचे कायदेशीर दस्ताऐवज

दरवर्षी महापालिकांद्वारे जाहीर होणाऱ्या महापालिकांचे पर्यावरण स्थिती अहवाल नुसार पुण्यातील मुळा मुठा आणि मुंबईतील मिठी नदीचे पाणी अतिप्रदूषित श्रेणीत आले आहे जो या आंदोलनाचा मुख्य वैज्ञानिक आजार आहे भारतीय संविधानातील कलम २१ अंतर्गत स्वच्छ हवा आणि प्रदूषणामुक्त पाणी मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे या तत्त्वाचा वापर करून हे नागरीलडे न्यायालयांमध्ये लढले जात आहे नागरी आंदोलनाला गती देण्यासाठी NGT हे सर्वात मोठे केंद्र बनले असून बेकायदेशीर काँक्रिटीकरण आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांमधील हलगर्जीपणाबद्दल NGT ने अनेकदा महापालिकांना कठ्यावधी रुपयांचा दंड चुकावला आहे

फ) आंदोलनाचे शहरांना झालेले दूरगामी परिणाम

नदीपात्रांचे कॉंक्रिटीकरण रोखल्यामुळे नद्यांचे नैसर्गिक प्रवाह टिकून राहिले आहे ज्यामुळे पावसाळ्यात शहरांमध्ये येणाऱ्या पुराची तीव्रता कमी होण्यास मदत होते नद्या आणि नागरी पालतळ जागा वाचवल्यामुळे शहरांमधील जमिनीतील पाण्याची पातळी टिकून राहते जी भविष्यातील पाणीटंचाईवर एकमेव उपाय आहे आरे सारखे जंगल आणि पुण्याच्या टेकड्यांवरील जैवविविधता या वाचल्यामुळे शहरांमधील हवेची गुणवत्ता नियंत्रित राहण्यास मदत होते या नागरी आंदोलनामुळे मध्यमवर्ग शाळकरी मुले आणि आयआयटी क्षेत्रातील तरुणांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता वाढली असून शाश्वत शहरीकरण ही काळाची गरज बनली आहे

३. कोकण किनारपट्टी आणि सागरी संवर्धन चळवळ

कोकण किनारपट्टीवर खारफुटीची जंगले प्रवाळ आणि दलदलीय भाग आणि सागरी जीवांचे शेकडे प्रकार आढळतात हा सागरी परिसर केवळ निसर्गाचा भाग नसून कोकणातील लाखो पारंपारिक मच्छिमार आंबा काजू बागायतदार आणि स्थानिक जनतेच्या रोजगारांचे मुख्य साधन आहे रासायनिक सांडपाणी किनारपट्टीवरील मेगा प्रोजेक्ट्स मुळे ज्या किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी चळवळीची गरज निर्माण झाली आहे.

अ) कांदळवन खारफुटी संवर्धन चळवळ

खारफुटीची झाडे समुद्राच्या लाटांची तीव्रता कमी करून जमिनीची धूप रोखतात आणि सुनामी किंवा चक्रीवादळासारख्या संकटांपासून किनारपट्टीचे रक्षण करतात मुंबई नवी मुंबई आणि खाडी परिसरातील बिल्डरांच्या अतिक्रमणापासून आणि कचरा भराव करण्यापासून खारफुटी वाचवण्यासाठी वनशक्ती सारख्या संस्थानी मोठी लढाई दिली पर्यावरण वाद्यांच्या याचिकेवर ऐतिहासिक निर्णय देत मुंबई उच्च न्यायालयाने २०१८ मध्ये महाराष्ट्रातील सर्व खारफुटी क्षेत्राला संरक्षित वन घोषित केले जे या चळवळीचे मोठे यश आहे या चळवळीच्या दबावामुळेच महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले ज्याने स्वतंत्र कांदळवन प्रतिष्ठित आणि कांदळवन कक्ष स्थापन केला

ब) कोकण रिफायनरी विरोधी आंदोलन नानार ते बारसू

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील नाणार आणि त्यानंतर बारसू येथे आशियातील सर्वात मोठा पेट्रोल केमिकल रिफायनरी आणि तेल शुद्धीकरण प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला रिफायनरीतून निघणाऱ्या रासायनिक उत्सर्जनामुळे समुद्राच्या पाण्याचे तापमान वाढून मासे आणि इतर सागरी जीव नष्ट होतील तसेच हापूस आंबा आणि काजूच्या शेतीचे अपरिमित नुकसान होईल असा वैज्ञानिक युक्तिवाद आंदोलन आणि केला कोकण विनाशकारी प्रकल्प विरोधी समितीच्या बॅनरखाली स्थानिक मच्छी महिला आणि शेतकऱ्यांनी कोकणाचे कॅलिफोर्निया करू नका आमचा निसर्ग आम्हाला हवा आहे अशी भूमिका घेत तीव्र निदर्शने केली ज्यामुळे हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर गाजला.

क) सागरी कासव ऑलिव्ह रीडले संवर्धन मोहीम

कोकणातील वेळास अंजले गुहागर आणि वेंगुर्ले या किनाऱ्यावर जगातील दुर्मिळ ऑलिव्ह रडले कासवे अंडी घालण्यासाठी येतात पूर्वी येथील अंडी चोरली जायची किंवा नष्ट व्हायची सह्याद्री निसर्ग मित्र

या संस्थेने स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने कासवांचे अंड्यांचे रक्षण करण्यासाठी लोक चळवळ सुरू केली या चळवळीतून वेळास कासव महोत्सव सुरू केला ज्याने पर्यावरण पूरक पर्यटनाचे जागतिक मॉडेल जगासमोर ठेवले आणि गावकऱ्यांना रोजगाराची नवी दिशा दिली

ड) कायदेशीर दस्तऐवज आणि सी आर झेड नियम Coastal regulation zone

किनारपट्टी नियंत्रण क्षेत्र नियमांचे उल्लंघन करून समुद्राजवळ होणाऱ्या बांधकामांना रोखण्यासाठी पर्यावरण कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय हरित लवादाचा प्रभावी वापर केला आहे सिंधुदुर्गातील मालवण येथील सागरी अभयारण्य आणि तेथील प्रवाळ वाचवण्यासाठी पर्यावरण वाद्यांनी केवळ दस्तऐवजी करण सागरी संशोधनाचा मुख्य आधार बनले आहे संविधानातील कलम ५१ए नुसार नद्या तलाव आणि वन्य जीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे याच अधिकाराचा वापर करून हे लढे लढले जात आहेत

इ) चळवळीचे दूरगामी फायदे

अरबी समुद्रात वाढलेल्या चक्रीवादळांचा तडाका कोकणाला बसला मात्र ज्या भागात खारफुटीची जंगले सुरक्षित होती तेथे मानवी वस्तींचे नुकसान अत्यंत कमी झाले हा या चळवळीचा फायदा आहे रासायनिक प्रदूषण आणि एलईडी पर्ससीन नेटद्वारे होणाऱ्या विनाशकारी मासेमारीला या चळवळीने विरोध केल्यामुळे पारंपारिक मासेमारी व लहान मच्छीमारांचे उपजीविकेचे साधन सुरक्षित राहिले आहे खारफुटीची जंगले सामान्य जंगलांपेक्षा चार पटीने अधिक कार्बन शोषून घेतात कोकण किनारपट्टीच्या संवर्धनामुळे भारताला जागतिक तापमान वाढ रोखण्याच्या आणि कार्बन न्यूट्रियालिटीच्या उद्दिष्टांमध्ये मोठी मदत होत आहे कोकण किनारपट्टी व सागरी संवर्धन चळवळ ही केवळ निसर्गाचे रक्षण करणारी मोहीम नसून ती खोकलाची संस्कृती तिथला स्वाभिमान आणि शाश्वत अर्थकारण जिवंत ठेवणारी एक लोक चळवळ आहे.

४. ग्रामीण जलसंधारण आणि दुष्काळ मुक्ती चळवळ

हा राज्याच्या ग्रामीण भागाचा आर्थिक सामाजिक आणि पर्यावरणीय कायापालट करणारा एक अत्यंत यशस्वी आणि महत्वपूर्ण संघर्ष आहे महाराष्ट्रातील विशेषता मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाचा काही भाग हा ऐतिहासिकदृष्ट्या दुष्काळी व अवर्षण प्रवन राहिला आहे निसर्गाच्या या लहरीपणावर मात करण्यासाठी केवळ सरकारच्या योजनांवर अवलंबून न राहता गावकऱ्यांनी आणि सामाजिक संस्थांनी लोक चळवळ उभी केली महाराष्ट्राच्या सुमारे ७० टक्के पेक्षा जास्त भूभाग हा डेक्कन ट्रॅप सिमेंट सारखा खडक बेसॉल्ट खडक खाली येतो जिथे भूगर्भातील पाणी साठवून ठेवण्याची नैसर्गिक क्षमता कमी आहे आणि मी पाऊस मान्सून आणि विहिरीवर उपनदींकंद्वारे भूजलाचा अनिर्बंध उपसा यामुळे अनेक गावे उन्हाळ्यात टँकरवर अवलंबून असायची ज्यामुळे शेती उध्वस्त होऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे

चळवळीचा उदय

वरील सर्व संकटावर मात करण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा आणि गावचे पाणी गावाला घरचे पाणी घराला या सूत्राचा वापर करून लोकसहभागातून जलसंधारणाची चळवळ सुरू झाली

अ) चळवळीचे प्रणेते आणि आदर्श ग्रामीण मॉडेल्स :

१. राळेगणसिद्धी अण्णा हजारे

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी हे गाव १९७० च्या दशकात अत्यंत दुष्काळी आणि दारिद्र्याने होरपळलेले होते अण्णा हजारे यांनी लष्करातून निवृत्त होऊन आल्यानंतर गावकऱ्यांना श्रमदानासाठी एकत्र केले त्याने डोंगरावर चर खोदली नाले बांधले आणि हजारो झाडे लावली यामुळे गावातील भूजल पातळी वाढली आणि गाव सुजलाम सुफलाम झाले

२. हिरवे बाजार पोपटराव पवार

पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली हिरवे बाजार गावाने जलसंधारणाचे वैज्ञानिक मॉडेल उभे केले त्यांनी गावात विहिरींवर आणि जास्त पाणी लागणाऱ्या पिकांवर बंदी घातली पाण्याची योग्य नियोजन करून हे गाव आज लक्षात यांचे म्हणून गाव ओळखले जाते आज राज्याच्या विविध भागात अशा प्रकारच्या प्रयोगांमधून गावी स्वावलंबी झाली आणि त्यांनी पाण्याची दुर्मिक्ष कायमचे संपवले.

ब) पाणी फाउंडेशन आणि डिजिटल लोक चळवळ

अभिनेता आमिर खान आणि किरण राव यांनी २०१६ मध्ये पाणी फाउंडेशन ची स्थापना केली त्यांनी जलसंधारणाला एक स्पर्धेचे स्वरूप दिली या चळवळीमुळे महाराष्ट्रातील हजारो गावांमधील लाखो नागरिक आभाळविरुद्ध शहरी लोक आणि सेलिब्रिटीने उन्हाळ्याच्या कडक उन्हात एकत्र येऊन दाखवतासांचे मोफत श्रमदान केले पाणी फाउंडेशनने गावकऱ्यांना वॉटरशेड मॅनेजमेंटचे वैज्ञानिक प्रशिक्षण दिले ज्यामुळे विज्ञानाचा आणि लोकशक्तीचा अभूतपूर्व संगम पाहायला मिळाला.

क) जलसंधारणाचे तांत्रिक प्रकार आणि कायदेशीर दस्तऐवज

जलसंधारणाचे तांत्रिक विविध प्रकारचा वापर करण्यात आला यामध्ये डोंगर माथा ते डोंगर पायथा या तत्त्वानुसार कामे केली गेली यात समपातळीवर चर गॅबियन बंधारे मातीचे नाना बांध आणि शेततळे यांचा समावेश होतो महाराष्ट्र भूजल विकास व्यवस्थापन कायदा २००९ हा कायदा जलसंधारण चळवळीच्या दबावामुळे अधिक मजबूत झाला या अन्वय ६० मीटर पेक्षा जास्त कोण खूप नलिका खोदण्यावर आणि व्यावसायिक पाणी उपशावर निर्बंध लादले गेले लोक चळवळीचे यश पावर महाराष्ट्र सरकारने २०१४ मध्ये जलयुक्त शिवार अभियान सुरू केले ज्याचा मुख्य हेतू राज्याला टँकर मुक्त करणे हा होता जलसंधारणाच्या कामामुळे उन्हाळ्यात गावोगावी लागणारे पाण्याचे टँकर्स बंद झाले पाणी उपलब्ध झाल्यामुळे रोजगारासाठी शहरांकडे होणारे ग्रामीण जनतेचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर थांबले केंद्रीय भूजल मंडळाच्या ताज्या अहवालानुसार या जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाची लोक चळवळ प्रभावी ठरली तिथल्या भूजल पातळीत लक्षणीय सुधारणा झाली आहे केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारे शेतकरी आता वर्षातून दोन किंवा तीन पिके घेऊ लागली आहे डेअरी आणि पशुपालनाला गती मिळाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी आली आहे सध्या जागतिक तापमान वाढीमुळे अवकाळी पाऊस आणि क** उन्हाळ्याचे प्रमाण वाढले आहे अशावेळी ही जलसमृद्ध गावी कमी पावसातही स्वतःचे अस्तित्व टिकून ठेवण्यास सक्षम बनली आहेत महाराष्ट्रातील ग्रामीण जलसंधारण आणि दुष्काळ मुक्ती चळवळ ही केवळ पाणी साठवण्याची मोहीम

नसून ती ग्रामीण भागाचा स्वाभिमान सामाजिक ऐक्य आणि निसर्गाशी नाते पुन्हा जोडणारी एक क्रांतिकारी लोक चळवळ आहे

५. कायदेशीर चौकट आणि वैज्ञानिक दस्ताऐवज

महाराष्ट्रातील आणि भारतातील पर्यावरण संवर्धन चळवळींना केवळ आंदोलनामुळेच नव्हे तर भक्कम कायदेशीर चौकट आणि वैज्ञानिक दस्ताऐवजांमुळे मोठे बळ मिळाले आहे प्रशासकीय उदासीनता किंवा राजकीय दबावाच्या वेळी पर्यावरण कार्यकर्त्यांनी याच कायद्यांचा आणि अहवालांचा आधार घेऊन न्यायालयातून पर्यावरण पूरक निर्णय मिळवली आहेत

अ) लोक चळवळीला बळ देणारे प्रमुख कायदे

भारतात पर्यावरण रक्षणासाठी संविधानाचा आधार घेत अनेक कडक कायदे करण्यात आले आहे संविधानातील कलम ५१- (G)(citizen fundamental duty) नुसार पर्यावरण संवर्धन हे राज्य व नागरिक दोघांचेही कर्तव्य आहे या कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी खालील कायदे अस्तित्वात आले.

१. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ (the environment protection act EPA)

१९८४ च्या भोपाल गॅस दुर्घटनेनंतर केंद्र सरकारने हा सर्वसमावेशक कायदा लागू केला याला छत्री कायदा म्हटले जाते कारण या अंतर्गत केंद्र सरकारला पर्यावरणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व प्रकारचे नियम बनवण्याचे अधिकार मिळतात या कायद्यातील पर्यावरण आघात मूल्यांकन नियमांमुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पाला मंजुरी मिळण्यापूर्वी त्याचा निसर्गावर काय परिणाम होईल याचा अभ्यास करणे आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाची मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

२. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ (wildlife protection act)

हा कायदा दुर्मिळ प्राणी पक्षी आणि त्यांच्या अधिवासांचे शिकार आणि शिकारीपासून रक्षण करतो या कायद्यानुसार राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य घोषित केले जातात महाराष्ट्रातील राधानगरी मेळघाट किंवा ताडोबा यासारख्या जंगलांमध्ये होणाऱ्या बेकायदेशीर खडकामांना आणि वृक्षतोडीला पर्यावरण वाद्यांनी याच कायद्याचा आधार घेऊन न्यायालयात आव्हान दिले आणि ते प्रकल्प रोखले

३. वनसंवर्धन कायदा १९८०

जंगलांची जमीन बिगर वनीकरणांच्या कामासाठी वापर करण्यावर हा कायदा कडक निर्बंध लादतो अशी जमीन वापरायची असल्यास केंद्र सरकारची पूर्वपरवानगी अनिवार्य असते या कायद्यान्वये जंगलांचे व्यवसायिक उद्दिष्टांसाठी होणारे तुकडे थांबले असून वनीकरणाच्या बदल्यात कॅम्पा अंतर्गत पर्यायी वृक्ष लागवड करणे बंधनकारक झाले आहे

४. राष्ट्रीय हरित लवाद कायदा २०१० (National green tribunal NGT Act)

पर्यावरणाशी संबंधित खटले जलद गतीने निकाली काढण्यासाठी या विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली हा कायदा पर्यावरण कार्यकर्त्यांसाठी सर्वात मोठे शस्त्र ठरला आहे सामान्य न्यायालयात वर्षानुवर्षे चालणारे खटले राष्ट्रीय हरित लवाद कायद्यांमध्ये वेगाने सुटतात पुणे आणि मुंबईतील नद्यांचे

काँक्रिटीकरण आणि खारफुटी वरील अतिक्रमणांवर राष्ट्रीय हरित लवाद कायद्याने अनेकदा महापालिकांना कोठ्यावधीचा दंड ठोकावून कामे रोखली आहे.

पर्यावरण संवर्धन चळवळीचे फायदे

पर्यावरण संवर्धन चळवळीचे फायदे केवळ झाडे लावण्या पुरती किंवा तात्कालीन प्रदूषण रोखण्यासाठी मर्यादित नसतात तर त्यांचे परिणाम पिढी आणि पिढ्या टिकणारे आणि दूरगामी असतात हवामान बदल जागतिक तापमान वाढ व नैसर्गिक साधनसंपत्तीचा वेगाने होणारा ऱ्हास या पार्श्वभूमीवर या चळवळी मानवी संस्कृती आणि पृथ्वीचे अस्तित्व टिकवण्यासाठी सुरक्षा कवच म्हणून काम करत आहेत.

१. पर्यावरणीय आणि नैसर्गिक फायदे

अ) हवामान बदलाच्या तीव्र प्रभावापासून संरक्षण

सध्या जगभरात चक्रीवादळे ढगफुटी अवकाळी पाऊस आणि तीव्र उष्णतेची लाट यांचे प्रमाण वाढले आहे परंतु पर्यावरणीय चळवळीमुळे टिकून राहिलेले ही स्थिर हरित पट्टे आणि जंगले कार्बन शोषक म्हणून काम करतात ती वातावरणातील अतिरिक्त कार्बन डाय-ऑक्साइड शोसूण घेतात ज्यामुळे जागतिक तापमान वाढीचा वेग मंदावण्यास मदत होते.

ब) सागरी किनारे आणि जमिनीची धूप रोखणे

कोकण किनारपट्टीवरील खारफुटी संवर्धन चळवळीमुळे दूरगामी फायदे आता स्पष्ट दिसतात खारफुटीमुळे येणाऱ्या सुनामी किंवा चक्रीवादळावेळी समुद्रकिनाऱ्यालगतच्या मानवी वस्त्यांची आणि शेतीचे कठ्यावधी रुपयाचे नुकसान ठरले तसेच नद्यांच्या खोऱ्यातील जंगल संवर्धनामुळे सफिक माती वाहून जाण्यापासून वाचते.

क) जलसुरक्षा आणि भूजल पातळीत कायमस्वरूपी वाढ

ग्रामीण भागातील जलसंधारण आणि पाणी आडवा पाणी जिरवा या लोकचळवळीमुळे ग्रामीण भागात जमिनीतील पाण्याची पातळी वाढत आहे जे दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील लोकांची प्रचंड आर्थिक व मानसिक आणि होत होती ती कमी प्रमाणात होऊ लागली दुष्काळ जन्य परिस्थितीमुळे जे स्थलांतर होत होते ते थांबण्यास मदत झाली व लोकांचे पाण्याचे प्रश्न दूर झाले आहे पावसाचे पाणी जमिनीत जिरल्यामुळे भूजल पातळी वर्षानुवर्षी स्थिर राहते विहिरी आणि कुपनलिका कोरड्या पडत नाहीत ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचे दुर्भिक्षण ठरते आणि गावी पाण्यासाठी टँकर मुक्त होतात.

२. आर्थिक आणि उपजीविकेचे फायदे

अ) पारंपारिक रोजगारांचे रक्षण

निसर्गावर आधारित जीवन जगणाऱ्या घटकांसाठी या चळवळी जीवनदायनी ठरल्या आहेत बारसू नानार सारख्या रिफायनरी विरोधी किंवा खाणकाम विरोधी आंदोलनामुळे स्थानिक पर्यावरण टिकून राहिले याचा दूरगावी फायदा असा झाला की कोकणातील पारंपारिक मत्स्यव्यवसाय हापूस आंबा आणि काजूची शेती नष्ट होण्यापासून वाचली स्थानिकांच्या रोजगारांचे रक्षण झाले.

ब) पर्यावरण पूरक पर्यावरणाचा विकास

सागरी कासव संवर्धन किंवा अभयारण्याच्या रक्षणार्थ झालेल्या चळवळीमुळे पर्यटनाची नवी दारी खुली झाली आहेत निसर्गाला हानी न पोहोचवता पर्यटन वाढल्यामुळे स्थानिक गावकऱ्यांना होम स्टे गाईड आणि हस्तकलेच्या माध्यमातून शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्न मिळत राहते.

क) आपत्ती व्यवस्थापना वरील खर्चात घट

पर्यावरण चळवळीने शहरांमधील नद्यांचे काँक्रिटीकरण किंवा टेकड्यांची विलीनीकरण रोखले तर पावसाळ्यात येणाऱ्या पोरांची तीव्रता कमी होते यामुळे पूर परिस्थिती नंतर पायाभूत सुविधांची होणारी पडझड आणि पुनर्वसनावर सरकारला करावा लागणारा कोट्यावधींचा खर्च वाचतो

३. मानवी आरोग्य आणि सामाजिक फायदे

अ) शुद्ध हवा आणि आरोग्यांमध्ये सुधारणा

मुंबईतील आरे किंवा पुण्यातील टेकड्या वाचवण्यासाठी होणाऱ्या नागरी आंदोलनाचा थेट संबंध मानवी आरोग्याशी आहे शहरांमधील फुफुसे जिवंत राहिल्यामुळे हवेचा गुणवत्ता निर्देशांक नियंत्रित राहतो याचा दुर्गा मी फायदा म्हणजे श्वसनाचे विकार दमा आणि फुफुसांच्या आजारांचे प्रमाण कमी होऊन मानवी आयुमान वाढते आणि वैद्यकीय खर्चाचा ताण कमी होतो

ब) शाश्वत शहरीकरणाची पायाभरणी

या चळवळीमुळे भविष्यातील शहरांची नियोजन बदलत आहे विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्त्याने लिहा विचार रुसल्यामुळे आता गृहनिर्माण आणि पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांमध्ये हरित क्षेत्र आणि कचरा व्यवस्थापन अनिवार्य केली जात आहे.

४. कायदेशीर आणि धोरणात्मक फायदे :

अ) कडक नियमांची आणि कायद्यांची निर्मिती

पर्यावरण चळवळीच्या संघर्षामुळेच सरकारला कठोर धोरणे आखणे भाग पडले आहे कोणत्याही मोठ्या प्रकल्पापूर्वी पर्यावरण आघात मूल्यांकन करणे प्लास्टिक वर बंदी घालणे किंवा नद्यांमध्ये सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांवर कडक कारवाई करणे या गोष्टी आता कायदेशीर प्रक्रियेचा भाग बनले आहे ही कायदेशीर चौकट भविष्यातील अनियंत्रित विनाशाला कायमच अटकाव करते

ब) भावी पिढ्यांमध्ये पर्यावरण साक्षरता

या चळवळीचा सर्वात मोठा दूरगामी सामाजिक फायदा म्हणजे आजचा तरुण वर्ग आणि लहान मुले पर्यावरणाबाबत कमालीची संवेदनशील बनली आहेत शाळा महाविद्यालयांमधून पर्यावरण शिक्षण अनिवार्य झाले आहे यामुळे भविष्यात निसर्गाचा आदर करणारी एक संपूर्ण सुजाण पिढी निर्माण होत आहे पर्यावरण संवर्धन चळवळीचे दूरगामी फायदे हे शाश्वत विकास या संकल्पनेला प्रत्यक्षात आणतात आज निसर्गाचे रक्षण करण्यासाठी मोजावी लागणारे किंमत किंवा करावा लागणार संघर्ष हा उद्याच्या मानवी पिढ्यांचे जीवन सुरक्षित समृद्ध आणि रोगमुक्त ठेवण्यासाठी केलेली सर्वोत्तम गुंतवणूक आहे.

४.३.२ महाराष्ट्रातील सहकारी चळवळी (Co-Operative Movement)

प्रस्तावना

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही राज्याच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय विकासातील अत्यंत महत्त्वाची चळवळ मानली जाते. ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहकार चळवळीचे स्थान फार महत्त्वाचे आहे. विना सहकार नाही उद्धार हे या चळवळीचे ब्रीदवाक्य असून ग्रामीण भागातील शेतकरी कामगार कारागीर आणि सर्वसामान्य लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सहकारी चळवळ विकसित झाली. भारतात सहकार चळवळीची सुरुवात १९०४ च्या सहकार पतसंस्था कायद्याने झाली. महाराष्ट्रात ग्रामीण कर्जबाजारीपणा दूर करण्यासाठी पतसंस्था स्थापन करण्यात आल्या पुढे १९१२ च्या कायद्यामुळे विविध प्रकारच्या सहकारी संस्था निर्माण होऊ लागल्या देशात सुमारे ८.३७ लाख सहकारी संस्था असून महाराष्ट्रात सुमारे २२३७५९ सहकारी संस्था आहेत. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची जी उल्लेखनीय प्रगती झाली आहे त्याचे श्रेय या चळवळीला लाभलेल्या नेतृत्वाला द्यावे लागेल नामदार गोखले विठ्ठलदास ठाकूर, सी वेंकुठ भाई मेहता, डॉ. धनंजय राव गाडगीळ, न. ची.केळकर, चुनीलाल मेहता, विठ्ठलराव विखे पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, श्री यशवंतराव चव्हाण, शंकरराव मोहिते पाटील, भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, बाबासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, शंकरराव कोल्हे, शंकराव काळे, शरद पवार, शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, बाळासाहेब विखे पाटील इत्यादी कार्यक्षम व्यक्तींच्या नेतृत्वाने आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वीपणे रुजलेली दिसते.

सहकारी चळवळीची संकल्पना –

महाराष्ट्रातील सहकार चळवळ ही ग्रामीण व शहरी समाजाच्या आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी निर्माण झालेली लोक आधारित चळवळ आहे. एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक या तत्त्वावर आधारित ही चळवळ महाराष्ट्राच्या विकासात अत्यंत महत्त्वाची मानली जाते.सहकार म्हणजे अनेक व्यक्तींनी स्वयच्छेने एकत्र येऊन समान आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केलेले संघटित कार्य होय सहकारी संस्थांमध्ये सदस्य स्वतः मालक आणि ग्राहक दोन्ही असतात नफा कमवणे हा एकमेव उद्देश नसून सदस्यांचे कल्याण आर्थिक उन्नती आणि सामाजिक विकास हा मुख्य हेतू असतो.सहकार चळवळ म्हणजे अशा सहकारी संस्थांच्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी उभारलेली संघटित सामाजिक आर्थिक चळवळ होय.

१९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड कायद्यानुसार सहकार हा विषय राज्य यादीत समाविष्ट करण्यात आला १९२५ साली मुंबई सहकारी संस्था कायदा मंजूर करण्यात आला. १९६० साली महाराष्ट्रात सहकारी संस्था कायद्यांची अंमलबजावणी करण्यात आली पुढे १९८६ साली महाराष्ट्र सहकारी कायद्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या

सहकारी संस्था –

महाराष्ट्रातील सहकारी संस्था या लोकांच्या आर्थिक सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या लोकाभिमुख संस्था आहेत. सर्वांसाठी सहकार्य आणि सामूहिक विकास या तत्वावर या संस्था कार्य करतात सामान्यता सहकारी संस्था पुढील उद्देशांसाठी स्थापन केलेले आहेत.

१. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे बियाणे खते आणि शेतीसाठी आवश्यक साधने पुरविणे.

२. सावकारांच्या शोषणापासून संरक्षण देण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील लोकांना खाजगी सावकारांच्या जास्त व्याजदराच्या कर्जातून मुक्त करणे

३. ग्रामीण भागात उद्योजक रोजगार आणि आर्थिक प्रगती घडवून आणणे.

४. व्यक्तिगत फायदा एवजी सर्व सदस्यांच्या सामूहिक विकासावर भर देणे.

५. स्वावलंबन आणि आत्मनिर्भरता निर्माण करण्यासाठी लोकांमध्ये बचत सहकार्य आणि स्वयंपूर्णतेची भावना विकसित करणे.

६. कृषी व पूरक उद्योगांना चालना देणे साखर उद्योग दुग्ध व्यवसाय सूतगिरण्या प्रक्रिया उद्योग यांना प्रोत्साहन देणे.

७. बेकारी निर्मूलन करणे रोजगार व स्वयंरोजगाराचा विकास करणे

८. सामाजिक समानता प्रस्थापित करणे गरीब शेतकरी महिला आणि दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

९. सहकार व्यवहार आणि पद्धतीचे शिक्षण सभासद आणि कार्यकर्ते यांना देणे सहकारातील सभासदांना पदाधिकाऱ्यांना आणि सेवकांना शिक्षण प्रशिक्षण देणे

सहकारी संस्थांची रचना –

सहकारी संस्थांची रचना त्रिस्तरीय स्वरूपाची असते.

१. गाव खेडे पातळीवरील स्वरूपाच्या सहकारी संस्था असतात.

२. जिल्हा पातळीवर मध्यवर्ती स्वरूपाच्या सहकारी संस्था असतात

३. राज्य पातळीवर शिखर सहकारी संस्था ही सर्वोच्च असते.

अशा प्रकारे सहकारी संस्थांची संघटनात्मक रचना पिरॅमिड सारखी असते सहकारी बँकांच्या बाबतीत तालुका पातळीवर पतपुरवठा भांडवल पुरवठा करणाऱ्या प्राथमिक स्वरूपाच्या बँका निर्माण केल्यास असून जिल्ह्याच्या ठिकाणी मध्यवर्ती बँका व मुंबई येथे शिखर बँक अशी त्रिस्तरीय रचना आढळते.

१. महाराष्ट्रातील सहकाराची काही प्रमुख क्षेत्रे –

अ) सहकारी साखर कारखाने

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमध्ये सहकारी साखर कारखान्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागाचा आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्यासाठी सहकारी साखर उद्योगाची स्थापना करण्यात आली. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्वतःच्या भांडवलातून आणि शासनाच्या मदतीने उभारलेले साखर कारखाने म्हणजे सहकारी साखर कारखाने होय महाराष्ट्रात सध्या सहकारी साखर कारखान्यांची संख्या २१४ आहे या सहकारी साखर कारखान्यात अंदाजे सुमारे २८०० कोटी रुपयांची

गुंतवणूक आहे वार्षिक उलाढाल अंदाजे एक लाख कोटी इतकी असून दहा ते बारा लाख लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त झालेला आहे अलीकडच्या काळात महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने काही प्रमाणात अडचणीत आलेले आहेत ऊस उत्पादनात घट आर्थिक कर्जबाजारीपणा साखरेच्या दरातील चढ-उतार FRP (Fair and Remunerative Price) देयकांचा ताण निर्यात व इथेनॉल धोरणातील बदल राजकीय हस्तक्षेप गैरव्यवस्थापन खाजगी साखर कारखान्यांची स्पर्धा, अल्प आयात शुल्कामुळे स्वस्त परवडणारी विदेशी साखर कामगारांचे वाढते वेतन इत्यादी कारणांमुळे हा साखर उद्योग सध्या धोक्यात आलेला आहे. साखर संचलनालयाने राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक स्थितीबाबत एक पाहणी अहवाल केंद्र शासनाला सादर केलेला आहे त्यात महाराष्ट्र राज्यातील २१ साखर कारखाने अंदाजे आजारी असून आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहे असे मत मांडले जाते २१ साखर कारखाने तर पूर्णपणे बंद पडलेले आहेत २४ साले नामदार शरद पवार केंद्रीय कृषिमंत्री यांनी साखर उद्योगांच्या अडचणींचे निवारण करण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले आहेत नाबार्डच्या मार्फत केंद्र सरकारने साखर कारखान्यांना त्यांच्या अकरा हजार कोटी रुपयांच्या कर्ज फेडीला पंधरा वर्षाची दीर्घ मुदत दिलेली आहे.

ब) शुगर लॉबी (साखर संघ)-

१९१८ साली महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील बारामती येथे दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यात आला परंतु गुळाचे वाढते भाव आणि उसाची कमतरता यामुळे तो सहकारी साखर कारखाना १९२४ साली बंद पडला पुढे १९४५ साली श्री. धनंजय राव गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यातील लोणी येथील प्रवरानगर येथे प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू केला त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर साखर कारखाने उभारले. अहमदनगर धुळे जळगाव नाशिक सांगली सातारा कोल्हापूर पुणे सोलापूर औरंगाबाद बीड जालना नांदेड परभणी बुलढाणा लातूर उस्मानाबाद भंडारा नागपूर इत्यादी जिल्ह्यात सुमारे २०२ सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात आले सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागाचा आर्थिक व सामाजिक विकास झालेला आहे साखर उद्योगामुळे कृषी औद्योगिक आणि व्यावसायिक उपक्रमांना उत्तेजन मिळून आर्थिक विकास घडून आला ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हमी बाजारपेठ मिळाली साखर कारखान्याच्या नेतृत्वाचा देखील राजकारणावर प्रभाव पडू लागला प्रत्येक साखर कारखाना आप आपल्या परिसरात आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्र बनले तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विधानसभा आणि लोकसभा यांच्या निवडणुका यांच्या आधारे साखर सम्राट यांचा प्रभाव वाढत आहे.

क) शुगर लॉबी व महाराष्ट्राच्या राजकारणाचा आढावा -

शुगर लॉबी म्हणजे साखर कारखान्यांच्या संचालकांचा समूह होय साखर सम्राटांचा असा समूह की ज्यांचा प्रभाव काही प्रमाणात विधिमंडळावर पडलेला असतो महाराष्ट्राच्या सामाजिक आर्थिक व राजकीय जीवनात सहकारी साखर कारखान्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्रातील विशेषता पश्चिम महाराष्ट्र मराठवाडा आणि काही प्रमाणात विदर्भातील राजकारणावर या शुगर लॉबीचा मोठा प्रभाव राहिलेला आहे. १९५० नंतर महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची स्थापना मोठ्या प्रमाणात झाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा ग्रामीण भागात रोजगार निर्माण व्हावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत व्हावी हा या चळवळी मागील प्रमुख उद्देश होता सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षण संस्था बँका

दूध संघ बाजार समित्या विविध विकासकामे उभी राहिली त्यामुळे शुगर लॉबी केवळ आर्थिक संघटना न राहता एक प्रभावशाली राजकीय शक्ती बनली सहकारी साखर कारखान्यांचे अध्यक्ष संचालक आणि संबंधित संस्थांचे पदाधिकारी हे स्थानिक तसेच राज्यस्तरीय राजकारणातील प्रभावी नेते बनले ग्रामपंचायत पंचायत समिती जिल्हा परिषद विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये या नेत्यांचा प्रभाव दिसून येतो. अनेक मुख्यमंत्री मंत्री आणि खासदार हे सहकारी साखर क्षेत्रातून पुढे आलेली आहेत. १९९० नंतर उदारीकरणाच्या काळात साखर उद्योगांसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली अनेक सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत आले आणि काही प्रमाणात खाजगी क्षेत्रांकडे वळले तरीसुद्धा शुगर लॉबीचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणात आजही महत्त्वाचा मानला आहे महाराष्ट्रातील अनेक प्रभावी राजकीय नेते अजूनही साखर सहकारी संस्थांशी संबंधित आहेत.

ड) सहकारी प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था –

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्प मुदतीचे व मध्यम मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी या संस्थांची स्थापना करण्यात आली या संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जातात शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक भांडवल बियाणे खते कीटकनाशके आणि इतर कृषी साहित्य उपलब्ध करून देण्याचे कार्य या संस्था करतात प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्यपातळीवर राज्य सहकारी बँक (शिखर बँक) याद्वारे कृषी क्षेत्रात अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केला जातो महाराष्ट्रात कृषी पतपुरवठा संस्थांची जाळी मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्यात हजारो प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था कार्यरत आहेत आणि लाखो शेतकरी त्यांचे सभासद आहेत या संस्थांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज खत व बियाणे पुरवठा कृषी अवजारे सिंचन व्यवस्था तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यात येते.

सहकारी प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांनी ग्रामीण विकासात मोठी भूमिका बजावली असली तरी त्यांच्यासमोर अनेक समस्या देखील आहेत थकीत कर्जाचे प्रमाण वाढणे आर्थिक गैरवस्थापन राजकीय हस्तक्षेप अपुरी वसुली आणि भ्रष्टाचार या समस्या दिसून येत असल्याने प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था पाहिजे तेवढ्या प्रमाणात यशस्वी झालेल्या नाही.

ई) नागरी सहकारी बँका–

नागरी सहकारी बँका म्हणजे शहरी व निमशहरी भागातील लोकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सहकारी तत्त्वावरील बँका होत या बँका एक सदस्य एक मत या सहकारी तत्त्वावर कार्य करतात मध्यमवर्गीय पगारदार व्यापारी लघुउद्योग कर्मचारी व्यावसायिक तसेच मध्यमवर्गीय लोकांना बचत कर्ज व इतर बँकिंग सुविधा पुरवणी हा त्यांचा मुख्य उद्देश असतो महाराष्ट्र राज्यातील नागरी सहकारी बँकांची संख्या सन २०२४ ते २०२५ मध्ये सुमारे ४२२ इतकी आहे याशिवाय महाराष्ट्रात ३७ भूहराज्य नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत कर्जपुरवठा करणे २३ विकारणे लघुउद्योगांना आर्थिक मदत बँकिंग सुविधा उपलब्ध करणे स्थानिक विकासाला चालना सावकारी प्रथेपासून संरक्षण सदस्यांचे आर्थिक हित जपणे सहकारी योजना राबवणे अशा स्वरूपाची कार्य नागरिक बँका करीत असतात

नागरी सहकारी बँकांवर राजकीय पक्षांचा प्रभाव असलेला दिसून येतो धर्म जातपंत यांचा नागरी सहकारी बँकांच्या निर्मितीवर प्रभाव पडलेला आहे नागरी बँकांच्या माध्यमातून नागरिकांना वित्तीय सहाय्य देऊन त्यांचा पाठिंबा अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न विविध राजकीय पक्षाचे नेते करताना दिसतात.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमध्ये नागरी सहकारी बँकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे या बँकांनी शहरी व निमशहरी भागातील लोकांना आर्थिक सुविधा उपलब्ध करून दिल्या तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना दिली. परंतु कालांतराने नागरी सहकारी बँका आणि राजकारण यांचा अतिशय जवळचा संबंध निर्माण झाला अनेक राजकीय नेत्यांनी या बँकांच्या माध्यमातून सामाजिक आर्थिक आणि राजकीय प्रभाव निर्माण केला त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेत नागरी सहकारी बँका हे प्रभावी केंद्र बनले नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन संचालक मंडळाद्वारे केली जाते संचालक मंडळाच्या निवडणुका होत असल्यामुळे स्थानिक राजकीय गट आणि पक्ष या निवडणुकांमध्ये सक्रिय होऊ लागले बँकेवर नियंत्रण मिळवणे म्हणजे स्थानिक समाजावर प्रभाव निर्माण करणे असे समीकरण तयार झाले त्यामुळे अनेक राजकीय नेत्यांनी सहकारी बँकांच्या माध्यमातून स्वतःचे वर्चस्व वाढवले कर्जवाटप ठेवी आर्थिक मदत शिष्यवृत्ती सामाजिक कार्यक्रम याद्वारे नेत्यांनी जनसंपर्क वाढवला अनेक नेत्यांनी बँकांच्या माध्यमातून आपला मतदार संघ मजबूत केला त्यामुळे सहकारी बँका आणि निवडणूक राजकारण यांचा कनिष्ठ संबंध निर्माण झाला महाराष्ट्रातील अनेक स्थानिक नेत्यांनी नागरी सहकारी बँकांच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला.

तथापि राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळे काही नकारात्मक परिणाम ही दिसून आले अनेक वेळा कर्ज वाटपात पक्षपात आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार घटना घडल्या काही बँकांमध्ये नियमबाह्य कर्जवाटप झाल्यामुळे थकीत कर्जाचे प्रमाण वाढले. परिणामी काही नागरी सहकारी बँका आर्थिक संकटात सापडल्या त्यामुळे ठेवीदारांचा विश्वास कमी होण्याच्या घटना घडल्या या परिस्थितीमुळे रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि राज्य सरकार विभागाने नागरी सहकारी बँकांवरील नियंत्रण अधिकारी केले लेखापरीक्षण पारदर्शकता संचालकांची पात्रता आणि आर्थिक शिस्त यावर भर देण्यात आला.

ई) दुग्ध सहकारी संस्था –

१९६४ पासून महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय सहकारी क्षेत्रात सुरू झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दूध उत्पादनातून नियमित उत्पादन मिळावे दुधाला योग्य दर मिळावा आणि दुग्ध व्यवसायाचा विकास व्हावा या उद्देशाने या संस्थांची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्रातील दूध सहकारी संस्थांची रचना –

१. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ शिखर संघ

२. तालुका जिल्हा पातळीवरील दूध संघ

३. प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संघ

महाराष्ट्रात प्राथमिक सहकारी दूध संस्थांची संख्या सुमारे २२,७८२ होती त्यापैकी १२६७९ संस्था नफ्यात होत्या सहकारी दूध संघ ६७ आहेत त्यापैकी ४६ दुध संघ नफ्यात आहे राज्यातील एकूण दूध पुरवठ्यांपैकी ८५ टक्के दूध पुरवठा सहकारी क्षेत्रामार्फत होतो राज्यात दुधाचे वार्षिक उत्पादन सुमारे १४५

लाख डॉलर्स होत असते यामुळे महाराष्ट्र दुधाची डबल क्रांती या दिशेने प्रगती चालू असली तरीही महाराष्ट्रातील अंदाजे १८ दूध संघ तोट्यात असून ते आर्थिक संकटात सापडलेले आहे अशा तोट्यात चालणाऱ्या दूध संघात सत्ता स्पर्धा दुधाचा घडता दर्जा सदोष व्यवस्थापन आणि भ्रष्टाचार असे दोष आढळून येतात.

दुग्ध सहकारी संस्थांमुळे ग्रामीण भागात अनेक विकास कामे झाली दूध संकलन केंद्रे रस्ते शीतकरण केंद्रे पशुवैद्यकीय सेवा रोजगार निर्मिती व महिलांचा आर्थिक सहभाग वाढलेला आहे दूध सहकारी संस्थांमध्ये ग्रामीण भागात आर्थिक आणि सामाजिक नेतृत्व निर्माण झाले अनेक ठिकाणी दूध संघाचे अध्यक्ष संचालक आणि पदाधिकारी हेच पुढे पंचायत समिती जिल्हा परिषद विधानसभा आणि संसदेत सदस्य निवडून गेली त्यामुळे सहकारी संस्था या ग्रामीण राजकारणाच्या केंद्रस्थानी आल्या.

न) पणन सहकारी संस्था –

महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघाची स्थापना १९५८ मध्ये करण्यात आली आणि त्याने १९५९ पासून कार्य सुरू केले ही संस्था राज्यातील सहकारी पणन चळवळीची प्रमुख शिखर संस्था आहे. महाराष्ट्रातील पणन सहकारी संस्थांची रचना त्री स्तरीय स्वरूपाची आहे.

१. प्राथमिक सहकारी पणन संस्था ग्राम स्तर

२. जिल्हा सहकारी पणन संस्था जिल्हास्तर

३. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ राज्य स्तर

पणन सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश असा आहे की शेतीमालाची खरेदी विक्री साठवणूक व प्रक्रिया शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव निर्यात व विपणन सुविधा व कृषी उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे या पणन संस्थांद्वारे वस्तूंच्या किमती जर हंगामानंतर एकदम कोसळू लागल्या तर आधार किंमत देणे उदाहरणार्थ कांदा खरेदी सक्तीचे धान्य खरेदी करणे कापूस एकाधिकार खरेदी लेझी साखर खरेदी करणे असे उपक्रम राबविले जातात. तसेच दलालांची संख्या कमी करून शेतकरी आणि ग्राहक यांना जोडणे अशी कामे महाराष्ट्रात पणन संस्था करीत असली तरी आर्थिक दृष्ट्या तोट्यातच गेलेले दिसतात महाराष्ट्रातील पणन सहकारी संस्थांनी कृषी विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी राजकीय हस्तक्षेप भ्रष्टाचार व्यवस्थापनातील त्रुटी आणि स्पर्धात्मक बाजारपेठेतील अडचणी यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत कांदा उत्पादक ऊस उत्पादक व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य व राष्ट्रभाषा मिळत नाही त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याच्या प्रवृत्तीकडे वळलेला आहे या सर्वांचा परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर कमी अधिक प्रमाणात झालेला दिसतो.

ह) सहकार आणि नाबार्ड–

भारतातील सहकार चळवळीच्या विकासामध्ये नाबार्डची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे नाबार्ड म्हणजे राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक ची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी करण्यात आली या संस्थेची स्थापना शिवरामन समितीच्या शिफारशीवरून झाली लाबार्डही भारतातील कृषी आणि ग्रामीण विकासासाठी ची सर्वोच्च वित्तीय संस्था मानली जाते. भारतीय रिझर्व बँकेच्या कृषी कर्ज विभागात आणि Agriculture Refinance and Development Corporative (ARDC) यांचे एकत्रीकरण करून नाबार्डची निर्मिती

करण्यात आली रिझर्व बँकेचे ५०% भाग भांडवल आणि केंद्र सरकारचे ५० टक्के भाग भांडवल असे नाबार्डचे अधिकृत भांडवल ५०० कोटीचे आहे जागतिक बँक आंतरराष्ट्रीय विकास मंडळ आणि आंतरराष्ट्रीय विकास संस्था यांच्याकडून नाबार्डला भांडवल मिळते याशिवाय अमेरिका इंग्लंड स्विझर्लंड जर्मनी अशा देशांकडून नाबार्डने कर्जे घेतलेली आहेत. ग्रामीण पायाभूत सुविधा निधी उभारून नाबार्डने ग्रामीण रस्ते पूल सिंचन शाळा पाणीपुरवठा यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो नाबार्डने सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी सहकार विकास निधीची स्थापना केलेली आहे नाबार्डने गेल्या तीन वर्षात सहकारी बँकांना सुमारे ५.५५ लाख कोटी इतके पुनर्वित सहाय्य केलेले आहे तसेच प्रादेशिक ग्रामीण बँकांना हजारो कोटी रुपयांचे सहाय्य देण्यात आले आहे २००६ रोजी नाबार्डने सहकारी साखर कारखान्यांना १६९२ कोटी रुपयाचे दीर्घकालीन अर्थसहाय्य केलेले आहे शासनमान्य वित्त संस्थांना पतपुरवठा करून केंद्र सरकार राज्य सरकार नियोजन आयोग आणि नाबार्डने ग्रामीण विकासाशी निगडित असणाऱ्या संस्थांच्या कार्यात समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

सहकारी चळवळीचे मूल्यमापन –

१९२५ रोजी मुंबई सहकारी संस्था कायदा संमत झाला त्या वेळेपासून आजपर्यंतचा सहकारी चळवळीचा आढावा घेतला असता महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही राज्याच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय विकासातील एक महत्त्वपूर्ण चळवळ मानली जाते ग्रामीण भागातील शेतकरी कामगार महिला आणि दुर्बल घटकांना आर्थिक बळ देण्यासाठी सहकार तत्वाचा उपयोग करण्यात आला तथापि या चळवळीने अनेक यश मिळवले असले तरी काही त्रुटी निर्माण झालेले आहेत त्यामुळे सहकारी चळवळीचे मूल्यमापन करताना तिच्या सकारात्मक व नकारात्मक दोन्ही बाजूंचा विचार करणे आवश्यक आहे

सहकारी चळवळीची सकारात्मकता–

१. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये सहकार चळवळीचे मोठे योगदान आहे सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्यांना कर्ज बियाणे खते आणि आधुनिक शेतीसाठी आवश्यक साधने उपलब्ध झाली. सहकारी साखर कारखाने दुग्ध संस्था आणि पतसंस्था यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण झाला ग्रामीण उद्योग वाहतूक आणि बाजारपेठांच्या विकास होऊन गावांची आर्थिक स्थिती सुधारली सहकारामुळे सावकारांवरील अवलंबित्व कमी झाले आणि शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले त्यामुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्या सहकार चळवळ महत्वपूर्ण ठरली.

२. राजकीय क्षेत्र –

सहकारी चळवळीमुळे महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात ग्रामीण नेतृत्व निर्माण झाले. गाव पातळीवरील शेतकरी कामगार आणि सामान्य लोकांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली सहकारी संस्था या लोकशाही नेतृत्वाच्या प्रशिक्षण केंद्र प्रमाणे कार्य करू लागल्या अनेक नेत्यांनी सहकारी साखर कारखाने बँका आणि दूध संघाच्या माध्यमातून समाजकार्य व विकास कार्य केले सहकारामुळे ग्रामीण भागातील लोकांचे राजकीय जागृतीकरण झाले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी मिळाली यामुळे ग्रामीण समाजाचा राजकीय सहभाग वाढवण्यास सहकारी चळवळ उपयुक्त ठरली

३. सामाजिक क्षेत्र–

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीमुळे सामाजिक क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल घडून आली सहकारी संस्थांमुळे ग्रामीण भागातील लोकांमध्ये एकोपा परस्पर सहकार्य आणि सामूहिक जबाबदारीची भावना वाढली शेतकरी कामगार आणि सामान्य नागरिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळाले आरोग्य शिक्षण पाणीपुरवठा आणि रोजगार यासारख्या सुविधा ग्रामीण भागात पोहोचवण्यास मदत झाली. महिलांचे सक्षमीकरण आणि दुर्बल घटकांचा समाजातील सहभाग वाढविण्यात सहकार चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली त्यामुळे ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली.

४. शैक्षणिक क्षेत्र –

सहकार चळवळीमुळे शैक्षणिक क्षेत्राच्या विकासालाही मोठी मदत झाली अनेक सहकारी साखर कारखाने बँका आणि संस्थान कि शाळा महाविद्यालय व तांत्रिक शिक्षण संस्था सुरू केल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शिक्षणाचा प्रसार वाढला गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वसतिगृह आणि आर्थिक सहाय्य देण्यात आले शिक्षणामुळे ग्रामीण युवकांमध्ये कौशल्य जागरूकता आणि नेतृत्व गुरु विकसित झाले त्यामुळे ग्रामीण समाजाचा शैक्षणिक व बौद्धिक प्रगतीला चालना मिळाली.

सहकार चळवळीतील नकारात्मकता किंवा दोष

सहकारी चळवळीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा काही प्रमाणात विकास झाला असला तरी तिच्या दोषांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही परंतु कालांतराने सहकार चळवळ अनेक दोषग्रस्त झाली. राजकीय हस्तक्षेप भ्रष्टाचार आर्थिक गैरव्यवहार अपुरे व्यवस्थापन कर्ज बुडवेपणा आणि सदस्यांचा कमी सहभाग यासारखे अनेक दोष या चळवळीत दिसून येतात.

१. राजकीय हस्तक्षेप–

अनेक सहकारी संस्थांवर राजकीय नेत्यांचे वर्चस्व निर्माण झाले आहे निवडणुका आणि निर्णय प्रक्रिया राजकारणावर आधारित होत असल्यामुळे सहकाराचा मूळ उद्देश मागे पडतो संस्थांचा वापर राजकीय प्रभाव वाढवण्यासाठी केला जातो त्यामुळे सामान्य सभासदांचे हित दुर्लक्ष होते.

२. भ्रष्टाचार व गैरव्यवहार

काही सहकारी संस्थांमध्ये आर्थिक गैरव्यवहार अपहार आणि भ्रष्टाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात दिसून येतात निधीचा योग्य वापर होत नाही पारदर्शकतेचा अभाव असल्यामुळे संस्थांवरील लोकांचा विश्वास कमी होतो ज्यामुळे संस्थांची आर्थिक स्थिती कमकुवत होते.

३. थकबाकीची समस्या –

अनेक सहकारी बँका व पतसंस्थांमध्ये कर्जफेड न होण्याचे प्रमाण वाढले आहे शेतकरी व इतर सभासदांना कमी कर्जाची वसुली वेळेवर होत नाही त्यामुळे संस्थांना आर्थिक तोटा सहन करावा लागतो तर काही संस्थांना बंद पडण्याची वेळ येते.

४. कार्यक्षम व्यवस्थापनाचा अभाव –

अनेक सहकारी संस्थांमध्ये प्रशिक्षित आणि अनुभवी व्यवस्थापन नसते निर्णय घेण्यास विलंब होतो आणि नियोजन योग्य प्रकारे केले जात नाही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही कमी प्रमाणात होतो त्यामुळे संस्थांची कार्यक्षमता घटते

५. सभासदांचा कमी सहभाग –

सामान्य सभासदांचा संस्थेच्या कामकाजात सक्रिय सहभाग कमी असतो काही मोजकेच लोकच सर्व निर्णय घेतात त्यामुळे लोकशाही तत्त्वाचा योग्य वापर होत नाही सभासदांमध्ये सहकाराविषयी उदासीनता निर्माण होते.

६. सहकाराच्या तत्त्वांचा ऱ्हास –

स्वयंसेवा समानता आणि परस्पर सहकार्य ही सहकाराची मूलभूत तत्वे अनेक ठिकाणी दुर्लक्ष झाले आहेत वैयक्तिक स्वार्थ आणि गटबाजी वाढली यामुळे सहकाराची सामाजिक भावना कमी होत आहे संस्थांच्या मूळ हेतू कमकुवत झाला आहे.

७. आर्थिक दुर्बलता –

काही सहकारी संस्थांकडे पुरेशी निधी उपलब्ध नसते सतत तोटा आणि कर्जबाजारीपणामुळे संस्था आर्थिक दृष्ट्या दुर्बल होतात शासनावर जास्त अवलंबून राहावे लागते त्यामुळे स्वतंत्रपणे कार्य करणे कठीण जाते.

८. ग्रामीण भागापूर्ती मर्यादा–

सहकार चळवळीच्या विकास काही विशिष्ट ग्रामीण भागात प्रकाश मर्यादित राहिलेला आहे सर्व भागांमध्ये समान प्रमाणात प्रगती झालेली नाही काही मागास भागांना सहकाराचा पुरेसा लाख मिळालेला नाही त्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला आहे.

९. शासकीय नियंत्रण वाढणे –

अनेक सहकारी संस्थांवर शासनाचे नियंत्रण जास्त प्रमाणात असते नियम आणि प्रक्रियांमुळे निर्णय घेण्यास विलंब होतो संस्थांची स्वायतता कमी होते त्यामुळे कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

१०. अनेक संस्था बंद पडणे –

अनेक सहकारी संस्थांमध्ये आर्थिक तोटा भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनामुळे बंद पडल्या आहेत विशेषता काही सहकारी साखर कारखाने आणि पतसंस्था अडचणीत आल्या यामुळे सभासदांचे आर्थिक नुकसान झाले सहकार चळवळीवरील विश्वास कमी झाला.

११. जागतिकीकरण आणि सहकार चळवळ –

१९९१ रोजी भारताने आर्थिक धोरण स्वीकारले आहे सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण आयात निर्यात व व्यापार विषयक शितलीकरण आणि बाजार व्यवस्थेचे जागतिकीकरण या आर्थिक धोरणांची स्वीकृती केल्यामुळे सहकारी संस्थांना आर्थिक सहाय्य करण्याचे बंधन शासनावर राहिले नाही. बहुराष्ट्रीय

कंपन्या मोठ्या प्रमाणात भारतात आल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या तुलनेत सहकारी संस्थांना भांडवल कमी पडते त्यामुळे उच्च तंत्रज्ञानाचा अवलंब करता येत नाही व्यवस्थापकीय कौशल्य मालाचा दर्जा व गुणवत्ता आणि बाजारपेठाची उपलब्धता याबाबतीत सहकार क्षेत्रातील संस्था कमी पडत आहे जागतिकीकरणाचे आव्हाने पेरण्यासाठी सहकार संस्थानी स्वबळावर आर्थिक विकास साधला पाहिजे त्यासाठी या संस्थांनी आपले भांडवल वाढविले पाहिजे सहकार क्षेत्रातील नेते संचालक सभासद आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी सहकार्याच्या वृत्तीने सहकार्याला बळकटी आणण्यासाठी प्रयत्न केले तरच जागतिकीकरणाच्या प्रवाहात सहकार चळवळ टिकून राहील.

४.३.३.जातीय आरक्षणावरील चळवळी (Moments for Caste Based Reservation)

भारतीय समाज रचनेत प्राचीन काळापासून जातिव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान राहिले आहे या व्यवस्थेमुळे समाजात उच्च नीच भेद सामाजिक विषमता आणि अन्याय निर्माण झाला अनेक समाज घटक शिक्षण रोजगार राजकीय सत्ता आणि आर्थिक साधनांपासून वंचित राहिले स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने सामाजिक न्यायाचे तत्व स्वीकारून मागासवर्गीय समाज घटकांच्या उन्नतीसाठी आरक्षणाची व्यवस्था केली महाराष्ट्रात ही विविध समाज घटकांनी शिक्षण सरकारी नोकरी आणि राजकीय प्रतिनिधीतत्वाचे समान संधी मिळवण्यासाठी आरक्षणाच्या मागण्या केल्या या मागण्यामधून अनेक जातीय आरक्षण चळवळी उभ्या राहिल्या मराठा धनगर ओबीसी मुस्लिम भटके विमुक्त जाती अशा विविध समाज घटकांनी आंदोलन मोर्चा उपोषणे आणि न्यायालयीन लढ्याच्या माध्यमातून आपल्या मागण्या मांडल्या त्यामुळे जाती आरक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचा विषय बनला आहे.

जाती आरक्षणावरील चळवळीची संकल्पना –

जाती आरक्षणासाठी किंवा आरक्षण टिकवण्यासाठी विविध समाज घटकांनी संघटित पद्धतीने केलेली आंदोलने मोर्चे उपोषण निवेदने आणि संघर्ष यांना जाती आरक्षणावरील चळवळी असे म्हणतात.

१. महात्मा ज्योतिराव फुले –

महात्मा फुले यांनी भारतीय समाजातील जाती विषमता आणि ब्राह्मण्यवादी वर्चस्वाचा तीव्र विरोध केला त्यांनी शूद्र अति शूद्र समाजाला शिक्षण आणि सामाजिक हक्क मिळावीत यासाठी कार्य केले त्यांच्या मते समाजातील दुर्बल घटकांना समान संधी देण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे आरक्षणाची कल्पना सामाजिक न्यायाच्या तत्वाशी संबंधित असल्याचे त्यांच्या विचारात दिसून येते.

२. राजश्री छत्रपती शाहू महाराज–

राजश्री छत्रपती शाहू महाराज हे भारतातील आरक्षण धोरणाचे प्रारंभीचे समर्थक मानले जातात त्यांनी १९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले त्यांच्यामध्ये समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाल्याशिवाय खरी लोकशाही निर्माण होऊ शकत नाही त्यांनी शिक्षण आणि नोकरीमध्ये मागास समाजांना प्राधान्य देण्यावर भर दिला शाहू महाराजांचे मत होते की मागासलेल्या समाजाला विशेष संधी दिल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही म्हणूनच त्यांनी आरक्षणाला प्राधान्य दिले त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली शिष्यवृत्ती दिल्या आणि मोफत शिक्षणाची व्यवस्था केली शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे मुख्य साधन मानले आहे.

राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यता आणि जातीभेदाविरुद्ध कठोर भूमिका घेतली सार्वजनिक विहिरी धर्मशाळा आणि इतर सुविधा सर्वांसाठी खुल्या केल्या समाजातील कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले त्यांच्या धोरणांमुळे बहुजन समाजाला आत्मविश्वास निर्माण झाला महाराष्ट्रातील जाती आरक्षणाच्या चळवळीला दिशा देण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले त्यांच्या विचारांचा प्रभाव पुढील काळातील आरक्षण धोरणावर आणि भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्यायाच्या तत्वावर ही दिसून येतो त्यामुळे त्यांना सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते आणि आरक्षणाचे जनक असे समजले जाते.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानले त्यांच्या मते शतकानून शतके वंचित राहिलेल्या समाज घटकांना समान स्पर्धा करता येत नाही त्यामुळे त्यांना विशेष संधी देणे आवश्यक आहे त्यांनी राज्यघटनेत अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षणाची तरतूद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये आरक्षण सामाजिक समता निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतीय समाज व्यवस्थेत खालच्या जातींना शतकानूशतके शिक्षण, राजकीय प्रतिनिधित्व आणि सन्मानांपासून दूर ठेवण्यात आले होते त्यामुळे या समाज घटकांना समान संधी मिळवण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक होते यासाठी त्यांनी आरक्षणाची संकल्पना मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३२ च्या पुना ॲक्ट मध्ये त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची पूना ॲक्ट मागणी केली होती. नंतरच्या तडजोडीत अनुसूचित जातींसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली हा भारतीय आरक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा टप्पा होय त्यांच्या मते सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण आवश्यक आहे त्याने गुणवत्तेला विरोध न करता सर्वांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी आरक्षणाची बाजू मांडली.

भारतीय राज्यघटनेतील कलम १४ नुसार सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता प्रदान करते परंतु केवळ समानता जाहीर करून सामाजिक विषमता दूर होत नाही त्यामुळे कलम १५ (४) आणि १५(५) अंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला देण्यात आला कलम १६ (४) नुसार सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय समाजाला आरक्षण देण्याची तरतूद आहे. तसेच कलम ३३० आणि ३३२ अंतर्गत लोकसभा व राज्य विधानसभांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांची व्यवस्था करण्यात आली आहे भारतीय राज्यघटनेच्या कलम ४६ मध्ये राज्याने दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हिताचे संरक्षण करावे असे निर्देश दिले आहेत यामुळे सामाजिक न्यायाला घटनात्मक आधार प्राप्त झाला.

आरक्षणाचा उद्देश कोणत्याही समाजाला विशेष अधिकार देणे नसून ऐतिहासिक अन्यायामुळे मागे राहिलेल्या समाज घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे हा आहे शिक्षण रोजगार आणि राजकीय प्रतिनिधीतत्वाच्या माध्यमातून त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आरक्षणाचे प्रमुख ध्येय आहे भारतीय राज्यघटनेमुळे आरक्षण व्यवस्थेला कायदेशीर आणि घटनात्मक मान्यता मिळाली त्यामुळे दलित आदिवासी आणि इतर मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीस चालना मिळाली सामाजिक

समता बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी आरक्षण हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे साधन मानले आहे.

जातीय आरक्षणावरील चळवळी (Moments for caste based reservation)

१ दलित आरक्षण चळवळ

२. ओबीसी आरक्षण चळवळ

३. मराठा आरक्षण चळवळ

४. धनगर आरक्षण चळवळ

१. दलित आरक्षण चळवळ–

महाराष्ट्रातील दलित आरक्षण चळवळ ही सामाजिक न्याय समानता आणि हक्कांसाठी उभारलेली महत्त्वाची चळवळ मानली जाते, या चळवळीची प्रेरणा प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून मिळाली ब्रिटिश काळात दलित समाजाला शिक्षण नोकरी राजकारण आणि सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणात भेदभाव सहन करावा लागत होता त्यामुळे दलित समाजाला समान संधी मिळाव्यात म्हणून आरक्षणाची मागणी पुढे आली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण संघटना आणि संघर्ष याचा मार्ग स्वीकारला. त्यांनी गोलमेज परिषदेत दलितांच्या स्वतंत्र प्रतिनिधीत्वाची मागणी केली पुढे भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातींसाठी शिक्षण सरकारी नोकरी आणि लोकप्रतिनिधीत्वात आरक्षणाची तरतूद करण्यात आली महाराष्ट्रात दलित आरक्षण चळवळीला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. दलित पँथर सारख्या संघटनांनी दलितांवरील अन्यायाविरोधात आवाज उठवला आरक्षणामुळे दलित समाजातील अनेक युवकांना शिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे सामाजिक आणि आर्थिक प्रगतीस चालना मिळाली. दलित आरक्षण चळवळीमुळे समाजात समतेची जाणीव वाढली आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली बाबासाहेब आंबेडकरांच्या मते समाजातील दुर्बल घटकांना समानतेच्या पातळीवर आणण्यासाठी विशेष सवलती आवश्यक होत्या त्यामुळे त्यांनी आरक्षणाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला त्यांच्यामध्ये राजकीय आणि सामाजिक समानता मिळाल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. समाजाला शिक्षण नोकरी आणि राजकीय क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.

१९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारणी सभा ची स्थापना केली या संस्थेचे उद्दिष्ट दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करणे सामाजिक जागृती निर्माण करणे आणि त्यांना संघटित करणे हे होते. शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश दलित चळवळीचा मुख्य आधार बनला त्यांनी दलित समाजात आत्मविश्वास आणि स्वाभिमान जागृत केला १९२७ मध्ये त्यांनी महाड येथे चवदार तळे सत्याग्रह केला दलितांना सार्वजनिक पाण्याचा हक्क मिळावा यासाठी हे आंदोलन करण्यात आले या सत्याग्रहामुळे दलित चळवळीला मोठी दिशा मिळाली त्याच काळात त्यांनी मनुस्मृती ग्रंथ दहन केले. आंदोलन केले मनुस्मृतीमधील जातीय आणि अन्यायकारक विचारांना त्यांनी विरोध केला. दलितांच्या राजकीय हक्कांसाठी त्यांनी मोठा संघर्ष केला १९३० मध्ये लंडन येथे झालेल्या गोलमेज परिषदेत त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार

संघाची मागणी केली त्यांच्या मते दलितांना स्वतंत्र राजकीय प्रतिनिधित्व मिळाले तरच त्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जाऊ शकतील ब्रिटिश सरकारने ही मागणी मान्य करून स्वतंत्र मतदार संघ जाहीर केला मात्र महात्मा गांधीजींनी याला विरोध केला यानंतर १९३२ मध्ये पुणे करार झाला या करारानुसार स्वतंत्र मतदारसंघ ऐवजी दलितांसाठी विधान मंडळात आरक्षित जागांची तरतूद करण्यात आली. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे दलित समाजात शिक्षण रोजगार आणि राजकीय क्षेत्रात संधी मिळाली आरक्षणामुळे अनेक दलित युवक अधिकारी डॉक्टर इंजिनियर वकील व राजकारणी बनली त्यामुळे समाजात सामाजिक न्यायाची प्रक्रिया सुरू झाली. दलित आरक्षण चळवळ ही केवळ नोकरी किंवा शिक्षणापूर्ती मर्यादित नव्हती तर ती सामाजिक समता आणि समान हक्कांची चळवळ होती आज भारतातील आरक्षण व्यवस्था आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीचे आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची फलित मानले जाते दलितांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेली कार्य भारतीय इतिहासात अमूल्य मानले जाते.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदी –

१. कलम १४ नुसार सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता व समान संरक्षणाचा अधिकार देते

२. कलम १५ (४) नुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्याला देते

३. कलम १५ (५) नुसार शैक्षणिक संस्थांमध्ये एससी एसटी आणि इतर मागास वर्गांसाठी आरक्षणाची तरतूद करण्याची उभा राज्याला देते

४. कलम १६ (४) सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गांसाठी आरक्षण देण्याची तरतूद करते

५. कलम १६ (४ ए) अनुसूचित जाती व जमातींना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याची तरतूद करते

६. कलम १७ अस्पृश्यता नष्ट करून तिच्या कोणत्याही प्रकारास कायद्याने गुन्हा घोषित करते

७. कलम ४६ अनुसूचित जाती व जमातीच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण व प्रोत्साहन देण्याची जबाबदारी राज्यावर टाकते

८. कलम ३३० लोकसभेमध्ये अनुसूचित जाती व जमातींसाठी जागा राखीव ठेवते

९. कलम ३३२ राज्य विधानसभांमध्ये एससी व एसटी साठी आरक्षित जागांची तरतूद करते

१०. कलम ३३५ प्रशासनातील कार्यक्षमता लक्षात घेऊन एससी व एसटी यांना सरकारी सेवांमध्ये संधी देण्याची तरतूद करते

११. कलम ३६८ अनुसूचित जाती आयोगाची स्थापना करण्याची तरतूद करते

१२. कलम ३४१ राष्ट्रपती कोणत्या जाती अनुसूचित जाती म्हणून घोषित करतील याची तरतूद करते

भारतीय राज्यघटनेतील या तरतुदीमुळे दलित समाजाला शिक्षण रोजगार राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक संरक्षण मिळण्यास मदत झाली या घटनात्मक संरक्षणामुळे सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने

महत्त्वपूर्ण पाऊल उचलले होते.

२. ओबीसी आरक्षण चळवळ–

ओबीसी आरक्षण चळवळ ही भारतीय समाजातील सामाजिक न्याय समानता आणि प्रतिनिधीत्वासाठी उभी राहिलेली महत्त्वपूर्ण चळवळ आहे भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अनेक जाती शैक्षणिक सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास राहिलेल्या होत्या या समाज घटकांना शिक्षण नोकरी आणि राजकीय क्षेत्रात समान संधी मिळाव्यात यासाठी आरक्षणाची मागणी करण्यात आली. भारतात जाती व्यवस्थेमुळे शिक्षण आणि सत्तेपासून वंचित राहिलेल्या कष्टकरी अठरापगड जातींना प्रशासनात वाटा मिळवून देण्यासाठी अनेक समाज सुधारक आणि विचारवंतांनी पाया घातला.

ऐतिहासिक पार्श्वभूमी चे टप्पे खालील प्रमाणे –

१. महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ

ओबीसी चळवळीची वैचारिकता महात्मा फुले यांच्या विचारात आढळतात त्यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली त्यांनी शूद्र आणि ओबीसी यांच्या शोषणावर प्रकाश टाकला विद्येविना मती गेली हा विचार पुढे मांडून त्यांनी बहुजन समाजाच्या दारिद्र्याची मूळ शिक्षणाच्या अभावात आहे हे सिद्ध केले त्यांनी ब्रिटिश सरकारकडे बहुजन समाजाला नोकऱ्या आणि शिक्षणास संधी देण्याची पहिली मागणी केली होती.

२. राजश्री छत्रपती शाहू महाराज

राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी मागास प्रवर्गाची व्याख्या करताना स्पष्ट केली की ब्राह्मण प्रभू कायस्थ शेणवी आणि पारशी हे पुढारलेले समाज सोडून उर्वरित सर्व जाती या मागासलेल्या समजल्या जाव्यात या व्याख्येमुळे मराठा कुणबी धनगर माळी तेली साडी मुस्लिम आणि अस्पृश्य या सर्वच बहुजन जातींना ज्यांना आज आपण ओबीसी आणि एससी एसटी म्हणतो प्रशासनात पहिल्यांदा अधिकृत वाटा मिळावा. राजश्री छत्रपती शाहू महाराज हे भारतातील आरक्षणाचे आद्य प्रणेते मानले जातात त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात बहुजन आणि मागास जातींची दुरावस्था बदलण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले होते.

२६ जुलै १९०२ चा जाहीरनामा

२६ जुलै १९०२ चा जाहीरनामा हा भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि सुवर्ण अक्षराने लिहून ठेवावा असा ऐतिहासिक दस्तावेज आहे हा जाहीरनामा राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जाहीर केला होता या जाहीरनाम्याचा मुख्य उद्देश कोल्हापूर संस्थानातील प्रशासनात बहुजन समाज मागासवर्गीय आणि दलितांना योग्य प्रतिनिधित्व देणे हा होता या जाहीरनाम्याद्वारे छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय आणि बहुजन समाजासाठी ५०% जागा राखीव ठेवण्याची ऐतिहासिक घोषणा केली.

जाहीरनाम्यातील प्रमुख तरतुदी

१. जागांचे आरक्षण

इथून पुढे होणाऱ्या सर्व सरकारी नोकर भरतीमध्ये ५०% जागा ह्या मागासलेल्या वर्गातील उमेदवारांसाठी राखीव राहतील

२. शैक्षणिक पात्रता

जर मागासवर्गीय उमेदवारांमध्ये इंग्रजीची किमान पात्रता मॅट्रिक किंवा तस्तम असेल तर त्यांना प्राधान्याने नोकरीत घेतले जावे

३. अधिकारी वर्गाला आदेश

सर्व खात्यांच्या प्रमुखांना आधी देण्यात आला की त्यांनी आपल्या खात्यातील कर्मचाऱ्यांची जातवार आकडेवारी दर सहा महिन्यांनी महाराजांकडे सादर करावी जेणेकरून आरक्षणाची अंमलबजावणी नीट होते आहे की नाही हे समजेल

४. जाहीरनाम्याची दूरगामी परिणाम

सामाजिक समता या निर्णयामुळे दलितांना मराठा कुणबी धनगर मुस्लिमांनी इतर मागास जातींमधील तरुणांना प्रशासनात काम करण्याची संधी मिळाली.

भारतातील आधुनिक आरक्षण धोरणाचा पाया या जाहीरनाम्याचा सर्वात मोठा दूरगामी परिणाम म्हणजे स्वतंत्र भारताच्या संविधानातील आरक्षण धोरणाची पायाभरणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी जी आरक्षणाची तरतूद केली त्याचे मूळ छत्रपती शाहू महाराजांच्या या ५० टक्के आरक्षणाच्या जाहीरनाम्यात होते.

प्रशासनातील उच्चवर्णी यांची मक्तेदारी संपुष्टात आली

त्या काळात कोल्हापूर संस्थानातील प्रशासनात सरकार नोकऱ्यांमध्ये विशिष्ट उच्चवर्णीय समाजाची जवळपास ९०% ते ९५ टक्के वर्चस्व होते या जाहीरनामा या मुळे मराठा कुणबी धनगर मुस्लिम जैन लिंगायत आणि दलित समाजातील सुशिक्षित तरुणांना प्रशासनात थेट संधी मिळाली.

बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार आणि जागृती

शाहू महाराजांना माहीत होते की केवळ नोकऱ्या राखीव ठेवून चालणार नाही तर त्यासाठी बहुजन समाज शिकला पाहिजे महाराजांनी कोल्हापुरात मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला वेगवेगळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची साखळी निर्माण केली यामुळे बहुजन समाजात शिक्षणाची गोडी निर्माण झाली आणि एक सुशिक्षित पिढी तयार झाली.

दलित व वंचित समाजाचे सक्षमीकरण

या जाहीरनामाचे अस्पृश्य आणि अति शूद्र मानल्या गेलेल्या समाजाला समाजात मानाचे स्थान मिळवून दिले नोकऱ्यांमधील अधिकारामुळे या समाजाचा आत्मविश्वास वाढला आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा त्यांना या निर्णयामुळे मिळाली.

ब्रिटिशांच्या काळातील कायदेशीर प्रयत्न

मिलर कमिटी १९१८

म्हैसूर संस्थानात आजचे कर्नाटक मागा जातींना प्रशासनात वाटा देण्यासाठी मिल्लर कमिटी स्थापन करण्यात आली होती ज्याने मागासवर्गीयांना आरक्षण देण्याची शिफारस केली.

बॉम्बे प्रेसिडेन्सी १९२५

महाराष्ट्राचा समावेश असलेल्या तात्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सी मध्ये मागास जातींसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला यासाठी समाजाचे अ ब आणि क असे वर्गीकरण केले गेले होते ज्यामध्ये ब गटात आजच्या ओबीसी जातींचा समावेश होता.

स्वातंत्र्यप्राप्ती आणि संविधानातील तरतुदी १९५०

भारताचे संविधान तयार करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी इतर मागासवर्गीयांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी संविधानात विशेष कलमे अंतर्भूत केली

कलम ३४० या कलमान्वये देशातील मागासवर्गीयांची स्थिती जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी केंद्र सरकारने मागासवर्ग आयोग नियुक्त करावा अशी घटनात्मक तरतूद डॉक्टर बाबासाहेबांनी केली याच कलमाच्या आधारे पुढे कालेलकर आणि मंडळ आयोगाची स्थापना झाली.

कलम १५ (४) आणि कलम १६ (४) सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या उन्नतीसाठी राज्य सरकारला विशेष तरतुदी आरक्षण करण्याचे अधिकार देण्यात आले.

१. पहिल्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाबद्दल कालेलकर आयोग

पहिल्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना २९ जानेवारी १९५३ रोजी राष्ट्रपतींच्या आदेशानुसार करण्यात आली. भारतीय संविधानातील कलम ३४० अन्वये या आयोगाचे गठन करण्यात आले होते या कलमानुसार राष्ट्रपतींना सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आयोग नेमण्याचा अधिकार आहे. या आयोगाचे अध्यक्ष प्रसिद्ध गांधीवादी विचारवंत काका कालेलकर हे होते.

आयोगाचे उद्दिष्ट आणि कार्य

१. मागासलेपण ठरविणे

देशातील कोणत्या जाती आणि जमाती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत हे ठरवण्यासाठी निश्चित निकष तयार करणे हे आयोगाचे मुख्य काम होते तसेच अशा मागासलेल्या वर्गांची एक अद्यावत यादी तयार करणे.

२. अडचणींचा अभ्यास करणे

या वर्गांना भेडसावणाऱ्या अडचणींचा आणि समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

३. आयोगाच्या प्रमुख शिफारसी

काका कालेलकर आयोगाने आपला अहवाल ३० मार्च १९५५ रोजी सरकारला सादर केला आयोगाने देशभरात सुमारे २३९९ जातींना मागासवर्गीय म्हणून घोषित केले. मागासवर्गीयांना सरकारी

नोकऱ्यांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांसाठी जागा आरक्षित ठेवण्याची शिफारस केली संपूर्ण स्त्री वर्गाला मागासलेला वर्ग म्हणून गृहीत धरण्याची एक महत्त्वपूर्ण शिफारस केली होती तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय अभियांत्रिकी आणि इतर तांत्रिक महाविद्यालयांमध्ये ७० टक्के जागा आरक्षित ठेवण्याची मागणी केली होती.

परिणाम

या आयोगाने मागासले पण ठरविण्यासाठी प्रामुख्याने जात हा मुख्य निकष मानला होता पण अहवाल राष्ट्रपतींना सादर करताना स्वतः अध्यक्ष काका काली नगर यांनी सोबत जोडलेल्या पत्रात जातीवर आधारित निकषांना विरोध दर्शविला त्यांच्या मते यामुळे समाजात जातीयवाद वाढू शकत होता अंतर्गत मतभेद व केंद्र सरकारच्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे तात्कालीन काँग्रेस सरकारने या आयोगाचा अहवाल असिकृत केला त्यामुळे पहिल्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशींची देशात कधीही अंमलबजावणी होऊ शकली नाही परंतु भविष्यातील मंडल आयोगासाठी दुसरा आयोग या आयोगाने एक पाया रचण्याचे काम केले.

२. मंडल आयोग

१९८० आणि प्रामुख्याने १९९० चे दशक हे भारतातील आणि महाराष्ट्रातील ओबीसी इतर मागासवर्गीय आरक्षण चळवळीचा सुवर्णकाळ मानला जातो या कालखंडात मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली ज्याने देशातील अठरापगड वंचित आणि कष्टकरी जातींना ओबीसी या एकाच घटनात्मक क्षेत्राखाली आणून त्यांना स्वतंत्र ओळख आणि सत्तेत हक्काचा वाटा मिळवून दिला १९७७ मध्ये देशात पहिल्यांदाच बिगर काँग्रेस जनता पक्ष सत्तेवर आले या सरकारने मागासवर्गीयांना न्याय देण्यासाठी संविधानाच्या कलम ३४० नुसार एक जानेवारी १९८९ रोजी बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग नियुक्त केला मंडल आयोगाने वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून देशभरात फिरून विविध निकषांच्या आधारे अथांग डेटा गोळा केला आयोगाने डिसेंबर १९८० मध्ये आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर केला त्यात धक्कादायक आणि ऐतिहासिक निष्कर्ष काढण्यात आला की देशातील सुमारे ५२ टक्के लोकसंख्या ही इतर मागासवर्गीय ओबीसी समूहाची आहे सर्वोच्च न्यायालयाच्या ५०% आरक्षणाच्या मर्यादेचा आदर करून आयोगाने ओबीसी साठी २७% स्वतंत्र आरक्षणाची ऐतिहासिक शिफारस केली.

मंडल आयोगाच्या शिफारशी :

१. सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण

मंडल आयोगाने देशातील इतर मागासवर्गीयांसाठी ओबीसी लोकसंख्येच्या सुमारे ५२ टक्के असल्याचे गृहीत धरले होते पण सर्वोच्च न्यायालयाच्या नियमानुसार एकूण आरक्षण ५० टक्के पेक्षा जास्त होऊ शकत नसल्यामुळे आयोगाने ओबीसी उमेदवारांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली.

२. शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण

इतर मागासवर्गीयांना केवळ नोकऱ्यांमध्ये नव्हे तर सर्व तांत्रिक आणि व्यावसायिक संस्थांसह

वैद्यकीय अभियांत्रिकी इत्यादी सर्व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी २७ टक्के जागा आरक्षित ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

३. वयोमर्यादा व इतर सवलती

अनुसूचित जाती व जमाती प्रमाणेच ओबीसी उमेदवारांनाही सरकारी नोकऱ्यांच्या भरतीमध्ये वयोमर्यादा सवलत देण्यात आली तसेच स्पर्धा परीक्षांसाठी गुणांमध्ये आवश्यक ती क्षितिजा दिली जावी ओबीसी कर्मचाऱ्यांना केवळ सुरुवातीच्या भरतीमध्ये नाही तर सरकारी सेवक सेवांमधील सर्व स्तरावर पदोन्नती मिळावी असे आरक्षण लागू करावी.

४. आर्थिक व भूमी सुधारणा

इतर मागासवर्गीयांना केवळ आरक्षण देऊन विकास होणार नाही हे ओळखून आयोगाने जमीन सुधारणा कायद्यांची कड्क अंमलबजावणी करण्याची शिफारस केली जेणेकरून ग्रामीण भागातील मागासवर्गीयांना जमिनीची मालकी मिळू शकेल ओबीसी समाजातील लहान कारागीर आणि व्यावसायिकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी बँकांकडून स्वस्त दरात कर्ज आणि आर्थिक मदत मिळायला हवी अशी मागणी करण्यात आली.

५. विशेष अनुदान आणि वसतिगृहे

ओबीसी विद्यार्थ्यांसाठी विशेष शाळा व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र आणि वसूतिगृही सुरू करावी जिथे त्यांना मोफत राहण्याची आणि भोजनाची सोय असेल.

१९८० चे दशक अहवाल बसनात आणि चळवळीची धग

१९८० च्या दशकात केंद्रात पुन्हा सत्तांतर झाले आणि इंदिरा गांधी यांचे सरकार आले. त्यानंतरच्या संपूर्ण १९८० च्या दशकात मंडळ आयोगाचा अहवाल संसदेच्या बसनात गुंडाळून ठेवण्यात आला होता या काळात बहुजन समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला या दशकात देशभरातील आणि महाराष्ट्रातील ओबीसी नेत्यांनी जननायक करपुरी ठाकूर महाराष्ट्रात हरिभाऊ राठोड आणि इतर बहुजन विचारवंत यांनी मंडल आयोग लागू करावा या मागणीसाठी रान पेटवले या दशकात बामशेफ आणि इतर सामाजिक संघटनांनी ग्रामीण भागातील माळी धनगर वंजारी तेली साळी लेवी पाटीदार अशा विविध जातींमध्ये आपण सर्व मिळून ओबीसी आहोत ही वैचारिक जाणीव निर्माण केली यामुळे राजकीय स्तरावर मंडल आयोग लागू करण्यासाठी सरकारवर प्रचंड दबाव वाढला.

सुवर्णकाळची पहाट आणि अंमलबजावणी

१९८९ मध्ये केंद्रात व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली जनता दल चे सरकार आले त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात मंडल आयोग लागू करण्याचे आश्वासन दिले होते. सात ऑगस्ट १९९० रोजी तात्कालीन पंतप्रधान व्ही पी सिंग यांनी संसदेत मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये ओबीसींना २७% आरक्षण देण्याची ऐतिहासिक घोषणा केली. महाराष्ट्रात तात्कालीन मुख्यमंत्री

शरद पवार यांनी अत्यंत धाडसी पाऊल उचलत राज्यांमध्ये मंडल आयोगाची अंमलबजावणी केली यामुळे महाराष्ट्रातील शेकडो लहान-मोठ्या मागास जातींना शासकीय नोकरी आणि शिक्षणाची दारे खुली केली.

मंडल विरुद्ध कमंडल आणि न्यायालयीन मंजुरी

मंडल आयोगाच्या घोषणेनंतर देशात प्रचंड राजकीय आणि सामाजिक वादळ निर्माण झाली. उच्च वर्गीय तरुणांनी या आरक्षणाला तीव्र विरोध केला ज्याला अँटीमंडल आंदोलन म्हंटले गेले याच काळात लालकृष्ण अडवाणी यांनी रामरथ यात्रा सुरू केली ज्याला इतिहासकार मंडल विरुद्ध कमंडल सामाजिक न्यायविरुद्ध धार्मिक ध्रुवीकरण असा संघर्ष म्हणतात या आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले अखेर १६ नोव्हेंबर १९९२ रोजी इंदिरा सहानीविरुद्ध भारत सरकार खटल्यात नऊ न्यायाधीशांच्या घटनापिठाने मंडल आयोगाचे २७ टक्के आरक्षण कायदेशीर रित्या वैद्य ठरवले. यामुळे ओबीसी आरक्षणावर अंतिम घटनात्मक मोहोर लागली.

ओबीसी आरक्षणाचे सामाजिक व राजकीय परिणाम

अ) सामाजिक परिणाम

आरक्षणामुळे पारंपारिक सामाजिक उतरंडीला धक्का बसला असून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळाली आहे

१. शिक्षणाचा विकास आणि मागासवर्गीयांचा उदय

उच्च शिक्षण संस्थांमध्ये २७% आरक्षण मिळाल्यामुळे ओबीसी समाजातील पहिले आणि दुसऱ्या पिढीला दर्जेदार शिक्षण घेता येईल आले यामुळे समाजात एक सुशिक्षित आर्थिक दृष्ट्या सक्षम ओबीसी मध्यमवर्गाचा उदय झाला.

२. प्रशासनात प्रतिनिधित्व

मंडल आयोगापूर्वी सरकारी नोकऱ्या व प्रशासकीय सेवांमध्ये उच्च जातीचे वर्चस्व होते आरक्षणामुळे नोकरशाहीचे सामाजिक विविधीकरण झाले आणि ओबीसी समाजाला निर्णय प्रक्रियेत स्थान मिळाले.

३. सामाजिक प्रतिष्ठा आणि आत्मभान

आरक्षणामुळे या वर्गाला केवळ आर्थिक स्थैर्य मिळाले नाही तर समाजात त्यांचे आत्मपान आणि मानसन्मान वाढला बागास ही ओळख न्यूनगंड न राहता हक्काची जाणीव करून देणारी ठरली.

४. जाती अंतर्गत स्पर्धा आणि क्रिमिलियर चा वाद

ओबीसी प्रवर्गात शेकडो लहान मोठ्या जातींचा समावेश आहे यामुळे काही सक्षम जातींना आरक्षणाचा जास्त फायदा मिळाला तर अति मागास जाती वंचित राहिल्या अशी भावना निर्माण झाली सुप्रीम कोर्टाने आणलेल्या क्रिमिलियर आर्थिक मर्यादा या संकल्पनेमुळे श्रीमंत ओबीसींना बाजूला ठेवून खऱ्या गरजूंना न्याय देण्याचा प्रयत्न झाला परंतु यावरून सामाजिक वाद ही निर्माण झाला.

५. इतर प्रबळ जातीमधील असंतोष

ओबीसी आरक्षणाच्या यशाकडे पाहून मराठा जात किंवा पटेल यासारख्या पारंपारिक दृष्ट्या प्रबळ

व शेतीवर आधारित समाजानेही स्वतःला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्याची किंवा स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी सुरू केली. ज्यातून सामाजिक तणाव निर्माण होत आहे.

ब) राजकीय परिणाम

राजकीय विश्लेषक मंडळ आयोगाच्या अंमलबजावणीला भारतीय राजकारणातील मुक क्रांती मानतात

१. सत्ता केंद्रांचे लोकशाहीकरण

आरक्षणापूर्वी राजकारणाची धुरा प्रामुख्याने उच्चवर्णीय किंवा मोजक्या प्रबळ जातींच्या हातात असायचे ओबीसी आरक्षणामुळे ग्रामपंचायत पासून ते संसदेपर्यंत ओबीसी नेतृत्वाला मोठी संधी मिळाली ओबीसी हा देशातील आणि राज्यातील सर्वात मोठा मतदार वर्ग असल्याने सर्वच राजकीय पक्षासाठी तो केंद्रबिंदू बनला उत्तर भारतात समाजवादी पक्ष राष्ट्रीय जनता दल आणि महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक नेतृत्वाने ओबीसी कार्ड वापरून सत्ता मिळवली.

२. भाजपचा सोशल इंजीनियरिंग प्रयोग

पारंपारिक दृष्ट्या उच्चवर्णीयांचा पक्ष मानल्या जाणाऱ्या भारतीय जनता पक्षाने तळागाळातील आणि छोट्या ओबीसी जातींना आपल्याकडे खेचण्यासाठी विशेष रणनीती राखली स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी आपली ओळख अधोरेखित करणे हा याच राजकीय परिणामाचा एक भाग आहे.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणवाद

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांमधील ओबीसींच्या २७% राजकीय आरक्षणावरून सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर लढाई झाली. ट्रिपल टेस्ट पूर्ण केल्याशिवाय राजकीय आरक्षण देता येणार नाही या न्यायालयीन भूमिकेमुळे स्थानिक राजकारण दीर्घकाळ ढवळून निघाले आहे ओबीसी आरक्षणामुळे भारताच्या सामाजिक रचनेत समानता आणण्यात मदत झाली आहे आणि राजकारणाचा चेहरा मोहरा बदलला आहे मात्र यामुळे जातीवर आधारित राजकारण तीव्र झाल्या असून भविष्यात आर्थिक निकष विरुद्ध सामाजिक निकष आणि जातनिहाय जनगणना हे मुद्दे भारताच्या राजकारणाची दिशा ठरवणारे असतील.

३. मराठा आरक्षण चळवळ

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींमध्ये मराठा आरक्षण चळवळ हा अत्यंत महत्त्वाचा संवेदनशील आणि प्रदीर्घ काळ चाललेला लढा आहे मराठा समाजाला सरकारी नोकरी आणि शिक्षणामध्ये आरक्षण मिळावे या मुख्य मागणीसाठी ही चळवळ उभी राहिली

मराठा आरक्षण चळवळीची पार्श्वभूमी व इतिहास

मराठा समाज हा ऐतिहासिक दृष्ट्या लढवय्या आणि प्रामुख्याने शेती करणारा कुणबी कृषक समाज आहे परंतु काळाच्या ओघात शेतीतील तोटा बेरोजगारी आणि आर्थिक मागासलेपणामुळे समाजातील मोठ्या घटकांची आर्थिक स्थिती खालावली गेल्या काही शतकात शेतीचे झालेले तुकडे स्वतःचा दुष्काळ सिंचनाचा अभाव आणि वाढती कर्जबाजारीपणा यामुळे ग्रामीण तरुण आर्थिक संकटात सापडला उच्च शिक्षणाचा वाढता

खर्च आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये मर्यादित संधी मिळेल मराठा समाजात आरक्षणाची मागणी तीव्र होऊ लागली.

१. राजश्री छत्रपती शाहू महाराज

हे भारतात आरक्षणाचे जनक मानले जातात आजच्या मराठा आरक्षणाविषयी चर्चा आणि चळवळी सुरू आहेत त्याचे मूळ वैचारिक आणि ऐतिहासिक धागेद्वारे शाहू महाराजांच्या दूरदृष्टीशी जोडलेली आहेत मराठा समाज आणि एकूणच बहुजन समाजाच्या आरक्षणाविषयी राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे विचार व कार्य महत्त्वपूर्ण मानले जातात. मराठा कुणबी धनगर माळी मुस्लिम आणि अस्पृश्य या सर्व जातींचा समावेश शाहू महाराजांनी मागास प्रवर्गात केला होता आणि त्यांना आरक्षणाचा अधिकार दिला होता सामाजिक समतोल आणि समान संधी शाहू महाराजांचा असा स्पष्ट विचार होता की जोपर्यंत समाजातील सर्व घटकांना प्रशासनात आणि सत्तेत समान संधी मिळत नाही तोपर्यंत समता प्रस्थापित होऊ शकत नाही त्यांच्या काळात कोल्हापूर संस्थानातील ९०% पेक्षा जास्त नोकऱ्या एका विशिष्ट उच्च वर्गीय घटकांकडे होत्या हा असमतोल दूर करण्यासाठी मराठ्यांसह सर्व बहुजनांना आरक्षण देणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. केवळ मराठा नव्हे तर बहुजन अस्मिता शाहू महाराज स्वतः मराठा कुळातील राजे होते परंतु त्यांचा विचार संकुचित नव्हता त्यांनी मराठा समाजाला क्षत्रिय किंवा पुढारलेला मानण्याच्या सनातनी मानसिकतेचा विरोध केला मराठा समाजा प्रामुख्याने शेती करणारा कष्टकरी आणि शिक्षणापासून वंचित असलेला समाज आहे म्हणजेच तो बहुजन आणि मागास आहे ही जाणीव त्यांनी करून दिली त्यामुळे त्यांनी मराठ्यांना इतर मागास जातींच्या बरोबरीने आरक्षणाच्या प्रवाहात आणले.

राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे मत असे होते की केवळ नोकऱ्यांमध्ये आरक्षण देऊन चालणार नाही तर त्यासाठी बहुजन तरुण शिकले पाहिजे जर समाजात शिक्षणाच नसेल तर आरक्षणाच्या जागा भरणार कशा म्हणून त्यांनी कोल्हापुरात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले मराठा जैन लिंगायत मुस्लिम महार चाभाराच्या विविध जातींसाठी वसूती ग्रहांची स्थापना केली जेणेकरून ग्रामीण भागातील मराठा आणि बहुजन मुले शहरात येऊन शिकू शकतील.सध्याच्या मराठा आरक्षण चळवळीतील संदर्भ आज चालू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनात शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कायद्यांचा वारंवार संदर्भ दिला जातो.

अण्णासाहेब पाटील आणि मराठा आरक्षण चळवळ

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात मराठा आरक्षण चळवळ अत्यंत संवेदनशील आणि दीर्घकाळ चाललेला संघर्ष आहे. आज या चळवळीला जे व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे त्याचा पाया रचण्याची श्रेय जनतेचे आणि माथाडी कामगारांचे कैवारी अण्णासाहेब पाटील यांना जाते अण्णासाहेब पाटील हे मराठा आरक्षणाचे आद्य प्रणेते आणि पहिले आंदोलक मानले जातात १९८० च्या दशकात जेव्हा आरक्षणाची संकल्पना प्रामुख्याने केवळ जाती व्यवस्थित जोडलेली होती तेव्हा अण्णासाहेबांनी मराठा समाजातील वाढत्या आर्थिक दारिद्र्याकडे जगाचे लक्ष वेधले आणि आरक्षणाची पहिली ठिणगी पेटवली.

अण्णासाहेब पाटील यांच्या आरक्षणाविषयीच्या विचारांची मीमासा

१. आर्थिक निकषावर आरक्षणाचा आग्रह

अण्णासाहेब पाटील यांच्या आरक्षणाविषयीचा दृष्टिकोन अत्यंत पुरोगामी आणि वास्तववादी होता त्यांचा असा ठाम विचार होता की आरक्षण हे केवळ जातीच्या उतरंडीवर न देता ते आर्थिक निकषावर दिले गेले पाहिजे मराठा समाज हा वरकरनी समाजात पुढारलेला किंवा सत्ताधारी वाटत असला तरी प्रत्यक्षात या समाजातील एक खूप मोठा वर्ग आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब भूमीहीन आणि अल्पभूधारक आहे हे त्यांनी ओळखले होते त्यामुळे गरीब मराठ्यांना प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी आर्थिक निकषावर आरक्षण हाच एकमेव मार्ग आहे हा त्यांचा मुख्य वैचारिक पाया होता.

२. कष्टकरी आणि माथाडी कामगारांच्या व्यथांची जाण

अण्णासाहेबांनी मुंबईत माथाडी कामगार संघटनेची स्थापना करून कष्टकऱ्यांना संघटित केले होते ग्रामीण महाराष्ट्रातून विशेषता पश्चिम महाराष्ट्र मराठवाडा आणि कोकणातून शेती परवडत नसल्यामुळे लाखो मराठा तरुण मुंबईत हमाली आणि माथाडी कामगार म्हणून आले होते या कष्टकऱ्यांचे त्यांच्या मुलांचे दुःख अण्णा साहेबांनी जवळून पाहिले होते ज्या समाजाचा तरुण मुंबईच्या बाजारपेठेत डोक्यावर पोती वाहतो तो समाज पुढारलेला कसा असू शकतो असा सडेतोड सवाल त्यांनी तात्कालीन व्यवस्थेला विचारला होता.

३. तरुणांचे भवितव्य आणि गुन्हेगारी पासून परावृत्त करण्याचा विचार

१९८० च्या दशकात नील कामगारांचे संप आणि बदलत्या आर्थिक गणितांमुळे मराठा तरुणांसमोर रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता अण्णा साहेबांना अशी भीती होती की जर ग्रामीण भागातून आलेल्या उच्चशिक्षित किंवा अशिक्षित मराठा तरुणांना नोकऱ्या आणि शिक्षणात संधी मिळाल्या नाहीत तर हा तरुण नैराशेच्या गर्दीत सापडेल किंवा गुन्हेगारीकडे वळेल समाजाचे हे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी तरुणांच्या हाताला हक्काचे काम आणि शिक्षणात सवलत मिळणे गरजेचे आहे असे ते मानत.

३. ऐतिहासिक यलगार व सर्वोच्च बलिदान

अण्णासाहेबांनी मराठा महासंघ आणि माथाडी संघटनेच्या माध्यमातून राज्यभर आंदोलनाची वज्रमुठ तयार केली अण्णा साहेबांचे नेतृत्वाखाली २२ मार्च १९८२ रोजी मुंबईत मराठा समाजाचा पहिला अथांग आणि भव्य मोर्चा निघाला या मोर्चा द्वारे त्यांनी तात्कालीन सरकार समोर मराठा समाजाला आरक्षणाचे अंमलबजावणी करावी यास अनेक आर्थिक मागण्या मांडल्या त्यांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला होता की जर मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाला नाही तर मी माझे जीवन संपवावे दुर्दैवाने तात्कालीन सरकारने त्यांच्या या इशारांकडे आणि मागण्यांकडे गांभीर्याने पाहिले नाही आपल्या शब्दाशी आणि विचारांशी गांधील राहून समाजाच्या हक्कासाठी सरकारचे डोळे उघडण्यासाठी अण्णासाहेब पाटील यांनी २३ मार्च १९८२ रोजी स्वतः गोळी झाडून सर्वोच्च बलिदान दिले त्यांच्या या बलिदानाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला.

४. आजच्या चळवळीवरील प्रभाव

अण्णासाहेब पाटील यांनी दिलेला लढा आणि त्यांचे विचार आजही मराठा आरक्षण चळवळीचे मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत त्यांनी सुरू केलेल्या संघर्षाची परिमिती म्हणूनच पुढे सरकारने मराठा समाजाच्या आर्थिक विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ स्थापन केले ज्यांच्या माध्यमातून आज हजारो मराठा तरुणांना व्यवसायासाठी कर्ज आणि मदत मिळत आहे आज मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आधुनिक लढ्याला ची ऊर्जेची आणि हक्काची पार्श्वभूमी मिळाले आहे ती अण्णासाहेबांच्याच विचारातून आली आहे.

मूक मोर्चा चे स्वरूप आणि आरक्षणाची भूमिका

या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे मुक शांततापूर्ण स्वरूप होते लाखो करोडो लोकांचा जनसमुदाय रस्त्यावर उतरूनही कुठेही तोडफोड हिंसा किंवा घोषणाबाजी झाली नाही एक मराठा लाख मराठा या मध्यवर्ती विचारा भोवती संपूर्ण समाज एकवटला या आंदोलनाचे कोणतेही राजकीय नेतृत्व नव्हते तर समाजातील तरुण मुली महिला आणि विद्यार्थ्यांन्या मंचावरून मोर्चाचे नेतृत्व केले आणि प्रशासनाला निवेदन दिले ५० हून अधिक जिल्ह्यांमध्ये निघालेल्या या मोर्चाची मुख्य भूमिका मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये कायदेशीर आरक्षण मिळवून देणे स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार शेतकऱ्यांना हमीभाव देणे आणि ॲट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर रोखणे ही होती या मूक मोर्चाच्या ऐतिहासिक दबावामुळे शासनाने गायकवाड मागासवर्ग आयोग नेमला.

गायकवाड मागासवर्गीय आयोगात – मराठा आरक्षण

मराठा आरक्षण चळवळीच्या कायदेशीर व घटनात्मक इतिहासामध्ये गायकवाड मागासवर्ग आयोग हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरलेला आहे. मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे की नाही हे तपासण्यासाठी राज्य सरकारने नोव्हेंबर २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एमजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग ची पुनर्रचना केली या आयोगाने अत्यंत वैज्ञानिक आणि सखोल अभ्यास करून सादर केलेला अहवाल मराठा आरक्षणाचा मुख्य कायदेशीर पाया ठरला.

आयोगाची कार्यपद्धती आणि मुख्य शिफारशी

गायकवाड आयोगाने संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे ४५ हजाराहून अधिक कुटुंबाचे सर्वेक्षण केले लाखो निवेदने स्वीकारले आणि विविध ऐतिहासिक पुराव्यांचा अभ्यास केला नोव्हेंबर २०१८ मध्ये आयोगाने आपला अंतिम अहवाल सरकारला सादर केला ज्यामध्ये खालील प्रमुख निष्कर्ष काढण्यात आले होते.

१. सामाजिक मागासलेपण

राज्यातील सुमारे ७६.८६% मराठा कुटुंबिक शेती आणि कष्टाच्या कामावर अवलंबून आहे तसेच समाजातील मोठ्या घटकाला आज ही दुय्यम दर्जाचे कामे करावी लागतात.

२. शैक्षणिक मागासलेपणा

मराठा समाजात उच्च आणि तांत्रिक शिक्षणाचे प्रमाण अत्यंत नगन्य आहे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणानंतर गरीबीमुळे शाळा सोडण्याचे प्रमाण या समाजात जास्त आहे.

३. आर्थिक निकष

साधारणपणे ३७.२८% मराठा कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत तर ६२.२८% कुटुंबांकडे अत्यंत अल्प जमीन आहे. या ठोस आकडेवारीच्या आधारे गायकवाड आयोगाने मराठा समाजाचा समावेश सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग एस. ई. बी. सी. मध्ये करण्याची शिफारस केली आणि त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्याची शिफारस राज्य सरकारला केली.

४. अहवालाचे परिणाम आणि न्यायालयीन लढाई

याच अहवालाचा कायदेशीर आधार घेऊन नोव्हेंबर २०१८ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारने मराठा समाजाला १६% स्वतंत्र आरक्षण देणारा एसईबीसी कायदा संमत केला मुंबई उच्च न्यायालयाने जून २०१९ मध्ये या कायद्याची वैधता मान्य केली परंतु आरक्षणाची टक्केवारी शिक्षणात १२ टक्के आणि नोकऱ्यांमध्ये १३ टक्के इतकी कमी केली तथापि हे प्रकरण जेव्हा सर्वोच्च न्यायालयात गेले तेव्हा २०२१ मध्ये पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने गायकवाड आयोगाचा अहवाल फेटाळून लावला सर्वोच्च न्यायालयाच्या मते हा अहवाल ५०% आरक्षणाची मर्यादा व लढण्यासाठी आवश्यक असलेली अपवादात्मक किंवा विलक्षण परिस्थिती सिद्ध करू शकत नाही आणि त्यामुळे २०१८ चे हे आरक्षण रद्द झाले.

सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये हे आरक्षण रद्द केले असले तरी गायकवाड आयोगाच्या अहवालाने पहिल्यांदाच मराठा समाजातील दारिद्र्य, शेतीचे प्रश्न व शैक्षणिक मागासले पण अधिकृत आणि सांख्यिकीय पुराव्यासह जगासमोर आणले सध्या सुरू असलेल्या कायदेशीर लढाया आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात ही मराठा समाजाचे मागासले पण सिद्ध करण्यासाठी गायकवाड आयोगाने गोळा केलेले आकडेवारी हाच मुख्य संदर्भ मानला जातो.

नारायण राणे समितीच्या शिफारशी आणि मराठा आरक्षण

मराठा आरक्षण चळवळीच्या इतिहासात २०१४ हे वर्ष अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले महाराष्ट्रात २०१४ च्या विधानसभा निवडणुकापूर्वी मराठा समाजाचा वाढता असंतोष लक्षात घेऊन तात्कालीन काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारने तात्कालीन उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती या समितीने मराठा समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करून सरकारला अहवाल सादर केला हा अहवाल महाराष्ट्रात मराठा समाजाला पहिल्यांदा अधिकृतपणे आरक्षण मिळवून देण्याचा मुख्य आधार ठरला.

राणे समितीच्या प्रमुख शिफारशी आणि निकष

नारायण राणे समितीने राज्याचा दौरा करून विविध संस्थांकडून डेटा गोळा केला आणि त्या आधारे खालील प्रमुख शिफारशी केल्या.

१. १६% स्वतंत्र आरक्षण

समितीने मराठा समाजाला शासकीय नोकरी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये १६% स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी केली.

२. विशेष प्रवर्गांची निर्मिती

हे आरक्षण आधीपासून असलेल्या ओबीसी कोट्याला धोका न लावता एक स्वतंत्र प्रवर्ग तयार करून देण्यात यावे असे समितीने सुचवले.

३. मुस्लिम समाजाचा समावेश

राणे समितीच्या अहवाला सोबतच सरकारने मुस्लिम समाजातील काही मागास घटकांनाही पाच टक्के आरक्षण देण्याची शिफारस अंतर्भूत केली होती.

४. आर्थिक व सामाजिक मागासलेपण

समितीने आपलाअहवाल स्पष्ट केले की मराठा समाजातील मोठा वर्ग शेतीवर अवलंबून असून तो आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या कमालीचा मागासलेला आहे सरकारी नोकऱ्यांमधील त्याचे प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत कमी आहे

५. राजकीय पाऊल आणि कायदेशीर पेच

राणे समितीच्या शिफारशी स्वीकारून ९ जुलै २०१४ रोजी सरकारने अध्यादेश काढला आणि आरक्षण लागू केले या घाईघाईने घेतलेल्या निर्णयाला कायदेशीर पातळीवर अनेक आव्हानांचा सामना करावा लागला.

६. अपुऱ्या डेटाचा आक्षेप

राणे समितीने गोळा केलेली आकडेवारी ही केवळ काही लाखांमधील नमुन्यांवर आधारित होती तिला राज्य मागासवर्ग आयोग चा वैधानिक दर्जा नव्हता आरक्षणासाठी असा आयोग असणे घटनात्मक दृष्ट्या अयोग्य मानले जाते.

७. उच्च न्यायालयाची स्थगिती

नोव्हेंबर २०१४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने राणे समिती अहवालातील त्रुटींवर बोट ठेवत आणि एकूण आरक्षण ५० टक्के च्या वर जात असल्याने या १६ टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली न्यायालयाने स्पष्ट केले की मराठा समाजा पुढारलेला समाज मानला गेला आहे त्यामुळे योग्य वैधानिक आयोगाशिवाय हे आरक्षण टिकू शकणार नाही जरी २०१४ मधील राणे समितीचे आरक्षण न्यायालयात टिकले नसले तरी या समितीच्या शिफारशीमुळे मराठा आरक्षण देण्याचा राजकीय आणि सामाजिक मार्ग प्रशस्त झाला या समितीने उपस्थित केलेले मुद्दे आणि गोळा केलेले आकडेवारी हाच पुढील आलेल्या गायकवाड आयोगासाठी आणि मराठा आरक्षणाच्या पुढील कायदेशीर लढ्यासाठी एक महत्त्वाचा पाया ठरला.

मनोज जरांगे पाटील आणि कुणबी ओबीसी लढा २०२३–२०२६

महाराष्ट्रातील मराठा आरक्षण चळवळीच्या प्रदीर्घ इतिहासात २०२३ ते २०२६ हा कालखंड अत्यंत वादळी महत्त्वपूर्ण आणि अभूतपूर्व ठरला आहे प्रदीर्घ न्यायालयीन लढाई आणि सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये स्वतंत्र आरक्षण रद्द केल्यानंतर या चळवळीला एक नवा चेहरा मिळाला मनोज जरांगे पाटील जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी या छोट्याशा गावातून सुरू झालेल्या या आंदोलनाने संपूर्ण महाराष्ट्राची सामाजिक राजकीय आणि कायदेशीर गणिती पार बदलून टाकली या मराठा आरक्षणाची जुनी मागणी थेट कुणबी ओबीसी दर्जाशी जोडून एक नवा संघर्ष उभा केला.

१. आंदोलनाची पार्श्वभूमी आणि कुणबी प्रमाणपत्राची मागणी

ऑगस्ट २०२३ मध्ये मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे अमरण उपोषण सुरू केले सुरुवातीला स्थानिक पातळीवर असणारे हे आंदोलन सप्टेंबर २०२३ मध्ये आंदोलकांवर झालेल्या लाठीमारानंतर संपूर्ण महाराष्ट्रात पेटून उठले जरांगे पाटील यांनी या टप्प्यावर अत्यंत महत्त्वाचे कायदेशीर पळवाट शोधून काढली त्यांनी मराठी समाजाला स्वतंत्र प्रवर्गातून एस ई बी सी आरक्षण मागण्या ऐवजी मराठा म्हणजेच

कुणबी हा ऐतिहासिक संदर्भसमोर आणला कुणबी हा शेती करणारा घटक आधीपासून इतर मागासवर्गीयांच्या मध्ये समाविष्ट आहे त्यामुळे ज्या मराठ्यांच्या निजामकालीन किंवा जुन्या महसुली दप्तरात कुणबी म्हणून नोंदी आहे त्यांना तात्काळ कुणबी जातीचे दाखले देऊन ओबीसी कोठ्यातूनच आरक्षण द्यावी ही त्यांची मुख्य मागणी बनली.

सरकारची भूमिका

जरांगे पाटील यांच्या आक्रमक भूमिकेमुळे आणि लागोपाठ केलेल्या आमरण उपोषणामुळे राज्य सरकारला झुकून अनेक पावले उचलावी लागली.

न्यायमूर्ती शिंदे समितीची स्थापना

सरकारने जुन्या वंशावळी आणि निजामकालीन हैदराबाद गॅजेट कुणबी नोंदी शोधून काढण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नेमली या समितीने राज्यभरात लाखो कुणबी नोंदी शोधून काढले आणि त्या आधारे लाखो मराठा कुटुंबाला कुणबी प्रमाणपत्र वाटण्यास सुरुवात झाली.

सगे सोयरे अध्यादेशाचा पेच २०२४

जानेवारी २०२४ मध्ये जरांगे पाटील यांनी लाखो समर्थकांसह मुंबईच्या वेशीवर धडक दिली त्यावेळी सरकारने सगे सोयरे रक्ताचे नातेवाईक यांनाही कुणबी नोंदीच्या आधारे प्रमाणपत्र देण्याचा मसुदा जाहीर केला परंतु या मसुदाचे कायद्यात रूपांतर करण्यावरून कायदेशीर अडथळे निर्माण झाले.

दहा टक्के स्वतंत्र आरक्षणाचा कायदा

फेब्रुवारी २०२४ मध्ये सरकारने विशेष अधिवेशन बोलावून मराठा समाजाला स्वतंत्र दहा टक्के आरक्षण देण्याचा कायदा संमत केला. मात्र जरांगे पाटील यांनी या स्वातंत्र आरक्षणाला नकार देत हे आरक्षण न्यायालयात टिकणार नाही आम्हाला ओबीसी मधूनच हक्काचे सगे सोयरे आरक्षण हवे आहे अशी आपली भूमिका कायम ठेवली.

कुणबी ओबीसी विरुद्ध मराठा संघर्ष

या आंदोलनामुळे महाराष्ट्रात एक नवा सामाजिक संघर्ष पाहायला मिळाला मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यास मूळ ओबीसी नेत्यांनी आणि संघटनाने तीव्र विरोध दर्शविला मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोट्यात समाविष्ट केल्यास मूळ मागासवर्गीय ओबीसींच्या हक्कावर गदा येईल अशी भूमिका ओबीसी आंदोलकांनी घेतली ज्यामुळे ग्रामीण भागात मराठा विरुद्ध ओबीसी असा सामाजिक ताणतणाव निर्माण झाला.

मनोज जरांगे पाटील यांचा नवा अल्टिमेटम आणि आंदोलनाची धार

मे २०२६ च्या सद्यस्थितीत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा प्रशासकीय दिरंगाई विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून त्यांनी सरकारला २८ मे २०२६ पर्यंतचा अंतिम अल्टिमेटम दिला असून मागण्या मान्य न झाल्यास ३० मे २०२६ पासून पुन्हा एकदा बेमुदत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. त्यांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे

१. निजाम कालीन गॅझेटची अंमलबजावणी

हैदराबाद गॅझेट प्रमाणे सातारा कोल्हापूर आणि औंध गॅजेटचा अधिकृत शासन निर्णय तात्काळ काढून त्या अंतर्गत येणाऱ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावेत.

२. सगे सोयरे कायद्याचे रूपांतर

जानेवारी २०२४ मध्ये काढलेले सगे सोयरे रक्ताचे नातेवाईक मसुद्याचे पूर्ण कायद्यात रूपांतर करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी.

३. स्वतंत्र मंत्रालय आणि समिती बरखास्त

मराठा कुणबी समाजाच्या कल्याणासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी आणि सध्याची मराठा आरक्षण समिती उप समिती बरखास्त करून नवी समिती नेमावी

४. प्रशासकीय संथपणावर आक्षेप

सरकारने शोधलेल्या ५८ कुणबी नोंदीच्या आधारे जिल्हा पातळीवर प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया अत्यंत संत झाले असून ती युद्धपात्रेवर सुरू करावे असा त्यांचा आरोप आहे.

प्रशासकीय निर्णय आणि वाढता सामाजिक ताण तणाव

२०२६ मध्ये राज्य सरकारने एक नवीन जीआर जारी केला गेला त्यानुसार राखीव प्रवर्गातील ओबीसी उमेदवारांना खुल्या प्रवर्गाच्या जागांवर दावा सांगता येणार नाही या निर्णयामुळे मराठा विरुद्ध ओबीसी या वादात नवीन ठिणगी पडली जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की हा निर्णय सरकारने आधी घेतला असता तर खुल्या प्रवर्गातील मराठा तरुणांचे नुकसान झाले नसते तसेच सरकारने कुणबी नोंदी शोधणाऱ्या शिंदे समितीला ३० जून २०२६ पर्यंत मुदत वाढ दिली असली तरी आंदोलकांचे समाधान झालेले नाही.

थोडक्यात सांगायचे तर वर्ष २०२६ मधील मराठा आरक्षणाची सद्यस्थिती ही कमालीची अनिश्चित आणि गुंतागुंतीची झाली आहे २८ मे रोजी संपणारा सरकारचा अवधी आणि ३० मे पासून सुरु होणारे जरांगे पाटील यांचे संभाव्य उपोषण यावर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे हा तिढा केवळ न्यायाधीन निकालाने सुटणारा नसून त्यासाठी प्रशासकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक सलोखा राखणे हेच २०२६ मधील सरकार समोरील सर्वात मोठे आव्हान आहे मराठा आरक्षणाची न्यायालयीन लढाई ही शासकीय अधिकार विरुद्ध घटनात्मक मर्यादा यामधील संघर्षाचे उत्तम उदाहरण आहे केवळ कायदे करून आरक्षण टिकत नाही तर त्याला ५०% ची मर्यादा ओलांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला मान्य होईल असा असाधारण मागासलेपणाचा भक्कम घटनात्मक पुरावा द्यावा लागतो २०२६ मधील उच्च न्यायालयाचा हा आगामी निकाल हा प्रदीर्घ कायदेशीर लढायची पुढील दिशा निश्चित करणारा ठरेल.

३. धनगर आरक्षण चळवळ

महाराष्ट्रातील धनगर आरक्षण चळवळ राज्यांच्या सामाजिक आणि राजकीय पटलावरील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रदीर्घ काळ चाललेला संघर्ष आहे. धनगर समाजाकडून गेले अनेक दशके अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण मिळवण्यासाठी ही चळवळ चालवली जाते या मागणीच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने मानववंश शास्त्रीय अभ्यास आणि धनगड व धनगर या शब्दांमधील तांत्रिक साधर्म्य समजणे हाच उद्देश राहिला आहे.

अ) लोकूर समिती १९६५

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती च्या यादीत नवीन जातीचा समावेश करण्यासाठी केंद्र सरकारने बी एन लोकमत यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची स्थापना केली होती या समितीचे निकष पुढील प्रमाणे.

१. आदिम वैशिष्ट्ये
२. विशिष्ट संस्कृती
३. भौगोलिक अलिप्तता
४. मोठ्या प्रमाणावर समाजाशी मिसळण्यास लाजाळूपणा
५. मागासलेपणा

या निकषांच्या आधारे पुढील चालू धनगर आणि धनगड हे दोन वेगळे गट मानले गेले. धनगर समाजाचा पारंपरिक व्यवसाय मेंढपाळ असला तरी ते भौगोलिक दृष्ट्या पूर्णपणे अलिप्त नसल्याचे कारण देत त्यांना या निकषांमध्ये बसवणे कठीण झाले.

ब) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग

घटनेच्या कलम ३३८- नुसार स्थापन झालेल्या या राष्ट्रीय आयोगाकडे धनगर समाजाने अनेकदा दाद मागितली आहे २००२ ते २००५ च्या सुमारास जेव्हा हा मुद्दा संसदेत चर्चेला आला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हा विषय राष्ट्रीय आयोगाकडे गेला आयोगाने केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाच्या मताचा आधार घेत स्पष्ट केले की ओरॉन धनगड ही शेती करणारी आणि प्रामुख्याने छोटा नागपूर पठाराची संबंधित जमात आहे महाराष्ट्रातील धनगर हा पशुपालन आणि लोक संस्कृतीचा भाग असलेला वेगळा समाज आहे त्यामुळे आयोगाने या दोन्ही जमातींमध्ये वांशिक साधर्म्य नसल्याचा निर्वाळा दिला जातो.

क) टाटा सामाजिक विज्ञान संस्था अहवाल २०१५ ते २०१८

२०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर तात्कालीन भाजप सेना सरकारने धनगर आरक्षणाचा तिढा सोडवण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस या नामांकित संस्थेची नियुक्ती केली. संस्थेला दोन कोटी ४७ लाख रुपयाचा निधी देऊन धनगर समाजाच्या सामाजिक आर्थिक आणि मानववंश शास्त्रीय स्थितीचा अभ्यास करण्यास सांगितले गेले. ऑगस्ट २०१८ मध्ये TISS ने आपला सविस्तर अहवाल राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागाला सादर केला हा अहवाल दीर्घकाळ गोपनीय ठेवण्यात आला होता मात्र आदिवासी संघटनांच्या डाव्या नुसार आणि विविध शासकीय सूत्रानुसार TISS च्या अहवालात महाराष्ट्रातील धनगर समाज हा अनुसूचित जमातीच्या संविधानाने ठरवून दिलेल्या निकषां मध्ये पूर्णपणे बसत

नाही असा निष्कर्ष काढण्यात आला होता. हा अहवाल कायदेशीरदृष्ट्या टिकेल की नाही यावर राज्याच्या महाधिवक्त्यांकडे चार वर्षे अभिप्राय प्रलंबित होता आणि अखेर तो अभीप्राय विनाच परत आला.

ड) सुधाकर शिंदे समिती २०२३ ते २०२४

सकल धनगर समाज समन्वय समितीने २०२३ मध्ये पुकारलेल्या तीव्र आंदोलनानंतर शिंदे फडणवीस पवार सरकारने सुधाकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्य तज्ञ समिती स्थापन केली या समितीला मध्य प्रदेश बिहार झारखंड आणि तेलंगणा या राज्यांचा दौरा करण्याचे आदेश दिले होते या राज्यांमध्ये धनगर किंवा तस्तम समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कोणती कायदेशीर कार्यपद्धती आणि पुराव्यांचा आधार घेतला गेला आहे याचा अभ्यास करणे हे समितीचे काम होते. सुधाकर समितीने ऑक्टोबर २०२४ मध्ये आपला अहवाल राज्य सरकारला सुपूर्त केला. सरकारने न्यायालयात स्पष्ट केले की महाराष्ट्रात धनगड अस्तित्वात नाहीत ज्यामुळे धनगर समाजाच्या धनगड म्हणजेच धनगर या दाव्याला बळ मिळाले नाही.

इ) सचिव स्तरावरील त्रिसदस्य आणि समन्वय समिती

सप्टेंबर २०२४ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर धनगर आणि धनगड एकच आहेत असा शासन आदेश काढण्याचा मसुद्यावर काम करण्यासाठी एक विशेष समिती स्थापन करण्यात आली यामध्ये आदिवासी विकास विभाग सामाजिक न्याय विभाग आणि गृह विभागाचे तीन वरिष्ठ सचिव आणि धनगर समाजाच्या पाच प्रमुख प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला राज्याच्या विधी व न्याय विभागाकडून कायदेशीर सल्ला घेऊन करता टिकणारा जीआर कसा काढता येईल यावरही समिती काम करत आहे.

या सर्व समित्यांच्या अभ्यासातून स्पष्ट होते की राज्य सरकारने राजकीय स्तरावर धनगर समाजाला अनुकूल निर्णय घेण्याचा प्रयत्न करत असले तरी लोकूर समितीचे क** निकष आणि संविधानाच्या अनुसूचित यादीत बदल करण्याचा केवळ संसदेला अधिकार असल्यामुळे या सर्व समित्यांचे अहवाल कायदेशीर आणि न्यायालयीन चौकटीत मोठ्या आव्हानांचा सामना करत आहे.

धनगर समाजाची मुख्य मागणी

सध्या महाराष्ट्रात धनगर समाजाला भटक्या जमाती क (NTAC) या प्रवर्गातील ३.५% आरक्षण लागू आहे मात्र समाजाची मूळ मागणी अशी आहे की त्यांना हे आरक्षण भटक्या जमाती मधून न मिळता अनुसूचित जमाती प्रवर्गातून मिळाले पाहिजे जेणेकरून त्यांना शिक्षण सरकारी नोकऱ्या आणि राजकीय क्षेत्रात सात टक्के आरक्षणाचा लाभ घेता येईल धनगर विरुद्ध धनगड हा मुख्य तांत्रिक वाद धनगर आरक्षणाचा संपूर्ण टिळा एका अक्षराच्या उच्चार आणि लेखनावरील वादात अडकला आहे.

घटनेतील नोंद

भारतीय राज्यघटनेच्या अनुसूचित जमातींच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील ४७ जमातींच्या नोंदी आहेत त्यामध्ये अनुक्रमांक ३६ ओरॉन धनगड जीरेप ऊहरपसरव असा उल्लेख आहे.

धनगर समाजाच्या युक्तिवाद

धनगर समाजाच्या नेत्यांचे आणि अभ्यासकांचे मते असे आहे की महाराष्ट्रात धनगर नावाची कोणती स्वतंत्र जमात अस्तित्वात नाही इंग्रजीतील Dhangad हा शब्द प्रत्यक्षात Dhangar धनगर असाच आहे केवळ र चा ड किंवा ग झाल्यामुळे हा भाषिक घोळ झाला आहे बिहार झारखंड आणि ओडिसा मध्ये धनगर समाजाला एसटी प्रवर्गाची लाभ मिळतात तर महाराष्ट्रात केवळ या स्पेलिंगच्या चुकीमुळे समाज लाभांपासून वंचित राहिला आहे

धनगर आरक्षणाची चळवळ

१९८० चे दशक १९८५ ते १९८६ च्या सुमारास यशवंत सेनेच्या माध्यमातून आणि श्री. कोकरे व इतर नेत्यांच्या नेतृत्वाखाली धनगर आरक्षणाची मागणी खऱ्या अर्थाने व्यापक झाली गेल्या चार दशकात धनगर समाजाने अनेक मोठी आंदोलने मोर्चे आणि रास्ता रोको केले आहेत पंढरपूर चौंडी आणि मुंबई येथे मोठी आंदोलने झाली. समाजाच्या नेत्यांनी आणि तरुणांनी वेळोवेळी आमरण उपोषणेही केली आहेत.

अ) सुरुवातीचा काळ १९५० ते १९८० चे दशक

१. १९५० ची राष्ट्रपतीची अधिसूचना

देशात अनुसूचित जमातीची पहिली सूची जाहीर झाली तेव्हापासून या तांत्रिक चुकीमुळे (धनगर धनगड) धनगर समाज एसटी आरक्षणापासून वंचित राहिला.

२. १९८० चे दशक आंदोलनाची सुरुवात

या काळात कैलासवासी यशवंतराव होळकर व समाजातील प्रमुख नेत्यांनी एकत्र येऊन या मागणीला संघटित स्वरूप दिले ठिकठिकाणी मोर्चे आंदोलने आणि निवेदने देण्यास सुरुवात झाली.

ब) १९८४ NTAC अंतर्गत स्वतंत्र आरक्षण.

१९८० च्या दशकात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर तात्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या सरकारने धनगर समाजाचा रोष कमी करण्यासाठी आणि सामाजिक न्याय देण्यासाठी एक मध्यम मार्ग काढला धनगर समाजासाठी भटक्या जमाती प्रवर्गात NTAC हा स्वतंत्र उपवर्ग तयार करण्यात आला आणि त्यात ३.५% आरक्षण देण्यात आले या उपप्रवर्गात मुख्यत्वे धनगर आणि तस्तम जातींचा समावेश आहे.

क) २०१४ चा आक्रमक टप्पा बारामती आंदोलन

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २०१४ मध्ये या आंदोलनाने अत्यंत आक्रमक रूप धारण केले धनगर समाज कृती समिती आणि यशवंत सेनेच्या नेतृत्वाखाली बारामती येथे ऐतिहासिक आणि प्रदीर्घ आमरण उपोषण करण्यात आले तात्कालीन विरोधी पक्ष नेत्यांनी आश्वासन दिले होते की भाजप सेना युतीचे सरकार आल्यास पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत धनगर आरक्षणाचा प्रश्न सोडवला जाईल.

ड) २०२३ ते २०२४ तीव्र आंदोलने आणि न्यायालयीन लढा

१. चोंडी आणि पंढरपूर येथील उपोषणे २०२३

मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला असतानाच धनगर समाजानेही चोंडी आणि पंढरपूर येथे तीव्र उपोषण करून सरकारवर दबाव आणला

२. मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

धनगर समाज महासंघ आणि इतर संघटनांनी दाखल केलेल्या अनेक याचिकांवर १६ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने आपला अंतिम निकाल दिला उच्च न्यायालयाने धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी फेटाळून लावली राष्ट्रपतीच्या आदेशात बदल करण्याचा अधिकार केव्हा संसदेला आहे न्यायालयाला नाही तसेच याची काय करते हे सिद्ध करू शकले नाहीत की महाराष्ट्रात धनगड नावाची कोणतीही जमात अस्तित्वात नाही या निर्णयामुळे चळवळीला कायदेशीर पातळीवर मोठा धक्का बसला.

३. आरक्षणासमोरील मुख्य कायदेशीर आणि राजकीय अडचणी

संसदेचा अधिकार कलम ३४२ भारतीय संविधानानुसार कोणत्याही जमातींचा अनुसूचित जमातीत एसटीत समावेश करायचा असेल तर तो अधिकार राज्य सरकार किंवा न्यायालयाला नसून केवळ संसदेला आहे राज्य सरकार फक्त शिफारस करू शकते महाराष्ट्रातील सध्याच्या आदिवासी संघटनांचा धनगर समाजाला एसटीमध्ये समाविष्ट करण्यास तीव्र विरोध आहे धनगर समाजाची लोकसंख्या मोठी असल्याने त्यांना या समाविष्ट केल्यास मूळ आदिवासींच्या आरक्षणाचा वाटा कमी होईल अशी भीती त्यांना आहे तसेच. Dhangar आणि Dhangad या दोन्ही एकच जाती आहेत हे सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणारे टॉस ऐतिहासिक आणि मानव वंश शास्त्रीय पुरावे न्यायालयाच्या चौकटीत टिकू शकले नाही मुंबई उच्च न्यायालयाच्या २०२४ मधील निर्णयानंतर आता धनगर समाजाकडे सर्वोच्च न्यायालयात दाद मागणी किंवा केंद्र सरकारकडून संसदेत कायदा करून घेणे हेच दोन पर्याय शिल्लक राहिलेले आहेत सरकारकडून सध्या धनगर समाजासाठी विविध आर्थिक महामंडळे आणि आश्रम शाळांच्या माध्यमातून सवलती दिल्या जात असल्या तरी एसटी आरक्षणाची मूळ मागणी आजही कायम असून हा लढा अजूनही सुरूच आहे.

४.४ सारांश

महाराष्ट्रातील पर्यावरण, सहकार आणि आरक्षणावर आधारित चळवळींनी राज्याच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाला महत्त्वाची दिशा दिली आहे. पर्यावरण संवर्धन चळवळीने पश्चिम घाट बचाव आणि चिपको आंदोलनाच्या प्रेरणेने जंगल व नद्यांच्या संरक्षणासाठी जनजागृती केली, तर सहकार चळवळीने सुतगिरण्या आणि साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडवून सामान्य शेतकऱ्यांचे सक्षमीकरण केले. दुसरीकडे, आरक्षणावर आधारित चळवळींनी दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय (OBC) व मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये हक्क मिळवून देण्यासाठी मोठे लढे दिले. या तिन्ही चळवळींनी महाराष्ट्रात सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि निसर्गाचे रक्षण करत लोकशाही मूल्ये अधिक मजबूत केली आहेत.

४.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **पर्यावरण संवर्धन** (Environmental Conservation)**:** नैसर्गिक संसाधनांचा (हवा, पाणी, जमीन, जंगले) मानवी फायद्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी केलेला सुज्ञ व सुरक्षित वापर.

२. **जैवविविधता** (Biodiversity)**:** एखाद्या विशिष्ट भागात आढळणाऱ्या विविध प्रकारच्या सजीव प्रणाली, वनस्पती आणि प्राण्यांची विविधता.

३. **शाश्वत विकास** (Sustainable Development)**:** भविष्यातील पिढ्यांच्या गरजांशी तडजोड न करता, वर्तमान काळातील गरजा पूर्ण करणारी विकास पद्धत.

४. **परिस्थितीकी** (Ecology)**:** सजीव आणि त्यांचे सभोवतालचे पर्यावरण यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र.

५. **परिसंस्था** (Ecosystem)**:** एका विशिष्ट परिसरातील सजीव (जैविक) आणि निर्जीव (अजैविक) घटक जेव्हा एकमेकांवर अवलंबून राहून एक प्रणाली तयार करतात, त्याला परिसंस्था म्हणतात.

६. **वनीकरण** (Afforestation)**:** जिथे आधी जंगल नव्हते अशा नवीन जागेवर मोठ्या प्रमाणावर झाडे लावून जंगल तयार करणे. (याउलट, नष्ट झालेले जंगल पुन्हा निर्माण करण्याला पुनर्वनीकरण – Reforestation म्हणतात).

७. **सभासद** (Member)**:** सहकारी संस्थेचे भाग (Shares) खरेदी करून तिचे सदस्यत्व मिळवणारी व्यक्ती.

८. **कार्यकारिणी / संचालक मंडळ** (Board of Directors)**:** संस्थेचा दैनंदिन कारभार चालवण्यासाठी सभासदांमधून निवडून दिलेले प्रतिनिधी.

९. **निबंधक** (Registrar)**:** सहकारी संस्थांची नोंदणी करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे आणि कायद्याची अंमलबजावणी करणे यासाठी शासनाने नियुक्त केलेला मुख्य अधिकारी.

१०. **आरक्षण** (Reservation)**:** ऐतिहासिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये दिलेले विशेष प्रतिनिधित्व.

सलोखा / सामाजिक सलोखा (Social Harmony)**:** विविध जाती आणि समुदायांमध्ये शांतता आणि सुसंवाद टिकवून ठेवण्याची प्रक्रिया.

११. **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक** (EWS - Economically Weaker Sections)**:** खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांसाठी असलेले आरक्षण.

ओबीसी (OBC - Other Backward Classes)**:** इतर मागासवर्गीय प्रवर्ग, ज्यामध्ये अनेक जातींचा समावेश होतो आणि ज्यांना २५ ते २७% आरक्षण लागू आहे.

१२. **मराठा आरक्षण** (Maratha Reservation)**:** मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातून आरक्षण मिळण्यासाठी सुरू असलेली चळवळ.

१३. **कुणबी प्रमाणपत्र** (Kunbi Certificate)**:** निजामकालीन महसुली किंवा शैक्षणिक नोंदींच्या आधारे मराठा समाजातील व्यक्तींना ओबीसी अंतर्गत आरक्षण मिळवण्यासाठी दिले जाणारे जात प्रमाणपत्र.

१४. **सगेसोयरे** (Sage Soyare)**:** रक्ताचे नातेवाईक आणि लग्नाद्वारे जोडले गेलेले नातेवाईक. मराठा कार्यकर्त्यांकडून कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या व्याख्येत या शब्दाचा समावेश करण्याची मागणी केली जात आहे.

१५. **क्रिमी लेअर आणि नॉन–क्रिमी लेअर** (Creamy Non-Creamy Layer)**:** आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी ठरवलेली उत्पन्नाची मर्यादा. ठराविक वार्षिक उत्पन्नापेक्षा (उदा. ८ लाख) कमी उत्पन्न असलेले लोक 'नॉन–क्रिमी लेअर' मध्ये येतात आणि त्यांनाच आरक्षणाचा लाभ मिळतो.

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

रिकाम्या जागा भरा

१. 'चिपको आंदोलन' हे प्रामुख्याने .... रोखण्यासाठी आणि वनसंवर्धनासाठी सुरू करण्यात आले होते.

उत्तर: वृक्षतोड

२. भारतातील 'नर्मदा बचाव आंदोलन' हे ....यांच्या नेतृत्वाखालील पर्यावरण संवर्धन चळवळीचे एक प्रमुख उदाहरण आहे.

उत्तर: मेधा पाटकर

३. पर्यावरण संवर्धनासाठी आणि जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी दरवर्षी .... हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.

उत्तर: ५ जून

४. प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि कचरा व्यवस्थापन सुधारणे हे स्वच्छ भारत अभियान या चळवळीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

उत्तर: स्वच्छ भारत अभियान

५. झाडे लावणे आणि ती जगवणे याला चालना देण्यासाठी भारतात दरवर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वनमहोत्सव साजरा केला जातो.

उत्तर: वनमहोत्सव

६. भारतामध्ये पहिला सहकारी कायदा .... या वर्षी संमत करण्यात आला.

उत्तर: १९०४

७. महाराष्ट्रात सहकार कायदा कोणत्या वर्षी मंजूर झाला?

उत्तर: ब) १९६० (हा कायदा १ मे १९६२ पासून लागू झाला).

८. सहकाराचे मुख्य उद्दिष्ट .... हे नसून सेवा देणे हे असते.

उत्तर: नफा मिळवणे

९. सहकारी संस्थेमध्ये मतदानाचा अधिकार .... या तत्त्वावर आधारित असतो.

उत्तर: एक व्यक्ती, एक मत

१०. प्राथमिक कृषी पतपेढ्या ग्रामीण भागात .... मुदतीचा कर्जपुरवठा करतात.

उत्तर: अल्प आणि मध्यम

११. मराठा आरक्षणासाठी ....यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मोठे उपोषण केले होते.

उत्तर: मनोज जरांगे-पाटील

१२. तामिळनाडूच्या धर्तीवर महाराष्ट्रातही आरक्षणाची मर्यादा.......टक्क्यांच्या पुढे नेण्याची मागणी आंदोलकांकडून केली जात आहे.

उत्तर: ५०

१३. महाराष्ट्रात छत्रपती शाहू महाराज यांनी १९०२ मध्ये .... संस्थानात मागासवर्गीयांसाठी ५०% आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा केली होती.

उत्तर: कोल्हापूर

१४. मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने .... आयोग (मागासवर्ग आयोग) स्थापन केला होता, ज्याच्या अहवालानुसार २०२४ मध्ये आरक्षण विधेयक मंजूर झाले.

उत्तर: न्यायमूर्ती सुनील शुक्रे

१५. सध्या महाराष्ट्रात ओबीसी (OBC) आरक्षणाचे रक्षण करण्यासाठी .... आणि इतर ओबीसी नेत्यांनी 'ओबीसी बचाव' आंदोलन सुरू केले आहे.

उत्तर: प्रा. लक्ष्मण हाके

४.७ सरावासाठी स्वाध्याय

टिपा लिहा:

१. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने

२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (DCCBs) आणि ग्रामीण विकास

३. महाराष्ट्रातील सहकार चळवळीसमोरील मुख्य आव्हाने व समस्या

४. मराठा आरक्षण चळवळ आणि मनोज जरांगे-पाटील यांचे आंदोलन

५. ओबीसी (OBC) हक्क संरक्षण चळवळ

६. धनगर आरक्षण आणि अनुसूचित जाती (SC) उपवर्गीकरण चळवळ

७. ‘आरे वाचवा’ आंदोलन.

८. सह्याद्री बचाव मोहीम (पश्चिम घाट संरक्षण):

९. पाणी फाउंडेशन (सत्यमेव जयते वॉटर कप):

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१. महाराष्ट्रातील मचिपको आंदोलनफ म्हणून कोणती चळवळ ओळखली जाते आणि ती का झाली?

२. पश्चिम घाट (Western Ghats) संवर्धनासाठी महाराष्ट्रात कोणती मोठी चळवळ झाली?

३. महाराष्ट्रात पाणी टंचाई आणि दुष्काळाविरुद्ध कोणती लोकचळवळ उभी राहिली?

४. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे मुख्य फायदे काय झाले आहेत?

५. सध्या महाराष्ट्रातील सहकारी चळवळीसमोर कोणत्या मुख्य अडचणी किंवा आव्हाने आहेत?

दीर्घोत्तरी प्रश्न

१. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा उगम आणि ऐतिहासिक विकास स्पष्ट करून, या चळवळीने राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनात कशी भूमिका बजावली आहे याचे सविस्तर विश्लेषण करा.

२. महाराष्ट्रातील साखर कारखानदारी आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील सहकारी चळवळीचे यश अधोरेखित करा, तसेच सध्या या क्षेत्रासमोर असलेल्या प्रमुख आव्हानांची व समस्यांची चर्चा करा.

३. सहकारी चळवळीतील वाढता राजकीय हस्तक्षेप आणि वित्तीय शिस्तीचा अभाव यांमुळे सहकारी संस्थांवर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करा. ही चळवळ अधिक बळकट व पारदर्शक करण्यासाठी कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत?

४. महाराष्ट्रातील प्रमुख पर्यावरण संवर्धन चळवळींचा आढावा घेऊन त्यांचे पर्यावरणात्मक महत्त्व स्पष्ट करा.

५. महाराष्ट्रातील पर्यावरण चळवळींसमोरील प्रमुख आव्हाने कोणती आहेत आणि त्यावर काय उपाययोजना करता येतील?

६. महाराष्ट्रातील मराठा आरक्षण चळवळीची पार्श्वभूमी, तिच्या प्रमुख मागण्या आणि या चळवळीला कायदेशीर व घटनात्मक पातळीवर कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला आहे, याचे सविस्तर विश्लेषण करा.

७. महाराष्ट्रात दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्ग (OBC) यांच्या आरक्षण चळवळींनी राज्याच्या सामाजिक आणि राजकीय रचनेला कसा आकार दिला? या चळवळींमुळे वंचित घटकांच्या सक्षमीकरणात काय बदल झाले, यावर चर्चा करा.

८. सध्याच्या काळात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण (EWS) आणि विविध समाजांकडून होणाऱ्या आरक्षणाच्या मागण्या या पार्श्वभूमीवर, आरक्षणाचे धोरण सामाजिक न्यायाचे साधन म्हणून कितपत यशस्वी ठरले आहे? महाराष्ट्रातील वाढत्या संघर्षाच्या संदर्भात याचे परीक्षण करा.

४.८ अधिक वाचण्यासाठी संदर्भ ग्रंथ

१. Tejindar, Regional Parties in National Politics, K.K. Publications, New Delhi, 2009.

२. Basu, D. D., Introduction to Indian Constitution, Lexis Publications.

३. शिरसिकर म. म., आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४. शोभा कोरके, शरद घोडके, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अंशुल पब्लिकेशन, नागपूर.

५. पाटील बी. वी., महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. राठी शुभांगी, महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व पब्लिकेशन, भुसावळ.

७. पाटील वा. भा., महाराष्ट्र प्रशासन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

८. शिरसिकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

९. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शोभा कोरके, शरद घोडके, अंशुल पब्लिकेशन, नागपूर.

१०. महाराष्ट्र शासन आणि राजकारण, पाटील बी. वी., फडके प्रकाशन, कोल्हापूर.

११. महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळी व प्रशासन, शुभांगी राठी, अथर्व पब्लिकेशन, भुसावळ.

१२. महाराष्ट्र प्रशासन, पाटील भा., महेंद्र पाटील, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

१३. भोसले बाळासाहेब, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, अध्यक्षीय भाषण, ३६ वी महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद, वाघमारे, २०११.

१४. पळशीकर सुहास, बिप्लव नितीन, पवार प्रकाश, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७.

१५. पळशीकर सुहास, समकालीन भारतीय राजकारण – काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जनवाद, प्रतिमा प्रकाशन.

१६. सिंह जगीव, भारतीय संविधान, के. के. पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, २०२२.

१७.पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९.

❑❑❑